



# मंथन
२००७

ग्रंथमोजणी
२००७-८ : २०/२/८
२००८-९ : १२/१२/८
२००९-१०
२०११-१२
२०१३-१४
२०१५-१६

**मंथन** सन्मानचिन्ह :
षांताराम पवार

संकल्पना :
अवघ्या प्राणिमात्राचा सन्मित्र,
करुणाकर



ग्रंथमोजणी
२०१०-११: १०.२.११
२०१२-१३
२०१४-१५
२०१६-१७

**संपादक**
भूषण ठाकूर

**संपादन साहाय्य**
राहुल कोसम्बी, प्रमिला माया नारायण

**मुखपृष्ठ**
संतोष क्षीरसागर

**मुखपृष्ठ छायाचित्रण**
केदार मालेगावकर

**आतील छायाचित्रे**
संदेश भंडारे

**प्रोसेसिंग**
रेप्रोस्कॅन, मुंबई

**प्रकाशक**
भूषण ठाकूर
निमंत्रक
महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य पुरस्कार समिती
केशव गोरे स्मारक ट्रस्ट, 'स्मृती', आरे रोड
गोरेगाव (पश्चिम)
मुंबई ४०० ०६२

**मुद्रक**
प्रकाश विश्वासराव
न्यू एज प्रिंटिंग प्रेस, भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड, प्रभादेवी
मुंबई ४०० ०२५



# महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य पुरस्कार प्रदान समारंभ २००७

अध्यक्ष

**मा. न्या. हेमंत गोखले**

मुख्य न्यायाधीश, अलाहाबाद उच्च न्यायालय

प्रमुख पाहुणे

**डॉ. जब्बार पटेल**

सुप्रसिद्ध दिग्दर्शक

सूत्रसंचालन

**आशुतोष शिर्के**

**समारंभ**

रविवार दिनांक ३० डिसेंबर २००७, सायंकाळी ५ वाजता
यशवंतराव चव्हाण नाट्यसंकुल (यशवंत नाट्यगृह), मनमाला टँक रोड
माटुंगा-माहीम, मुंबई - ४०० ०१६

## २००७ चे मानकरी

### संस्था

**हॅलो मेडिकल फाउण्डेशन** — अणदूर, जि. उस्मानाबाद

**स्त्री मुक्ती संघटना** — मुंबई

### विशेष पुरस्कार

**प्रा. एन. डी. पाटील**

सातारा

### व्यक्ती पुरस्कार

**प्रदीप प्रभू** — डहाणू

**अन्वर राजन** — पुणे

**राजन इंदुलकर** — चिपळूण

समारंभाचे अध्यक्ष

# मा. न्या. हेमंत गोखले



भारतातल्या विविध राज्यातील उच्च न्यायालयांमध्ये सर्वात मोठे उच्च न्यायालय म्हणून अलाहाबाद उच्च न्यायालय गणले जाते. अशा सर्वात मोठ्या असणाऱ्या उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती म्हणून न्या. हेमंत गोखले यांची ७ मार्च २००७ रोजी नेमणूक झाली. सर्वसामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून, भारतीय राज्यघटनेच्या उद्दिष्टाप्रमाणे न्यायालयाचे कार्य चोखपणे करावे, यासाठी अत्यंत प्रामाणिकपणे झटणारी व्यक्ती म्हणून न्या. गोखले ओळखले जातात. त्यांच्या या वृत्तीच्या पाऊलखुणा त्यांच्या जीवनप्रवासात दिसून येतात.

न्या. हेमंत लक्ष्मण गोखले यांचा जन्म १० मार्च १९४९ रोजी बडोदे येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण दादर येथील बालमोहन विद्यामंदिर या मराठी माध्यमाच्या शाळेतून झाले, तर महाविद्यालयीन शिक्षण मुंबईतील नामांकित रामनारायण रुईया महाविद्यालयातून झाले. बी.ए.ची पदवी प्राप्त केल्यानंतर त्यांनी, मुंबईच्या शासकीय विधी महाविद्यालयातून एलएल.बी. ही पदवी मिळवली. पुढे एम.ए. आणि एलएल.एम. या पदव्युत्तर पदव्याही त्यांनी विशेष प्राविण्यासह प्राप्त केल्या. घटनात्मक कायदा आणि आंतरराष्ट्रीय कायदा हे विषय घेऊन ते एलएल.एम.च्या परीक्षेत विद्यापीठात सर्वप्रथम आले होते.

शालेय आणि महाविद्यालयीन जीवनात त्यांनी विविध प्रकारच्या वक्तृत्व स्पर्धा आणि वादविवाद स्पर्धा गाजवल्या. अनेक पारितोषिके मिळवून महाविद्यालयाचे नाव गाजवले. पुण्याची न्या. रानडे वादविवाद स्पर्धा ही प्रतिष्ठेची स्पर्धाही त्यांनी त्यावेळी जिंकून, महाविद्यालयाला विजयश्री प्राप्त करून दिली होती. विविध स्पर्धांमध्ये सहभागी होणारे न्या. गोखले त्यावेळच्या पुरोगामी विद्यार्थी व युवक संघटनांमध्येही अग्रेसर होते. मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि भारताच्या नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. भालचंद्र मुणगेकर, मराठी साहित्यातले नामवंत श्रेष्ठ लेखक श्री. अनिल अवचट हे त्यांचे त्याकाळातले सहकारी/मित्र होते. युवक चळवळींमधल्या चर्चा, शिबिरे, अभ्यासमंडळे आणि सामाजिक कार्यक्रमात त्यांनी हिरिरीने भाग घेतला. प्रा. मे. पुं. रेगे, डॉ. गोपाळ राणे, श्री. दादासाहेब रूपवते, प्रा. नलिनी पंडित, डॉ. य. दि. फडके, प्रा. राम बापट अशांसारख्या नामवंत, विचारवंतांच्या वैचारिक व सामाजिक जाणीवा सखोल करणाऱ्या मार्गदर्शनाचा लाभ, न्या. गोखले यांना प्राप्त झाला. यातूनच आपली परिवर्तनवादी आणि समाजाभिमुख भूमिका घडली, हे ऋण न्या. गोखले कायम मानत आले आहेत. अशा सामाजिक विद्यापीठात वैचारिक भूमिका घडत असतानाच, गोखले स्वतःहून श्री. बाबा आमटे यांच्या श्रमशिबिरातूनही स्वतःला घडवीत होते व बांगलादेश मुक्तीच्या वेळी, सीमेवरच्या शरणार्थींच्या शिबिरातही काम करण्यात पुढाकार घेत होते. १९७३मध्ये मुंबई उच्च न्यायालयामध्ये वकिलीची सनद घेईपर्यंत न्या. गोखले यांचा पिंड समाजाभिमुख विचाराने पोसला गेला होता. त्यांनी वकिलीचा व्यवसाय सुरू केल्यावर त्यामध्येही त्याचे पुरेपूर प्रतिबिंब पडलेले दिसते.

बेस्ट, महापालिका, रेल्वे कर्मचारी संघटना अशा विविध संघटनांना, त्यातील गरीब कामगारांना न्याय मिळवून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न न्या. गोखले यांनी वकील म्हणून केला. यासाठी मुंबईच्या दिवाणी न्यायालय, औद्योगिक न्यायालय, उच्च न्यायालय आणि काही प्रसंगी तर सर्वोच्च न्यायालयातही त्यांनी लढे दिले, बाजू मांडल्या व अनेकांना न्याय मिळवून दिले.

रुईया महाविद्यालयात असताना प्रा. वसंत बापट, प्रा. सरोजिनी वैद्य आणि कायद्याचे शिक्षण घेत असताना प्राचार्य

त्र्यं. कृ. टोपे, डॉ. दामोदर वाडेगावकर, डॉ. सत्यरंजन साठे यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले होते अशा या प्राध्यापकांचा संस्कार वकिलीचा व्यवसाय करत असतानाही ते विसरले नाहीत. १९७७ साली त्यांनी शासकीय विधी महाविद्यालयात अर्धवेळ प्राध्यापकी अत्यंत आवडीने स्वीकारली आणि १९८४ पर्यंत ते मनापासून कायद्याचे विद्यार्थीही घडवीत होते. त्यांनी पर्यावरण, दहशतवाद, कामगार प्रश्न व घटनात्मक तरतुदी यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर निरनिराळी विद्यापीठे, कायदे शिक्षण देणारी महाविद्यालये येथे आयोजित केलेल्या चर्चासत्रांमध्ये अभ्यासपूर्ण विवेचन केले. तर काही विषयांमध्ये व्यासंगी शोधनिबंधही सादर केले.

१९८४ ते १९८९ या काळात त्यांना मुंबई उच्च न्यायालयामध्ये शासकीय अधिवक्ता म्हणून काम करण्याची संधी मिळाली. अत्यंत कष्टाळूपणे, प्रामाणिकपणे केलेल्या कामामुळे आणि कायद्याच्या सखोल अभ्यासामुळे वीस-बावीस वर्षांत वकील म्हणून ॲड. गोखले ह्यांचे नाव सर्वश्रुत झाले. त्यांच्या सचोटीने केलेल्या कार्यालाही तशीच दाद मिळाली. २० जानेवारी १९९४ रोजी ॲड. गोखले यांची मुंबई उच्च न्यायालयामध्ये न्यायमूर्ती म्हणून नेमणूक झाली.

सर्वोच्च न्यायालयाच्या तत्कालीन धोरणानुसार न्या. गोखले यांची बदली गुजरातमध्ये झाली गुजरात राज्याच्या उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून काम करताना त्यांनी पर्यावरणाच्या संदर्भात अनेक महत्त्वाचे निवाडे दिले. फेब्रुवारी १९९९मध्ये त्यांची मुंबईच्या उच्च न्यायालयात फेरबदली झाली. मुंबईच्या गृहनिर्माण आणि नगरविकास योजना, वैद्यकीय आणि अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचे प्रवेशप्रश्न, कैद्यांचे अधिकार, महाबळेश्वर विकास योजना, पर्यावरण विषयक प्रश्न आणि इतर अनेक सामाजिक जिव्हाळ्याच्या विषयांवर न्या. गोखले यांनी लोकाभिमुख निवाडे दिले. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर, औरंगाबाद व गोवा इथे असणाऱ्या खंडपीठांवर त्यांनी वेळोवेळी काम पाहिले आहे.

जिल्हा न्यायालयांपर्यंतचे न्यायनिवाडे मराठी भाषेतून देण्याच्या उपक्रमाला गती देण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले. मुंबई उच्च न्यायालयाच्या विधी विषयक सहाय्यक समितीचे ते पाच वर्ष अध्यक्ष होते. त्यांच्या अध्यक्षीय कालखंडात त्यांनी लोक-अदालत चळवळ आणि ग्रामीण भागात विधी साक्षरता वाढवणे ह्या दोन नव्या उपक्रमांना चालना दिली. विधी साक्षरता अभियानात त्यांनी विधी महाविद्यालयातील विद्यार्थांना सहभागी करून घेतले. विधी महाविद्यालयांतून नव्यानेच पदवीधर झालेल्या विद्यार्थ्यांना अनुभव मिळावा म्हणून, योग्य मानधनासह, न्यायमूर्तींचे कायदेविषयक साहाय्यक (लॉ क्लार्क) म्हणून काम करण्याची संधी देण्याची योजना त्यांनी अंमलात आणली. ६ जानेवारी २००७ रोजी न्या. गोखले मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती झाले व सध्या अलाहाबाद उच्च न्यायालयात मुख्य न्यायमूर्ती म्हणून कार्यरत आहेत.

आज न्या. गोखले यांच्यावर मुख्य न्यायमूर्तीपदाची महत्त्वाची जबाबदारी आहे. अनेक वर्षे प्रलंबित असलेले खटले निकालात काढणे, न्यायालयीन यंत्रणा गतिमान, प्रामाणिक आणि आश्वासक बनवणे या कामाला त्यांनी अग्रक्रम दिला आहे.

न्या. गोखले यांचा एक विशेष वेगळा पैलू म्हणजे त्यांना संगीत आणि साहित्यामध्ये रुची आहे. संगीताचा हा वारसा त्यांच्या मातोश्री दिवंगत लीलाताईकडून न्या. गोखले यांना मिळालेला आहे. न्या. गोखले हे कृतज्ञतेने नमूद करतात की विवेकशीलतेचा संस्कार त्यांनी त्यांचे वडील कै. ल. दा. गोखले यांच्याकडून घेतला. त्यांचे वडील मुंबई पोर्ट ट्रस्टचे मुख्य अभियंता होते. मराठी साहित्याच्या विद्यार्थीप्रिय अध्यापिका, रुईया महाविद्यालयाच्या माजी मराठी विभाग प्रमुख प्रा. मीना गोखले या न्या. गोखले यांच्या पत्नी होत. प्रा. मीनाताईंच्या खंबीर साथीमुळेच आपल्याला अनेक अडचणींतून पुढे जाता आले असे ते आवर्जून मानतात.


समोर आलेल्या कोणत्याही विषयाचा कसून अभ्यास करणे, त्या विषयांच्या विविध बाजू पुन्हा पुन्हा तपासून पाहणे, व्यक्ती कितीही छोटी वा मोठी असो तिची बाजू समजून घेताना कोणतीही कसूर न ठेवणे आणि सर्वसामान्य माणसाविषयीची आस्था हे त्यांचे गुण, त्यांची कृती व निर्णय यांमधून प्रकर्षाने दिसून येतात.

**- ॲड. नीता प्र. कर्णिक**

०१६४

समारंभाचे प्रमुख पाहुणे

# डॉ. जब्बार पटेल



समाजात काही व्यक्ती अशा असतात की त्यांनी विविध क्षेत्रात भरपूर आणि भरीव कामगिरी करूनसुद्धा त्यांची ओळख त्यांच्या कारकिर्दीतल्या एखाद्या खास अशा कामगिरीशी निगडित असते, नव्हे तोच त्यांचा असा खास परिचय असतो. डॉ. जब्बार पटेल यांचंही असंच आहे. नाटक, चित्रपट आणि एकूणच सांस्कृतिक क्षेत्र यात त्यांच्या नावावर अनेक गौरवास्पद पराक्रम आहेत. अनेक गौरव त्यांनी प्राप्त केले आहेत. परंतु त्यांचं नाव घेताच सर्वप्रथम नजरेसमोर येतं ते त्यांचं महाराष्ट्रात आणि देशातच नव्हे तर जगभर गाजलेलं 'घाशीराम कोतवाल' हे नाटक! मराठीच नव्हे तर भारतीय रंगभूमीवरची एक सर्वश्रेष्ठ घटना असा ज्याचा सार्थ आणि यथोचित गौरव झाला त्या 'घाशीराम कोतवाल'चे दिग्दर्शक ही त्यांची सर्वकालीन ओळख आहे. या अभिजात कलाकृतीच्या आधी आणि त्यानंतरही त्यांनी प्रथम नाटक आणि मग चित्रपटात आपलं आगळं कर्तृत्व दाखवणाऱ्या कलाकृती दिल्या. परंतु तरीही 'घाशीराम'वाले जब्बार पटेल अशीच त्यांची प्रतिमा कायम जनमानसात राहिली.

'घाशीराम'नंतर 'तीन पैशांचा तमाशा' हे अगदी वेगळ्या जातकुळीचं आणि सादरीकरणाच्या अगदी नव्याच शक्यता असलेलं नाटक त्यांनी केलं. मराठी रंगभूमीवर प्रथमच पॉप म्युझिक आलं आणि त्यानं एक छानसा दणदणाट केला. कानठळ्या बसविणाऱ्या आवाजातलं नंदू भेंडेचं, 'माझं नाव अंकुश नागावकर' नाट्यसंगीताला एका आधुनिक वळणावर घेऊन आलं. पारंपरिक नाट्यसंगीताचा बाज आजूबाजूला ठेवत डॉक्टरांनी हा अतिशय आगळा आणि यशस्वी प्रयोग करून दाखवला. पारंपरिकतेच्या लक्ष्मणरेषा पाळणाऱ्यांनाही त्यांनी काही क्षण निरुत्तर करून टाकलं. 'पडघम'मध्ये त्यांनी तत्कालीन तरुण पिढीचा जोश वेगळ्या ढंगात आविष्कृत केला.

नाटकात असं दरवेळी वेगवेगळे प्रयोग करणाऱ्या डॉक्टरांकडे चित्रपटसृष्टीचं लक्ष गेलं नसतं तरच नवल...! आणि मग 'सामना'पासून त्यांची चित्रपटीय कारकिर्द सुरू झाली. तोवरच्या मराठी चित्रपटाने न चोखाळलेली वाट डॉक्टरांनी आपलीशी केली. इथेही विजय तेंडुलकर सोबत होतेच. परंतु दिग्दर्शक म्हणून डॉक्टरांनी आपली छाप पाडली. निळू फुले आणि डॉ. लागू असे दोन नटश्रेष्ठ आणि त्यांची अभिजात अदाकारी असा ऐवज होताच. परंतु डॉक्टरांनी ज्या पद्धतीने गाण्यांचा वापर केला तो विलक्षण होता. शाळा-कॉलेजात असताना जसं त्यांनी नाटकाचं अनौपचारिक शिक्षण घेतलं होतं तसंच पुण्यात नाटक करता करता फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये संधी मिळेल तेव्हा जगभरचे चित्रपट त्यांनी पाहिले होते. पुढे चित्रपट दिग्दर्शक म्हणून वावरताना त्यांना याचा खूप फायदा झाला. त्यांच्यातल्या प्रयोगशीलवृत्तीच्या कलाकाराने दुसऱ्याच चित्रपटात एक नवं आव्हान घेतलं. 'जैत रे जैत' हा भारतीय सिनेमातला एक आगळा प्रयोग आणि प्रकार ठरला. युरोप-अमेरिकेत चांगलाच दृढ असलेला 'म्युझिकल्स'चा हा भारतीय आविष्कार होता. हे तसं धाडस होतं. परंतु जब्बार पटेलांनी ते केलं. सर्वसामान्य प्रेक्षकांना असले प्रयोग पचनी पडत नाहीत. त्यामुळे बॉक्स ऑफिसचे निकष लावण्यात अर्थ नाही. परंतु एक वेगळा आणि तितकाच यशस्वी प्रयोग म्हणून 'जैत रे जैत'ला भारतीय चित्रपट इतिहासात मानाचं स्थान निश्चितच आहे. 'सिंहासन'मध्येही त्यांची ही प्रयोगशीलता ठळकपणे दिसते. जाणवते. मुळात अरुण साधू यांच्या 'मुंबई दिनांक' आणि 'सिंहासन' अशा दोन कादंबऱ्या एकत्र घेऊन त्यातून कथा आकाराला आणणं हे सुचणंच महत्त्वाचं होतं. त्यात राजकारण्यांच्या नाना तऱ्हा दाखवताना आणलेलं वेगळेपण

खास होतं. विशेषत: दत्ता भटांचा माणिकराव. खरं तर सगळे राजकीय पुढारी इथूनतिथून सारखे. परंतु त्यातही त्यांची खास वैशिष्ट्ये आणून मोनोटोनी टाळणं हे कौतुकास्पद होतं.

डॉक्टरांच्या नाटक-चित्रपटांचं आणखी एक खास वैशिष्ट्य म्हणजे त्यांचं संगीत! संगीताची अशी विलक्षण जाण असणारे दिग्दर्शक फारच थोडे आहेत. डॉ. जब्बार पटेल हे त्यातले एक महत्त्वाचे दिग्दर्शक. त्यांच्या चित्रपटाचं संगीत जरी संगीत दिग्दर्शकाचं असलं तरी दिग्दर्शक म्हणून आपल्याला काय प्रकारचं संगीत पाहिजे याची नेमकी जाण त्यांना आहे. आणि म्हणूनच त्यांच्या चित्रपटांचं संगीत वैशिष्ट्यपूर्ण ठरतं. 'सामना', 'जैत रे जैत', 'सिंहासन', 'उंबरठा', 'एक होता विदूषक', 'मुक्ता' यातली एकूण एक गाणी या विधानाची साक्ष देतील.

डॉक्टरांचा सर्वार्थाने मोठा आणि महत्त्वाकांक्षी चित्रपट म्हणजे 'बाबासाहेब आंबेडकर!' मल्याळी चित्रपटातील सुपरस्टार मामुटी याला बाबासाहेब म्हणून उभं करणं हे केवळ डॉक्टरांनाच सुचू शकतं. एकाहून एक सरस व्यक्तिरेखा अनेकानेक चित्रपटातून साकारणाऱ्या या अभिजात अभिनेत्याने बाबासाहेब आंबेडकर मूर्तिमंत साकारले आहेत. हा चित्रपट म्हणजे डॉ. जब्बार पटेल यांच्या चित्रपटीय कारकिर्दीतला आतापर्यंतचा सर्वोच्च क्षण म्हणता येईल.

डॉ. जब्बार पटेल नाटक, चित्रपट करता करता अनेक गोष्टी करत असतात. सरकारी, बिनसरकारी अनेक समित्या, संस्था यांमध्ये त्यांचा सतत वावर असतो. संगीत-नाटक अकादमी, नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा, फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, सत्यजित राय फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, कुसुमाग्रज प्रतिष्ठान, मुंबई विद्यापीठ इत्यादी अनेक मान्यताप्राप्त संस्थांमध्ये त्यांनी विविध प्रकारच्या भूमिका बजावल्या आहेत. बजावत आहेत. सध्या ते पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे संचालक आहेत.

डॉ. जब्बार पटेलांची आणखी एक खास ओळख जुन्या मंडळींच्या ध्यानीमनी आजही आहे. नवीन पिढीच्या दृष्टीने ही पूर्णत: अपरिचित गोष्ट आहे आणि ती म्हणजे अभिनेता जब्बार पटेल. शाळा-कॉलेजात प्रथमत: अभिनेता आणि मग दिग्दर्शक अशी सुरुवात करणाऱ्या डॉक्टरांनी अभिनेता म्हणूनदेखील काही काळ गाजवला. त्यांची सर्वांत गाजलेली आणि अनेकांच्या आजवर स्मरणात राहिलेली भूमिका म्हणजे विजय तेंडुलकरांच्या 'अशी पाखरे येती'मधली अरुण सरनाईकची! त्या नाटकातले तरुण, देखणे (आजही ते तसेच आहेत) डॉक्टर आणि त्यांचा तो रंगमंचावरचा वावर विलक्षण होता. त्यांना आजही कुणी काम करणार का? म्हणून विचारत असतं. राम गोपाल वर्माने 'कंपनी'मधल्या पोलीस कमिशनरच्या भूमिकेसाठी विचारलं होतं. ती मग मोहनलालने केली.

या सगळ्याच्या पलीकडे डॉक्टरांची एक खास ओळख आहे. ते जगन्मित्र आहेत. समाजातील सर्व थरांतील, सर्व वयोगटातील लोकांचे ते मित्र आहेत. त्यांच्या वागण्या-बोलण्यातला मोकळेपणा, सहजपणा त्यांना हा असा जगन्मित्र करून टाकतो. त्यामुळे नाट्य-चित्रपट दिग्दर्शक तसेच एकूणच सांस्कृतिक क्षेत्रातली त्यांची गौरवशाली कामगिरी या त्यांच्या ओळखीपेक्षा दशांगुळे वर उरते ती त्यांची हीच ओळख - जगन्मित्र!

**- अशोक राणे**

# नि वे द न

'महाराष्ट्र फाउण्डेशन' (अमेरिका)च्या समाजकार्य पुरस्कार योजनेचे हे बारावे वर्ष. १९९६ पासून ही योजना सुरू झाली. महाराष्ट्रात परिवर्तनवादी सामाजिक कार्य करणाऱ्या अनेक व्यक्ती व संस्था यांच्या कार्याचे मोल जाणून घेऊन त्याबद्दल त्यांचा कृतज्ञापूर्वक सन्मान करावा, या हेतूने अमेरिकेतील 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने ही योजना सुरू केली. सुरुवातीपासून या योजनेची कार्यवाही महाराष्ट्र फाउण्डेशनने केशव गोरे स्मारक ट्रस्टकडे सोपविली आहे.

समाजप्रबोधन, स्त्रियांचे प्रश्न व पर्यावरण–संतुलन/संरक्षण या तीन क्षेत्रांपैकी कोणत्याही क्षेत्रात कार्य करणाऱ्या दोन संस्थांना प्रत्येकी दीड लाख रुपयांचा पुरस्कार व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येते. तसेच या तीन क्षेत्रांबरोबरच जातीय सलोखा आणि परिवर्तनक्षम शैक्षणिक कार्य या दोन क्षेत्रांचा समावेश करून एकूण तीन व्यक्तींना प्रत्येकी पंचवीस हजार रुपयांचा पुरस्कार व सन्मानचिन्ह देण्यात येते.

समाजकार्य योजनेच्या दशकपूर्तीनंतर समाज बदलाच्या चळवळींमध्ये अविरत काम करणाऱ्या ज्येष्ठ कार्यकर्त्याला विशेष पुरस्कार देऊन गौरविण्याचे ठरविले. यापूर्वी शाहीर लीलाधर हेगडे, पन्नालाल सुराणा यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावर्षी प्रा. एन. डी. पाटील यांना या पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. रुपये एक लाख व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

या योजनेची कार्यवाही करण्याकरिता केशव गोरे स्मारक ट्रस्टने वरील क्षेत्रांत काम करीत असलेल्या दहा जाणकार व्यक्तींची निवड–सल्लागार समिती गठित केली. समितीने महाराष्ट्राच्या विविध भागांतील पत्रकार, प्राध्यापक, कार्यकर्ते यांच्याकडून कोणत्या संस्थेला/व्यक्तीला पुरस्कार द्यावेत, यासंबंधी अभिप्राय मागविले. तसेच, महाराष्ट्राच्या विविध भागांत प्रसिद्ध होणाऱ्या वर्तमानपत्रांतून या आशयाचे आवाहन करण्यात आले. असे अभिप्राय आल्यावर आवश्यक त्या बाबतीत अधिक माहिती मिळवून समितीने प्रत्येक पुरस्कारासाठी तीन नावांची शिफारस अमेरिकेतील महाराष्ट्र फाउण्डेशनच्या निवड समितीकडे केली. निवडीसाठी साहाय्यभूत होतील, अशा तऱ्हेच्या संस्था व व्यक्तींच्या कार्यासंबंधीची विस्तृत टिपणेही त्यासोबत पाठविण्यात आली. निवड–सल्लागार समितीत अध्यक्ष मधु आडेलकर, निमंत्रक भूषण ठाकूर व विलास वाघ, सुरेखा दळवी, विजय दिवाण, विलास भोंगाडे, रजिया पटेल, प्रतिमा जोशी, ज्योती केळकर आणि रवी देवगडकर यांचा सभासद म्हणून अतंर्भाव आहे. निवड–सल्लागार समितीने शिफारस केलेल्या नावांमधून 'महाराष्ट्र फाउण्डेशन'च्या निवड समितीने अंतिम निर्णय घेतला. या पुरस्कारांसाठी संस्था व व्यक्ती यांच्या नावांचा विचार करताना समितीने खालील बाबी विचारात घेतल्या :

१) ज्या सामाजिक संस्था व व्यक्ती आपले कार्य व विचार यांच्या साहाय्याने विवेकनिष्ठा, वैज्ञानिक दृष्टी व सामाजिक न्याय ही मूल्ये रुजविण्यासाठी सातत्याने प्रबोधनाचे कार्य करीत आहेत;

२) पर्यावरण संतुलनाचा ध्यास घेऊन त्यासाठी संशोधन, प्रयोग, लोकशिक्षण, जनसंघटन यांसारख्या विविध मार्गांनी निसर्गाच्या संरक्षणाकरिता ज्या व्यक्ती अविरत कार्य करीत आहेत;

३) ज्या व्यक्तींच्या कार्यामुळे स्त्रियांमध्ये स्वावलंबन व स्वातंत्र्य यांविषयीच्या जाणिवा वाढत आहेत आणि अन्यायाविरुद्ध झगडण्याची त्यांची ईर्षा जागृत होत आहे.

वरील बाबींबरोबरच यावर्षी पुरस्कारांकरिता मानवाधिकाराच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या संस्था आणि व्यक्तींचाही विचार करण्यात आला.

लोकवाङ्मय गृहाचे प्रकाश विश्वासराव आणि केशव गोरे स्मारक ट्रस्टचे ऋणानुबंध फार जुने आहेत. महाराष्ट्र फाउण्डेशनच्या दोन्ही पुरस्कार योजनांच्या कार्यवाहीत प्रकाश विश्वासराव अगदी सुरुवातीपासूनच सहभागी आहेत. प्रकाश विश्वासराव यांची ओळख एक यशस्वी प्रकाशक एवढीच नसून ते एक सामाजिक भान असलेले सर्जनशील कलाकारही आहेत. पुस्तकनिर्मितीमध्ये त्यांची सामाजिक दृष्टी प्रकर्षाने जाणवते, अलीकडेच लोकवाङ्मय गृहाने प्रकाशित केलेला 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' हा छायाचित्रात्मक चरित्रग्रंथ याची साक्ष आहे. त्यांच्या आजवरच्या योगदानाबद्दल त्यांचा या वर्षी केशव गोरे स्मारक ट्रस्टतर्फे आम्ही सत्कार करीत आहोत.

समाजकार्य पुरस्कार निवडीच्या या प्रक्रियेत अनेकांचे साहाय्य झाले. या सर्वांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

**भूषण ठाकूर**
निमंत्रक
महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य
पुरस्कार निवड समिती, मुंबई

# सेझ व तथाकथित औद्योगिकीकरण

चंद्रकांत केळकर

'सेझ'चे सुरक्षा, राज्याचे (state) सार्वभौमत्व यांवर होणारे जे परिणाम आहेत त्यांचा विचार मी या लेखामध्ये केलेला नाही. ते कमी महत्त्वाचे मुद्दे आहेत, असे नाही. तथापि 'सेझ'चे आर्थिक दृष्टिकोनातून जे समर्थन दिले जाते, त्याची तपासणी करणे, एवढ्यापर्यंतच या लेखातील सेझचे विश्लेषण मर्यादित ठेवले आहे.

## कायद्याच्या तरतूदी

व्यापार मंत्रालयाच्या पत्रकानुसार सेझमध्ये १,००,००० कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे; त्यापैकी २,५०० कोटी रु.ची गुंतवणूक विदेशी भांडवलाची असेल. सेझमधील या गुंतवणुकीचा सरळ (direct) परिणाम म्हणून डिसेंबर २००७ पर्यंत ५,००,००० नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होतील, अशी अपेक्षा आहे.

सेझच्या पूर्वीचा EPZ (Export Processing Zones)चा जो निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी संघटन प्रकार भारतामध्ये वापरला गेला, त्याचा हिऱ्यांच्या व संगणक प्रणालींच्या निर्यातीकरता

e१६४

मुंबई, बंगलोर यांसारख्या ठिकाणी त्या प्रकारच्या निर्यातीच्या बाबतीत यशस्वी झाल्याचा अनुभव असला तरी एकूण अर्थव्यवस्थेच्या संदर्भात हे यश नगण्य असेच होते. उदा. २००४-०५मध्ये अशा क्षेत्रांतून झालेली निर्यात केवळ ५ टक्के होती; त्यांनी केवळ कारखानदारी स्वरूपाचा १ टक्का रोजगार निर्माण केला व केवळ ०.३२ टक्केची गुंतवणूक केली. अशा उद्योगांना आपल्या परिसरातही अप्रत्यक्ष रोजगार वाढेल अशा प्रकारचा प्रभाव पाडता आला नाही (२००६-४५३३)[१]. कारण त्याकरता आवश्यक ती गुंतवणूक व उद्योजकता EPZ संघटन पुरेसे आकर्षित करू शकले नाही.

असा अनुभव असूनही EPZपेक्षा अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी २००२मध्ये सरकारने सेझचा प्रस्ताव मांडला व त्याचा सध्याच्या केंद्रशासनाने २००५मध्ये कायदा करून व फेब्रुवारी २००६मध्ये त्याविषयीचे नियम करून सेझला चालना दिली. शिवाय आपापल्या अधिकार क्षेत्राप्रमाणे राज्यांनी सवलती देणारे आपापले सेझविषयक कायदे केले.

या कायद्यांप्रमाणे केंद्र शासनाने सेझच्या क्षेत्रात येणाऱ्या उद्योगांना जवळ जवळ सर्व प्रकारच्या करांपासून पाच वर्षांच्या टप्प्याने पंधरा वर्षांकरता सूट दिली आहे. गुंतवणूकदारांचे प्रस्ताव मंजूर होण्याकरता लागणारा वेळ कमी व्हावा म्हणून काही लाल फितींना कात्री लावली आहे. देशातील इतर भागांतील कामगार, सुरक्षा, न्यायविषयक कायदे यांपासून सेझ मुक्त राहील व यासंबंधी तंट्यांबाबत निर्णय देण्याचा अधिकार सेझमधील कार्यकारी आयुक्तांकडे असेल. अशा तऱ्हेने सेझच्या कायद्यामुळे सर्व देशभर उद्योगपतींच्या मालकीची संस्थाने निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सेझना संमती देण्याकरता आलेल्या अर्जांच्या वर्गवारीचा विचार केला तर त्यापैकी ६१ टक्के अर्ज माहिती तंत्रविज्ञानाच्या क्षेत्रातीलच होते. कारखानदारी (manufacture) स्वरूपाचे अर्जांचे प्रमाण १/३च होते.

अर्जांच्या बाबतीतील दुसरा विशेष असा आहे की जी राज्ये कारखानदारी उत्पादनाबाबत आधीच पुढारलेली आहेत, अशा सात राज्यांतून एकूण प्रस्तावांच्या ८०.६ टक्के प्रस्ताव आले आहेत. यामुळे मुळात वाढलेली प्रादेशिक विषमता सेझच्या धोरणामुळे अधिक वाढेल, अशीच शक्यता दिसते. राज्यव्यापार मंत्री जयराम रमेश यांनी अलीकडे (हिंदुस्तान टाइम्स : बिझिनेस इंडिया ता. १९.९.०७)[२] हीच भीती व्यक्त केली आहे. जाहीर केलेल्या १४२ सेझ प्रकल्पांपैकी ८६ प्रकल्प, म्हणजे ६१ टक्के प्रकल्प माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील आहेत व तेही चार प्रगत राज्यांतूनच आलेले आहेत. त्यांची अपेक्षा होती, की सेझमध्ये श्रमप्रधान उद्योग अधिक आकर्षित होतील. मंत्री महोदयांची अशी अपेक्षा असणे, हे सेझच्या अंमलबजावणीमागे काहीही विचार नसल्याचे द्योतक



आहे. कारण शासनाने नवीन आर्थिक धोरण लादल्यानंतर श्रमप्रधान उद्योगांचे खच्चीकरण होऊन ते देशोधडीला लागले आहेत. त्यामुळे सेझकडे मध्यम व मोठ्या आकारमानाचे उद्योगच आकर्षित होणार हे उघड होते. तसेच ज्या राज्यांत काही प्रमाणात विकास साधलेला आहे, अशाच राज्यात हे ८६ सेझ जाहीर झाल्याचेही त्यांना अनपेक्षित होते. 'जेथे नफ्याची शक्यता अधिक तेथे गुंतवणूक' हेच जर नवीन आर्थिक धोरणाचे सूत्र आहे, तर त्यापेक्षा वेगळ्या परिणामांची अपेक्षा मंत्री महोदयांनी का करावी?

### सेझ योजनेमागील उद्देश

'सेझ'चा कायदा करताना (२००५) त्याचे पुढील हेतू गृहीत धरले आहेत : १) सेझ विभागांतून होणाऱ्या निर्यातीतून देशाला विदेशी चलन मिळेल व त्यामुळे एकूण राष्ट्रीय उत्पन्न वाढण्याचा वेग वाढेल. २) अर्थव्यवस्थेच्या औद्योगिकीकरणाला पुन्हा चालना मिळण्याकरता सेझ योजनेचा उपयोग होईल. ३) या औद्योगिकीकरणाकरता शेतीमध्ये गुंतलेल्या श्रमशक्तीला उद्योग क्षेत्राकडे वळवण्याची गरज असल्याने सेझमार्फत तो उद्देशही साध्य होईल.

'सेझ' योजनेमागील वरील उद्देश साध्य होण्याची मुळीच शक्यता नाही; उलट सेझच्या धोरणामुळे शेती क्षेत्राची, व त्यामुळे एकूण अर्थव्यवस्थेची विपन्नता वाढेल; हे पुढील विवेचनावरून लक्षात येईल.

### निर्यातीतून विकास?

१९८० ते १९९० या दशकांत खुल्या आर्थिक धोरणाचा स्वीकार केल्यानंतर दक्षिणपूर्व आशियामधील थायलंड, इंडोनेशिया, मलेशिया व दक्षिण कोरिया या देशांनी आपल्या अर्थव्यवस्थांचा निर्यातीमार्फत वेगाने विकास साधला होता (१९९८-२०४)[३] व त्या विकासाच्या गतीचे जागतिक बँकेने 'चमत्कार' असेच वर्णन केले होते. हा विकास त्यांच्या वाढणाऱ्या निर्यातीमुळे झाला होता, असे वाटत असले तरी त्या निर्यातीची घडण दक्षिण कोरिया वगळता इतर देशांच्या बाबतीत प्राथमिक स्वरूपाच्या निर्यातीचीच होती. विशेष म्हणजे ही निर्यात नवीन तंत्रविज्ञान आत्मसात केलेल्या उत्पादनांची नसल्याने तिचे स्वरूप टिकाऊ नव्हते. इंडोनेशियाची निर्यात प्रामुख्याने तेल, वायू व खनिज या स्वरूपाची, तर थायलंडची कापड व पर्यटन, ज्यामध्ये स्त्रियांचा वापर मोठ्या प्रमाणावर होत होता. फिलिपिन्सची निर्यात इमारती लाकूड वगैरे सारख्या प्राथमिक वस्तूंच्या स्वरूपाची होती. केवळ दक्षिण कोरियाची निर्यात कारखानदारी उत्पादनांची होती. त्यामुळे ज्यावेळी प्रथम थायलंडच्या बाथ या चलनावर सट्टेबाजी झाली व त्यामुळे त्याचे मूल्य वेगाने घसरले मग इतर देशांची चलनेही त्या पाठोपाठ बाथसारखीच घसरली. त्यावेळी त्यापूर्वी दोन दशके वेगाने विकास साधणाऱ्या या अर्थव्यवस्था पत्त्यांच्या बंगल्यासारख्या कोसळल्या.

तसेच चीनच्या वेगाने झालेल्या आर्थिक विकासाचे श्रेय त्या देशाच्या निर्यात वाढीला दिले जाते (२००७-३८४९)[४]. परंतु भारत व चीन यांच्या निर्यातीतील एक मूलभूत फरक लक्षात घेणे आवश्यक आहे; तो म्हणजे चीनची निर्यात श्रमप्रधान वस्तूंची असल्याने वाढत्या निर्यातीमुळे रोजगारही वाढला. परंतु भारताची निर्यात भांडवलप्रधान वस्तूंची असल्याने त्या निर्यात वाढीचा परिणाम रोजगारावर होत नाही. तसेच चीनमध्ये भारताशी तुलना करता १९८०पासूनचा दारिद्र्य हटविण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणात यशस्वी झाला आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या अंदाजाप्रमाणे २००४पर्यंत चीनमधील दारिद्र्य ९.९ टक्क्यांपर्यंत खाली आले आहे. तर भारतामध्ये ते प्रमाण अजूनही २४ टक्के इतके वर आहे. शिवाय चीनमध्ये जमिनीसारख्या मूलभूत संसाधनांचे वाटप न्याय्य पद्धतीने झालेले आहे. या उलट भारताला याबाबतीत पूर्ण अपयश आले आहे. शिवाय चीनच्या निर्यातीवर अवलंबून राहण्याच्या धोरणामुळे प्रगत राष्ट्रांमध्ये, विशेषत: अमेरिकेमध्ये येऊ घातलेली मंदी, चीनमध्ये पेचप्रसंग निर्माण करील असे दिसत आहे.

विकासासाठी निर्यातीवर अवलंबून राहणाऱ्या या देशांचे विदेशी चलनाचे बाजार आता त्या अर्थव्यवस्था खुल्या झाल्यामुळे जगातील इतर विदेशी चलनबाजारांना जोडले गेले आहेत. त्यामुळे त्यांच्या चलनाची अस्थिरता अत्यल्प काळात सार्वत्रिक होण्यास अशी जोडणी कारणीभूत झाली. म्हणूनच या देशांनी दोन दशके अनुभविलेला विकास काही महिन्यातच नष्टप्राय झाला. व त्या अवस्थेतून बाहेर पडण्यास त्यांना बराच काळ लागला.

त्यामुळे भारताकडे जमा झालेल्या विदेशी चलनाच्या गंगाजळीचे बदलत जाणारे स्वरूप व भारताच्या विदेशी चलन बाजाराची इतर देशांच्या चलनबाजारांशी झालेली जोडणी लक्षात घेता विकासाकरता निर्यातीवर अवलंबून राहण्यातले धोके समजावून घेतले पाहिजेत. एक, दक्षिणपूर्व आशियातील देश ज्या प्रकारच्या परिस्थितीत सापडले त्या परिस्थितीत सर्वसाधारणपणे सापडलेल्या देशातील दिवाळ्यात निघालेल्या बँका व उद्योग विदेशी गुंतवणूकदार पडल्या भावात खरेदी करतात व त्या अर्थव्यवस्थांवर वर्चस्व मिळवितात. दुसरे, विदेशी चलनबाजारांच्या झालेल्या जोडणीमुळे चलनाच्या

मूल्यामध्ये होणाऱ्या वटघटीचा त्या देशाच्या निर्यातीच्या स्पर्धाक्षमतेवर तात्काळ परिणाम होत असतो. उदाहरणार्थ, सध्या भारताच्या रुपयाचे डॉलरच्या संदर्भातील मूल्य वधारलेले असल्याने संगणक प्रणालींच्या निर्यातीची स्पर्धाक्षमता घटलेली आहे. कारण रुपया वधारल्यामुळे या प्रणाली महाग होत आहेत. थोडक्यात, अर्थव्यवस्था एरव्ही सुदृढ असूनही चलनाच्या मूल्यातील बदलामुळे पूर्ण अर्थव्यवस्थाच अडचणीत येणे शक्य असते. व अर्थव्यवस्थेची निर्यातीवरची निर्भरता जितकी अधिक, तितका हा धोका अधिक.

भारताचा विचार केला तर २००६-०७ या वर्षात भारतामध्ये विदेशी वित्तसंस्थांमार्फत येत असलेले वित्तभांडवल अर्थव्यवस्थेला धोका निर्माण करू शकेल. ऑक्टोबर २००७च्या एका आठवड्यात २००५-०६ या वर्षभरात आलेल्या वित्त भांडवलापेक्षा जास्त भांडवलाची सट्टेबाजीकरता आयात झाली आहे. वित्तभांडवलाची आलेली ही त्सुनामी लाट तशीच परत फिरल्यास भारताची अर्थव्यवस्था देशोधडीला लागल्याशिवाय राहणार नाही. दक्षिणपूर्व आशियातील देशांच्या अर्थव्यवस्था त्या वेळी सुदृढ असल्यामुळे त्या १९९७मधील आपत्तीतून चार-पाच वर्षांत पुन्हा उभ्या राहू शकल्या. परंतु भारतीय अर्थव्यवस्था मुळातच अशक्त असताना जर परकीय चलनबाजारात आपत्ती आली तर तिची दारूण अवस्था होईल.

निर्यातीवर निर्भर राहून विकास साधू पाहणाऱ्या अर्थव्यवस्थेची गत काय होते; निर्यात हे विकासाचे इंजिन असू शकते, या विश्वासाने सेझचे धोरण आपण अवलंबिल्यास त्यात कोणता धोका आहे हे मांडण्याकरता थोड्याशा तपशिलात वरील मुद्दा मांडला आहे.

### भारताच्या आर्थिक विकासाचे आजचे स्वरूप

अर्थव्यवस्थेचे तीन विभाग कल्पितात : शेती क्षेत्र, उद्योग क्षेत्र व सेवा क्षेत्र. साधारणपणे देशाचा आर्थिक विकास होत असताना अर्थव्यवस्थेत जे बदल होतात ते या तीन क्षेत्रांतील बदलांतून दिसत असतात. प्रथम, शेती क्षेत्राचा विकास होतो, त्यातील उत्पादनाचा वेग वाढतो. त्यामुळे उद्योग क्षेत्रामधील उत्पादनाचा वेग वाढतो. कारण पहिल्या क्षेत्रातील वाढलेल्या उत्पन्नामुळे जी औद्योगिक उत्पादनाला मागणी वाढते ती पुरविण्याकरता उद्योजक उत्पादन करतात. दोन्ही क्षेत्रांतील या बदलांमुळे त्या क्षेत्रांतील रोजगार वाढतो व अखेरीला या विकासामुळे आवश्यक होणाऱ्या वाहतूक, बँका, व्यापार यांसारख्या सेवांमध्ये वाढ होऊन सेवा क्षेत्र विकासते व तेथील रोजगारही वाढतो. विकासाचा हा क्रम अर्थव्यवस्थेला सुस्थिर पायावर उभी करतो व विकासाचे-वृद्धीचे सातत्य राखतो.

१९९१ नंतर भारताच्या 'वेगाने' होणाऱ्या 'विकासा'चे आजचे चित्र कसे आहे? तर शेती क्षेत्रातील उत्पादनाच्या वाढीचा वेग लोकसंख्येच्या वाढीच्या वेगापेक्षाही कमी म्हणजे १.२५ टक्क्यांवर आला आहे. स्वातंत्र्यानंतर प्रथमच शेती चिंताजनकरित्या कुंठितावस्थेत आली आहे. उद्योग क्षेत्रामध्ये १९९५-९६ पर्यंत औद्योगिक उत्पादनाचा वेग जो वाढताना दिसत होता तो त्यानंतर घसरू लागला आहे. त्यामुळे दोन्ही क्षेत्रांमध्ये बेरोजगारी वाढत आहे. फक्त, सेवा क्षेत्रामध्ये रोजगार व उत्पन्न वाढताना दिसत आहे. पुढील तक्त्यावरून भारतीय अर्थव्यवस्थेत होणारे हे बदल स्पष्ट होतील.

सेवाक्षेत्रातील या बदलामुळे अर्थव्यवस्थेला लवचिकपणा (resilience) आला आहे, असे त्याबाबतचे रिझर्व्ह बँकेचे भाष्य आहे. सेवा क्षेत्रातील या विकासाची अधिक तपासणी केली तर या भाष्यातील आत्मतुष्टता लक्षात येईल. २००२च्या रोजगार निर्मितीच्या विशेष गटाच्या अहवालाप्रमाणे सेवा क्षेत्रामधील वाढलेल्या रोजगारामधील ९१%चा वाटा अनौपचारिक सेवाक्षेत्राचा व केवळ ८.३४% वाटा औपचारिक क्षेत्राचा आहे. फेरीवाले, हातगाडीने वाहतूक करणारे, छोटे स्वयंरोजगारी

**भारताच्या अर्थव्यवस्थेतील क्षेत्रीय बदल**

| राष्ट्रीय उत्पन्नाशी प्रमाण | | | एकूण रोजगाराशी प्रमाण |
|---|---|---|---|
| क्षेत्र | १९५० | १९९० दशक | २००२ |
| १. शेती | ५५.५३% | २८.६६% | ६०.४% |
| २. उद्योग | १६% | २७% | १६.८% |
| ३. सेवा | २८% | ४४% | २२.७% |

*आधार : (२००४-४१७५)*.




अशा प्रकारच्या सेवा अनौपचारिक क्षेत्रामध्ये येतात. तर बँका, रेल्वे-हमरस्त्यावरील वाहतूक, आय.टी. यांसारख्या सेवा औपचारिक क्षेत्रामध्ये अंतर्भूत होतात. ही विभागणी लक्षात घेतली की भारताच्या तथाकथित विकासाचे चित्र स्पष्ट होते. भारताच्या अर्थव्यवस्थेच्या सेवा क्षेत्राला आलेली ही जी सूज आहे ती इतर दोन्ही क्षेत्रांतील बेरोजगार झालेल्या श्रमशक्तीला मिळेल तो रोजगार पत्करावा लागल्याने झाली आहे, हे लक्षात येईल.

गाजावाजा होत असलेल्या उफराट्या विकासाचे हेच खरे विद्रूप रूप आहे. या उफराट्या विकासाचे एकमेव कारण भारताने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या दडपणाखाली १९९१ नंतर जी आर्थिक विकासाची नीती स्वीकारली त्यामध्ये सापडते. याचाच ऊहापोह या लेखाच्या पुढील भागात केला आहे.

## शेतीक्षेत्राची अक्षम्य हेळसांड

भारताने नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केल्यानंतर भारताच्या शेती क्षेत्राची जाणीवपूर्वक गळचेपी झाली आहे. संतुलित अंदाजपत्रकाच्या धोरणाचा आग्रह नाणेनिधीने धरल्यामुळे केंद्राच्या अंदाजपत्रकांमधून शेती क्षेत्रातील भांडवल गुंतवणुकीकरता होणाऱ्या खर्चाचे उच्चाटन झाले. परिणामी गेली पाच वर्षे शेती उत्पादनाच्या वाढीचा दर पूर्वी कधी नव्हता इतका, म्हणजे १.२५टक्क्यांवर, म्हणजे लोकसंख्येच्या वाढीच्या दरापेक्षाही कमी झाला आहे. शेती क्षेत्रातील असा पेचप्रसंग भारत इंग्रजी अंमलाखाली असतानाच्या पेचप्रसंगानंतर प्रथमच येत आहे.

भारताच्या बिगरशेती क्षेत्रातील वृद्धी ही सतत शेतीक्षेत्रातील उत्पादनाच्या वृद्धीच्या दराशी निगडित राहिली आहे. त्यामुळे औद्योगिक उत्पादनातील वृद्धीचा दर मंदावण्यामागचे महत्त्वाचे कारण शेती क्षेत्रातील उत्पन्न कमी झाल्यामुळे, कमी झालेल्या क्रयशक्तीमुळे व म्हणून कमी झालेल्या प्रभावी मागणीमध्ये सापडते. त्यामुळे उद्योजकांना सेझच्या स्वरूपात नानाविध सवलती देऊन ते नवीन गुंतवणूक करतील अशी अपेक्षा करणे तर्कदुष्ट आहे. एक तर अशा सवलतींमुळे शासनाचे अब्जावधी रुपयांचे करांपासूनचे उत्पन्न पुढील पंधरा वर्षांकरता बुडणार आहे. शासनाने निर्यातीकरता दिलेल्या करसवलती पोटी २००४-०५ या वर्षी गमावलेल्या प्राप्तीचा आकडा ३५,४३० कोटी रुपये इतका आहे. तसेच येत्या पंधरा वर्षांत प्रभावी मागणीच्या अभावी सेझमध्ये केलेल्या औद्योगिक उत्पादनाला पुरेशी मागणी असणार नाही. त्यामुळे सेझच्या क्षेत्रातील उद्योगांत गुंतवणूक होणे व त्यापासून उत्पादन वाढणे संभवत नाही.

शेती क्षेत्र मुळातच पेचप्रसंगात असताना ते क्षेत्र अधिक देशोधडीला कसे लागेल, असेच शासनाचे धोरण राहिले आहे. ज्या प्रमाणात सेझसाठी पिकाऊ जमीन उद्योगांसाठी वापरली जाईल, तितक्या प्रमाणात शेतीचे उत्पादन अधिक

घटेल. त्याशिवाय शेतीवर उपजीविका करणारा लहान शेतकरी व शेतमजूर त्याच्या स्थिरावलेल्या परिसरातून मोठ्या प्रमाणात उखडला जाईल. या दोन गोष्टींमुळे शेतीच्या विपन्नावस्थेत अधिक भर पडेल व त्यांच्या क्रयशक्तीत, म्हणजेच प्रभावी मागणीत घट होईल. शेतक्षेत्रातून उद्‌ध्वस्त होणारे हे मनुष्यबळ शेतीची कुंठितावस्था अधिक घट्ट (reinforce) करील.

शेतीक्षेत्राला शासन पक्षपाती वागणूक देत आहे असे दिसते. एका बाजूला आयातीचे धोरण शिथिल करून व त्यायोगे शेती उत्पादनाला स्पर्धा वाढवून शेतकऱ्याला बाजारात टिकून राहणे कठीण केले आहे. दुसऱ्या बाजूला त्याला मिळणाऱ्या उत्पादन खर्चातील सवलती (subsidy) कमी केल्या आहेत. या उलट सेझमध्ये उद्योजकांवर येत्या पंधरा वर्षांकरता सवलतींची खैरात केली आहे. आपल्याच अर्थव्यवस्थेतील दोन क्षेत्रांबाबतीत शासनाने दाखविलेला हा सापत्न भाव लक्षात घेतला तर नाणेनिधीसारख्या संस्थांच्या दबावाखाली असलेले हे शासन देशाच्या अर्थव्यवस्थेच्या दिवाळ्याची तयारी करीत आहे, हे लक्षात येईल.

सेझच्या क्षेत्रांमधील उद्योजकांना ज्या सवलती दिल्या जाणार आहेत त्यापोटी १,८०,००० कोटी रुपयांचा महसूल घटणार असल्याचा अंदाज आहे. याची भरपाई करण्याकरता शासनाला सामान्य नागरिकांवर अप्रत्यक्ष करांचे ओझे लादावे लागेल. नवीन आर्थिक धोरण स्वीकारल्यानंतर मुळातील आर्थिक विषमता अधिक तीव्र झाली आहे. अप्रत्यक्ष करांचे ओझे वाढल्यावर ती अधिकच तीव्र होईल, हे स्पष्ट आहे. २००५च्या 'मानव विकास अहवाल'ने नि:संदिग्धपणे म्हटले आहे की अति आर्थिक विषमतेच्या स्थितीमध्ये देशाच्या विकास दरात वाढ होणे संभवत नाही. गुंतवणूकीच्या जोडीला उत्पन्नाचे सम्यक वितरण असेल तरच दारिद्र्य रेषेखालची लोकसंख्या कमी होऊ शकेल, असा या अहवालाचा निष्कर्ष आहे. (UNDP - २००५, पृ. ६)[७].

## सेझ व रोजगार वाढ?

सेझमुळे जी नवीन गुंतवणूक होईल त्यामुळे रोजगार वाढेल असा फसवा युक्तिवाद केला जातो. गेल्या पाच वर्षात औद्योगिक क्षेत्रात गुंतवणूक होऊनही कारखानदारी रोजगारामध्ये वाढ झालेली नाही, हे पाहता सेझमध्ये उद्योजकांनी नवीन गुंतवणूक केल्यास रोजगार वाढेल, हे संभवत नाही. तसेच सर्व प्रकारच्या सवलतींच्या आधारे केलेल्या उत्पादनाची सेझ बाहेरील उत्पादनाशी जी स्पर्धा होईल त्यामुळे सेझबाहेरील उत्पादन घटेल व तेथे बेकारी येईल. त्याचप्रमाणे ज्या शेतीक्षेत्राच्या जागी सेझ प्रस्थापित होईल, तेथील शेतकरी बेकार व बेघर होईल, त्याच्या बेरोजगारीचा विचार या रोजगाराच्या गणितात असणार नाही. म्हणून सेझमुळे रोजगार वाढेल, विकास दर वाढेल हे सेझ पुरस्कर्त्यांचे दावे निखालसपणे खोटे आहेत, हे लक्षात येईल.

## सेझमागील उपपत्तिक आधार?

सेझच्या संकल्पनेमागे लुइसच्या सिद्धान्तनातील विचार आहे असे दिसते. सेझच्या क्षेत्रातील विस्थापित झालेली श्रमशक्ती तेथील उद्योगांत सामावली जाईल, अशा अपेक्षेचा हा युक्तिवाद आहे. एक तर आपल्या देशातील विस्थापितांच्या पुनर्वसनाविषयीच्या कथा सर्वांनाच माहीत आहेत. दुसरे, वर उल्लेखिल्याप्रमाणे भारताची अर्थव्यवस्था जोमदारपणे सात टक्के विकास दराने पुढे झेपावत आहे, असे म्हणत असताना नवीन आर्थिक धोरणाच्या अंमलबजावणीनंतरच्या पंधरा वर्षांत कारखानदारी उद्योगांत रोजगार वाढलेला नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे श्रमशक्तीच्या अमर्याद पुरवठ्यातून श्रमशक्तीचे स्थलांतर होऊन आर्थिक विकास घडून येण्याची शक्यता व्यवहारात उतरणार नाही, हेही स्पष्ट आहे.

आज प्रगत असलेल्या देशांच्या विकासाच्या काळात शेती क्षेत्राकडून औद्योगिक क्षेत्राकडे श्रमशक्ती वळविणे त्या वेळच्या सरंजामशाही समाजव्यवस्थेमुळे शक्य झाले. अलीकडच्या काळात सोव्हिएत रशियाने आपल्या औद्योगिकीकरणाच्या सुरुवातीच्या काळात श्रमशक्तीचे असे स्थलांतर घडवून आणल्याचा इतिहासात दाखला आहे. परंतु एक तर सोव्हिएत रशियाची अर्थव्यवस्था नियोजनबद्ध विकासाचे धोरण अवलंबणारी अर्थव्यवस्था होती. दुसरे, रशियाने श्रमशक्तीच्या स्थलांतराची किंमत प्रचंड मनुष्यहानीच्या स्वरूपात मोजली होती. भारतात कदाचित असेच चित्र दिसेल, की बेकार, बेघर झालेल्या खेड्यांतील लोकांचे लोंढे शहरांतील पदपथांचा आश्रय घेतील.

## औद्योगिक कुंठितावस्थेची खरी कारणे

भारताच्या औद्योगिक क्षेत्रातील कुंठितावस्थेचे स्पष्टीकरण खरे तर भारतावर नाणेनिधीने लादलेल्या नवीन आर्थिक धोरणात सापडते. कितीही सेझची बेटे तयार केली तरी मुळांत अर्थव्यवस्थेतील प्रभावी मागणी जोपर्यंत जोमदार होत नाही, तोपर्यंत उद्योजक नवीन गुंतवणुकीला प्रवृत्त होणार नाहीत. टिपणाच्या आतापर्यंतच्या मांडणीमध्ये म्हटल्याप्रमाणे ही प्रभावी मागणी जोमदार न होण्याची चार प्रमुख कारणे आहेत : एक, भारतीय अर्थव्यवस्थेचा सशक्तपणा हा शेती क्षेत्राच्या सशक्तपणावर नेहमीच अवलंबून राहत आला आहे

व गेली पंधरा-सतरा वर्षे शेतीक्षेत्राची बुद्ध्या उपेक्षा केल्याने ती कुंठितावस्थेत गेली आहे. दुसरे, नवीन आर्थिक धोरणाच्या अंमलबजावणीनंतर देशातील आर्थिक विषमता अधिक प्रखर झाली आहे. त्यामुळे त्याचा प्रभावी मागणीवर प्रतिकूल परिणाम होत आहे. तिसरे, उद्योजकांकडे जे भांडवल गुंतवण्याजोगे असेल त्याला औद्योगिक गुंतवणुकीपेक्षा वित्तबाजारातील सट्टेबाजीचा अधिक नफादायक पर्याय उपलब्ध झाला असल्यामुळेही औद्योगिक क्षेत्रातील गुंतवणुकीमध्ये शैथिल्य आले आहे, असे म्हणता येते. व अखेरीला, औद्योगिक क्षेत्रामध्ये 'तथाकथित उद्योजकां'चे मोठे प्रमाण आहे. असे 'उद्योजक' केवळ गुन्हेगारी स्वरूपाच्या फसवणुकीकरताच कार्यप्रवण होत असतात. उदाहरणार्थ, १९९२नंतर भारताच्या शेअरबाजारात ज्या उद्योजकांनी नवीन शेअर विकायला काढून गुंतवण्यासाठी भांडवल उभे केले त्यांतील ३५ टक्के ते ४० टक्के उद्योजक पुढील काही वर्षांत गायब झाले. अलीकडे स्थापन झालेल्या 'ऑन लाइन इन्व्हेस्टर्स हेल्पलाइन'तर्फे प्रसिद्ध झालेल्या माहितीप्रमाणे (एशिअन एज, १२.०९.०७) सेबीकडे रजिस्टर केलेल्या कंपन्यांपैकी ९० टक्के कंपन्यांनी गुंतवणुकदारांची विविध स्वरूपाची फसवणूक केलेली आढळते. अशा तऱ्हेने फसवणूक झालेल्या लहान गुंतवणूकदाराच्या गुंतलेल्या रकमेचा अंदाज १०,००० कोटी रुपये इतका आहे व त्याला सेबी नियंत्रक संस्था म्हणून कोणतेही संरक्षण देऊ शकलेली नाही.

सेझच्या समस्येला एक वेगळे असे अंगही असावे. भारतातील सेझची स्थळे (locations) समुद्र किनारपट्टी किंवा पाण्याचा साठा उपलब्ध असलेली ठिकाणे यांच्याशी निगडित असल्याचे दिसते. आंतरराष्ट्रीय पटावर येत्या पन्नास वर्षांत पाण्याचे साठे असलेले देश महत्त्व पावणार आहेत. पाण्याचा व्यापार करणाऱ्या कंपन्यांच्या दृष्टीने २०५० पर्यंत पाण्याची मागणी व शुद्ध पाण्याचा पुरवठा यांमध्ये पडणाऱ्या तफावतीमुळे पाण्याकरता मोठी जागतिक बाजारपेठ निर्माण होणार आहे. आज ४०० अब्ज डॉलरची पाण्याची जागतिक बाजारपेठ आहे; ती लवकरच ८०० अब्ज डॉलरची बाजारपेठ होईल. आज अमेरिका व युरोपमधील बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या हातात हा पाण्याचा व्यापार आहे. या कंपन्या तो व्यापार वाढवू पाहात आहेत. भारतातील सेझचा वाढणारा रेटा हा पाण्याचा व्यापार करणाऱ्या कंपन्यांच्या दबावातून पुढे आला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण काही देशांना कर्ज देताना नाणे निधीने त्या देशातील पाण्याच्या व्यवहारांचे खाजगीकरण करण्याची अट घातली होती. भारतातही पाण्याच्या व्यवहारांचे खाजगीकरण करण्याची प्रक्रिया नद्यांचे पाणी किंवा पात्राचा काही भाग खाजगी कंपन्यांना विकून व 'पाण्याचे धोरण' जाहीर करून शासनाने सुरू केले आहे.

थोडक्यात, सेझचे धोरण शेती क्षेत्राला व त्यात गुंतलेल्या मनुष्यबळाला अधिक विपन्न करणारे; त्यामुळेच औद्योगिक क्षेत्र व एकूण अर्थव्यवस्थेला कुंठितावस्था आणणारे; एकूण



बेरोजगारी व आर्थिक विषमता वाढविणारे ठरेल. ज्या औद्योगिकीकरणाला गती देण्याच्या उद्देशाने (त्या संबंधातील प्रामाणिकपणा गृहीत धरून) सेझचे धोरण शासनाने स्वीकारले आहे, त्याचा विचार केल्यास प्रत्यक्षात दुसऱ्या निर्औद्योगिकीकरणाचे (de-industrialisation) सेझ योजना हे पाऊल ठरेल. (नवीन आर्थिक धोरणामुळे जे देशी उद्योगांवर आक्रमण झाले होते, त्याचे वर्णन काही उद्योजकांनी निर्औद्योगिकीकरण असे केली आहे.)

औद्योगिकीकरणाकरता सेझविषयक कायदा करताना शासनाकडे काही एकात्म असे धोरण आहे; सेझचे धोरण राबवायचे तर त्यामध्ये कोणत्या अडचणी संभवतात व त्या कशा दूर कराव्यात वगैरे विषयीचा काही नियोजनात्मक विचार वेळीच केलेला आहे, असे दिसत नाही. उदा. एका बाजूला पंचायतराज व्यवस्था मजबूत करण्यासाठी घटनेमध्ये ७३वी दुरुस्ती करून ग्रामपंचायती सक्षम करण्याचा प्रयत्न शासनाने केला. तसेच शासनाने रोजगार हमीचा कायदा करून ग्रामीण भागात रोजगार वाढीसाठी एक ठोस योजना स्वीकारली. त्या पाठोपाठ या निर्णयांना छेद जाईल अशी सेझ योजनाही शासनाने अंमलात आणण्याचा निर्णय घेतला. उदा. घटनादुरुस्तीप्रमाणे गावातील जमीन, पाणी यांचा वापर करण्याविषयीचा निर्णय घेण्याचा अधिकार जर ग्रामपंचायतीचा असेल, तर केंद्र किंवा राज्यशासन या विषयीचे निर्णय सेझच्या कार्यकारी आयुक्तांकडे कसे सोपविते? तसेच सेझच्या तरतुदींच्या परिणामांविषयीचा अभ्यास करण्याची गरज दोन्ही पातळ्यांवरच्या शासनांना जाणवलेली दिसत नाही. असे होण्याचे एकच कारण दिसते : नागरिकांना रुचतील अशा केलेल्या घोषणा कागदावर ठेऊन नाणेनिधी व भारतीय भांडवलदारांना हव्या असलेल्या योजना सर्व ताकदीनिशी अंमलात आणायच्या, हे जे धोरण १९९० पासून केंद्र शासनाने अवलंबिले आहे, ते आहे.

खरे तर आज भारतीय अर्थव्यवस्थेचे रूप मायावी शूर्पनखेसारखे झाले आहे. वास्तव काय आहे? तर गेली तीन महिने औद्योगिक उत्पादनाच्या वाढीचा दर दोन आकडी होता, तो एक आकडी झाला आहे. या काळात शेअर बाजारात शेअरच्या किंमती नवीन उच्चांक गाठीत आहेत : एकदा १५,०००चे छत भेदले, तर १९ सप्टेंबरला १६,०००चे छत भेदले. तर ९ ऑक्टोबरला १८,०००चे छत भेदून निर्देशांक अधिक उंचीवर गेला आहे. जर उद्योगांच्या स्थितीचे शेअर बाजारात प्रतिबिंब पडत असेल तर असे का झाले? कारण भारताच्या अर्थव्यवस्थेचे शूर्पनखेचे खरे रूप लपवून तिचे मायावी रूपच जनतेला दाखविण्याचा शासन, भांडवलशहा व सर्व माध्यमे यांनी चंग बांधला आहे.

नवीन आर्थिक धोरणाचा विचार करताना डावेसुद्धा गोंधळात सापडले आहेत असे दिसते. त्यामुळे त्यांची औद्योगिकीकरणाविषयीची दृष्टी काँग्रेससारखीच राहिली आहे, असे म्हणावे लागते. म्हणून सेझ कायदा मंजूर होताना त्यांनी कायद्यात केवळ कामगारांच्या हिताच्या दुरुस्त्या करवून घेतल्या.

या बाबतच्या दोनच बोलक्या उदाहरणांचा विचार करू. पहिले इंडोनेशियातील एका सलीम नावाच्या व्यावसायिक गटाने ४४,००० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा प्रकल्प पश्चिम बंगाल सरकारपुढे मांडला (२००५-३८८५)[८]. त्यामध्ये ३०,००० श्रमिकांना रोजगार मिळणार होता व त्याकरता त्यांना ५१०० एकर जमीन हवी होती. ही गुंतवणूक औद्योगिक उत्पादन वाढविण्यासाठी नव्हती; तर पर्यटन, गोल्फचे मैदान, यांसारख्या व्यवसायात ती गुंतवणूक होणार आहे. एवढ्याच रोजगारांसाठी एखाद्या कारखानदारी उद्योगाकरता १००० एकर जमीन पुरेशी आहे. असे असूनसुद्धा पश्चिम बंगाल सरकारने सलीम गटाच्या या देकाराचा अनुकूल विचार केला. यावरून जमिनीसारख्या नैसर्गिक साधनाचा वापर करताना अन्नोत्पादनाची गरज भागविण्यासाठी करणे व तिचा पर्यटनासाठी उपयोग करणे, यांमधील पश्चिम बंगाल शासनाने दाखविलेले प्राथम्य स्पष्ट होते. दुसरे उदाहरण, पश्चिम बंगाल सरकारने टाटाचा कारखाना व्हावा हे पाहताना व टाटाच्या मोटर कारच्या प्रकल्पाच्या १००० कोटी रुपयाच्या गुंतवणूकीसाठी ८५० कोटी इतकी सबसिडी देऊ केली (२००७-१५९७)[९]. मोटर कारचे कारखानदारी उत्पादन कोणासाठी? कशा तऱ्हेने उभ्या केलेल्या कराच्या उत्पन्नातून टाटांच्या कारखान्यातील उत्पादनाला सबसिडी मिळणार आहे? विकासाच्या वरील दृष्टिकोनामुळे या बाबींचा विचार त्या शासनाला महत्त्वाचा वाटला नाही, असेच म्हणावे लागते. जमिनीसारख्या महत्त्वाच्या संसाधनांचा विचार करताना पश्चिम बंगाल शासनाने पर्यटन, गोल्फ मैदान यांना प्राथम्य देणे हे त्यांच्या डाव्या भूमिकेशी विसंगत आहे; व ही विसंगती 'औद्योगिकीकरण म्हणजे विकास' या दृष्टिकोनामुळे उद्भवली आहे.

### सेझ नको तर काय हवे?

वरील विवेचन एका अर्थी केवळ नकारात्मक आहे. जोपर्यंत मोठ्या उद्योगांच्या निर्मितीच्या साहाय्यानेच आर्थिक विकास होतो. हा नवीन आर्थिक धोरणाने नकळत डाव्यांच्याही गळी उतरविलेला दृष्टिकोन आपण नाकारत नाही व त्याऐवजी आज आर्थिक विकासाकरता कोणते धोरण स्वीकारले पाहिजे हे मांडत नाही, तोपर्यंत वरील विवेचन सकारात्मक होणार नाही.

औद्योगिकीकरणाकरता महाकाय उद्योगांच्या निर्मितीची

गरज आहे. अशा औद्योगिकीकरणाकरता जमीन, पाणी आदिकरून संसाधनांचा वापर प्राथम्याने (priority) व्हावयास हवा, हा सेझ कायद्यामागचा दृष्टिकोन आहे. या उद्योगांना केवळ अशाच उत्पादनाच्या क्षेत्रात त्यांना आवश्यक तो नफा होईल की ज्या उत्पादनाची विक्री होऊ शकेल व आजचे अधिकाधिक विषम होत जाणारे उत्पन्नाचे वाटप लक्षात घेता, त्या अशाच वस्तू असू शकतील की ज्या श्रीमंत वर्गाच्या चैनीच्या वस्तू असतील. मग त्या चैनीच्या वस्तूंचे उत्पादन व सेवन सुकर व्हावे यासाठी उड्डाणपूल, महामार्ग, मेट्रो रेल्वे, शहरातील टोलेजंग निवासांसाठी लागणारी नागरी व्यवस्था यांवर सार्वजनिक क्षेत्रात शासन खर्च करीत राहील. या प्रकारच्या व्यवस्थेतून उत्पन्नातील विषमता अधिक वाढत राहील असे जागतिकीकरणाशी निगडित असलेल्या 'औद्योगिकीकरणातून विकास' या दृष्टिकोणाचे सूत्र आहे.

विकसनशील देशांच्या संदर्भात विचार करता या सूत्राला आणखी एक पदर आहे. विकसनशील देशांमध्ये या मार्गाने जाणाऱ्या विकासासाठी लागणारे भांडवल विदेशी भांडवल असले तर त्या उद्योगांना होणारा नफा परदेशाची वाट धरतो. असा महाकाय उद्योग देशी असो वा विदेशी, वर म्हटल्याप्रमाणे त्यामधील रोजगार न वाढता तो उत्तरोत्तर कमीच होत जात आहे. उदाहरणार्थ, जमशेदपूरच्या टाटांच्या पोलाद उद्योगातील रोजगार १९९१ ते २००५ दरम्यान ८५००० कामगारांऐवजी ४४००० कामगारांपर्यंत म्हणजे जवळ जवळ निम्म्यापर्यंत घटला (२००७-१५९७)[१०]. दुसऱ्या भाषेत हेच मांडायचे तर भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास दर ८ टक्के असताना त्या काळातील रोजगारातील वाढ केवळ १ टक्का आहे; व त्याचवेळी ग्रामीण बेकारीत वाढ झाली आहे.

सेझमागील वरील दृष्टिकोणाला पर्याय मांडताना पुढील प्रश्नांची उत्तरे कोणती आहेत, याला महत्त्व आहे : १) वाढणाऱ्या उत्पादनाची घडण कोणती? २) ते उत्पादन कोणासाठी? म्हणजे विकास कोणासाठी? आर्थिक विकास साधताना वाढणारे उत्पादन हे सामान्य माणसाच्या गरजेच्या वस्तूंचे असणे आवश्यक आहे. व ते प्रथमत: शेतीक्षेत्रातूनच येऊ शकते. शेती क्षेत्राची गेल्या पंधरा वर्षांची उपासमार थांबवून त्यातील दर मजूरामागची उत्पादकता, म्हणजे शेतीक्षेत्रातील उत्पादनाला प्राथम्य देऊन वाढविले पाहिजे. यामुळे एकाच वेळी दोन गोष्टी साध्य होतील. एक, शेतीक्षेत्रातील रोजगार वाढल्यामुळे त्या क्षेत्रातील क्रयशक्ती वाढेल व ही वाढलेली क्रयशक्ती वाढलेल्या उत्पादनाला मागणी निर्माण करील. त्या योगे अर्थव्यवस्थेतील गुणक (multiplier) व प्रवेग (acceleration) या शक्ती कार्यप्रवण होतील. (ज्या उलट्या, म्हणजे उत्पादन, रोजगार घटविण्यासाठी कार्यप्रवण होत्या) व विकासाचे सुष्ट चक्र चालू होईल. हे उत्पादन महत्त्वाच्या गरजाच भागवीत असल्याने त्यामधील वाढावा देशातच राहील, व तो विकासाची गती वाढवील.

याकरता रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी पंचायत राज व्यवस्थेमार्फत परिणामकारकपणे करणे अत्यंत गरजेचे आहे. या बाबतीतही केंद्र सरकारचा सापत्न भाव दिसून येतो. केंद्र सरकारने रोजगार हमी योजना विस्तारली परंतु अर्थसंकल्पामध्ये त्याकरता केलेली तरतूद अगदी थोड्या रकमेने वाढविली. त्या उलट, वर उल्लेख केल्याप्रमाणे सेझसाठी सवलतीपोटी १००,००० कोटी रकमेचे नुकसान सोसायची तयारी दर्शविली. डाव्या पक्षांनी सेझमागील दृष्टिकोनाचा पाठपुरावा करण्याऐवजी 'शेतीच्या विकासातून औद्योगिकीकरण' असा दृष्टिकोन स्वीकारल्यास भारताच्या अर्थव्यवस्थेवर जागतिकीकरणातील आर्थिक शक्तींनी लादलेले अरिष्ट दूर होईल व भारताच्या विकासाला न्याय्य समाजव्यवस्थेच्या दिशेने गती मिळू शकेल.

## संदर्भ


१. Aradhana Agarwal (2006), "Special Economic Zones : Revisiting the Policy Debate", EPW Vol.2, Page 4533.

२. The Hindustan Times (19.9.07) : Business India

३. चंद्रकांत केळकर (१९९८), 'आशियाई चमत्काराचा आभास' अर्थसंवाद, खंड २२/३, पृ. २०४

४. Pranab Bardhan (2007), "Poverty and Inequality in China and India : Elusive Link with Globalisation", EPW Vol. XL II No. 3, Page 3849.

५. Joshi Seema (2004), "Tertiary Sector - driven Growth in India : Impact on Employment and Poverty.", EPW (11.9.04), Page 4175

६. Aradhana Agarwal, पुर्वोक्त

७. UNDP (2005), "Human Development Report 2005", Oxford University Press, Page 6.

८. A. M. (2005), "Rent-a-Womb Economics", EPW - (3.9.05) - Page - 3885

९. Amit Bhaduri (2007), "Alternatives in Industrialisation.", EPW Vol. XL 11, Page 1597

१०. पूर्वोक्त

स्पेशल इकॉनॉमिक झोन म्हणजे विशेष आर्थिक क्षेत्र. या विषयाची चर्चा व वादविवाद गेल्या काही महिन्यांत देशभरात गाजत आहे. या संकल्पनेचे समर्थक व विरोधक विविध पैलूंची मांडणी करीत आहेत.

ही संकल्पना ज्या वातावरणात देशात रुजू घातली आहे ते वातावरण गेल्या पंधरा वर्षांच्या खाऊजा धोरणाच्या अंमलबजावणीमुळे तावूनसुलाखून निघाले आहे. जागतिकीकरणाचा व खुल्या आर्थिक धोरणाचा फायदा मिळालेला एक छोटा वर्ग देशात वाढतो आहे. या वर्गाचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर नवे प्रयोग करण्याचा आत्मविश्वास वाढतो आहे. त्याचे परिणाम या देशातील तळाच्या जनतेवर, येथील पर्यावरणावर काय होत आहेत, याची फिकीर त्यांना राहिलेली नाही. या दोन वर्गातली दरी इतकी रुंदावली आहे, की तळातल्या कष्टकरी, शेतकरीवर्गाचे वास्तव त्यातील धनिकवर्गाला जाणवतही नाही. त्या वास्तवावर अनेक प्रकारचे पदर अंथरण्यात आले आहेत. जणूकाही हा प्रचंड मोठा कष्टकरीवर्ग अस्तित्वातच नाही, अशा भ्रमात येथील श्रीमंत व उच्चमध्यमवर्ग आहे. जो सत्ताधारीवर्ग आहे. या मंडळींच्या

**उल्का महाजन**



# स्पेशल लूटमार झोन : अराजकाची नांदी

मुठीत आपले 'लोकशाही'व्यवस्था राबवणारे राज्यकर्ते गेले आहेत.

भांडवली लोकशाही व्यवस्थेत सत्ताधारी ठरवण्याचा वा बदलण्याचा मतपेटीतून जाणारा मार्ग पैशांच्या पेटीतून नेण्याची रूढी आता आपल्याकडे पक्की रुजली आहे. त्यामुळेही भांडवलदारांचे नियंत्रण आपल्या राज्यकर्त्या वर्गावर पक्के झाले आहे. अशा परिस्थितीत देशाच्या आर्थिक विकासाची नवी गुरुकिल्ली 'स्पेशल इकॉनॉमिक झोन' या नावाने आणली जाते आणि हे धोरण विकासासाठी अपरिहार्य असल्याची मंत्रवाणी हा राज्यकर्ता वर्ग एकमुखाने बोलू लागतो. हे धोरण पुढे रेटण्यासाठी काटेकोर कायदा आणला जातो, ज्यामध्ये इतर कुठलेही नियंत्रण नको, कायद्याचा अडसर नको, करव्यवस्था नको, परवाना राज नको, पर्यावरण रक्षणाची भानगड नको, कामगारांचे हक्क नको, एकूणच सरकारी राजच नको अशी सारी व्यवस्था पद्धतशीर रचली जाते. अडचण ठरू शकणारे कायदे आधीच बदलले जातात. आणि मग निर्यातीला प्रोत्साहन देणारे, विदेशी पुंजीचा साठा वाढवणारे, रोजगार निर्मिती करणारे, असे अत्याधुनिक औद्योगिक विकासाचे धोरण म्हणून गाजावाजा करत स्पेशल इकॉनॉमिक झोन आणले जातात.

हा कायदा झाला २००५मध्ये. जवळपास सर्व पक्षांनी त्याचे स्वागत केले. डाव्या पक्षांनी कामगारविरोधी तरतूदींना जोरदार विरोध केल्यामुळे त्याबाबतची तरतूद मूळ कायद्यात बदलण्यात आली. बाकी सर्व चौकट कायम ठेवून सेझचा कायदा संसदेच्या दोन्ही सभागृहांनी मंजूर केला. याबाबतचे धोरण २०००मध्ये भाजपप्रणीत 'रालोआ' सरकारने आणलेले होते. त्याला कायद्याचे स्वरूप दिले काँग्रेसप्रणीत 'संपुआ' सरकारने. म्हणजे बहुतांश पक्षांची त्याला मान्यता होतीच. २०००-२००५ या काळात चौदा राज्यांनी आपापल्या राज्यात याबाबतची धोरणे आखली व पाच राज्यांनी त्याबाबत कायदेही केले. चंदीगड, कर्नाटक, हरयाणा, प. बंगाल व मध्यप्रदेश या पाचही राज्यांनी सेझची चौकट स्वीकारली. फक्त प. बंगालमध्ये सर्व कामगार कायदे लागू होतील अशी स्पष्ट तरतूद करण्यात आली.

मधल्या काळात सेझची वाट मोकळी करण्यासाठी केंद्र सरकारने व विविध राज्य सरकारांनी अनेक कायदे बदलले. जमीन महसूल संहिता, जमीन सुधारणा कायदे, औद्योगिक तंट्यासंबंधी कायदे बदलण्यात आले. औद्योगिक विवाद कायद्यामध्ये 'सेझ' ही 'सार्वजनिक सुविधा' मानावी, अशी तरतूद करण्यात आली. या बदलांच्या बाबत लोकप्रतिनिधीही जागृत नव्हते. मग सामान्य जनता तर दूरच राहिली. 'सेझ' नावाचे देशाच्या विकासाचे धोरण आधी मागच्या दाराने, आणि सारे अडसर दूर झाल्यावर पुढल्या दाराने आणण्यात



आले. काही पक्षांच्या सदस्यांनी जुजबी हरकती नोंदवल्या. पण एकूण स्वागतच केले. कायद्याच्या नियमांमध्ये अनेक काटेकोर बाबी आणण्यात आल्या. आणि हळूहळू कायद्याचे दात काय खाण्यासाठी लावण्यात येत आहेत, याची चर्चा सुरू झाली. ती चर्चा आता कायदा झाल्यानंतरच्या दोन वर्षांत देशव्यापी झाली आहे. पण आतापर्यंत देशात ४२२ झोन्स व महाराष्ट्रात ९१ झोन्स मंजूर झाले आहेत.

या चर्चेला देखील तोंड फुटले ते जागोजागी शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी घेण्यास विरोध दर्शवण्यासाठी केलेल्या आंदोलनांमुळे. सेझमुळे पहिला फटका ज्या वर्गाला बसतो आहे तो आहे शेतकरी व ग्रामीण मजूर, कारागीर. हा वर्ग आंदोलित होऊ लागला आहे व देशाचे लक्ष वेधून घेत आहे. पण सेझमुळे बाधित होणारा हा एकमेव वर्ग नाही.

स्पेशल इकॉनॉमिक झोन कायदा २००५ मुळे कोणकोणते प्रश्न निर्माण होणार आहेत, याचा एकूण आढावा घेत आपण सेझविषयीची भूमिका स्पष्ट करत जाऊ.

## सेझसाठी होणारे भूसंपादन व शेतीचा प्रश्न

आतापर्यंत स्पेशल इकॉनॉमिक झोन मंजूर करणाऱ्या बोर्डाने ४२२ सेझना तत्त्वत: वा औपचारिक मान्यता दिली आहे. या क्षेत्रांसाठी सुमारे साडेपाच लाख एकर जमीन लागणार, असा अंदाज आहे. यापैकी मोठ्या प्रमाणात विविध प्रकारच्या शेतजमिनी घेतल्या जात आहेत. सिंचित जमिनी घेणार नाही, दुबार पिकांची जमीन घेणार नाही, बागायती जमिनी घेणार नाही, अशा घोषणा पंतप्रधान, कृषीमंत्री व वाणिज्यमंत्री करत आहेत. फक्त सरकारी कागदपत्रांवर त्या जमिनी तात्पुरत्या पडीक, खाजन, नापिक दाखवण्यात येतात. कागदांवरची खोटी शेती करण्यात आपले सरकारी अधिकारी तर कुशल आहेतच. तरी प्रत्यक्षात या साऱ्या जमिनी घेतल्या जात आहेतच असा आमचा अनुभव आहे. पण प्रश्न केवळ बागायती वा जिरायती जमिनींमधील निवडीचा नाही. जमीन जिरायती वा एकपिकी असली तरी त्यावर शेतकरी कुटुंबाची उपजीविका अवलंबून असते. त्यामुळे हिरावून घेतल्या जाणाऱ्या उपजीविकेच्या साधनांचा तेवढाच गंभीर परिणाम सर्व शेतकऱ्यांवर होत असतो.

जेव्हा एखाद्या क्षेत्रातील शेतजमीन मोठ्या प्रमाणात बिगरशेती कारणासाठी वळवण्यात येते तेव्हा त्या शेतजमिनीवर व पूरक व्यवसायांवर अवलंबून असणारा मोठा वर्ग उघड्यावर येत असतो. त्या सर्वांची उपजीविकेची साधने हिरावली जातात मात्र सातबारावर नाव असणाऱ्यांचाच नुकसानभरपाईसाठी वा (शक्य झाल्यास) रोजगारासाठी विचार होतो. पण त्या व्यतिरिक्त मक्त्याने म्हणजे भागीदारीने शेती करणारे, नोंद नसलेली कुळे, जमीन विभागणी न झाल्याने नोंदले न गेलेले हक्कदार हे सारे त्याच जमिनीत हक्कदार असतात. पण त्यांना बेदखल करण्यात येते. तसेच त्या शेतीवर मोठ्या प्रमाणात तेथील भूमीहीन शेतमजूर अवलंबून असतो. त्याचेही ते एकमेव उपजीविकेचे साधन असते. पण ते हिरावल्यानंतर त्याच्या वाट्याला पोट भरण्यासाठी केवळ विस्थापनच येते.

रायगड जिल्ह्यात शेतीबरोबरच याच व नजीकच्या जमिनीत मिठागरे, रेतीचे व्यवसाय आहेत. शिवाय शेततळ्यामधील व शेतजमिनीतच पावसाळ्यात येणाऱ्या पाण्यात मासेमारी होत असते. शेतीचा हंगाम संपल्यावर याच जमिनीत वीटभट्ट्या येतात. रायगड जिल्ह्याचा हा भाग भाताचे कोठार मानला जातो. जिल्ह्यातली सर्वात सुपीक जमीन इथे आहे. त्यामुळे लगतच राईस मिल चालतात. तेथे भात पोचवण्यासाठी व बाजारात नेण्यासाठी वाहतुकीचा व्यवसाय करणारे बैलगाडीवाले, ट्रकवाले, वाहतूक कामगार, शेतीवर अवलंबित पारंपरिक व्यवसाय करणारे बारा बलुतेदार अशी प्रचंड मोठी रोजगारव्यवस्थेची साखळी इथे कार्यरत आहे. येथील ३५,००० एकर जमीन संपादित करण्यात येते तेव्हा इतक्या प्रचंड मोठ्या प्रमाणात जनसंख्येचे (जी तेथील शेतकरी कुटुंबांच्या संख्येच्या तिप्पट आहे) विस्थापन यात गृहित आहे. कोणताही रोजगाराचा पर्याय वा नुकसानभरपाई न मिळता.

रायगड जिल्ह्यात अंबानीचा रिलायन्स उद्योगसमूह सर्वात मोठा झोन विकसित करत आहे ज्यांच्या जमिनी संपादित होतील त्या साऱ्यांना नोकरी देण्यास अंबानीने पूर्वी असमर्थतता दर्शवली होती. शेतकरी जमीन विकण्यास विरोध करू लागल्यावर फक्त सातबारावर ज्याचे नाव आहे त्या कुटुंबास घरटी एक नोकरीचे आमिष दाखवण्यात येत आहे. सरकारने तर कुळाचीही जबाबदारी घेतलेली नाही. चालू आहे ती फक्त घोषणाबाजी. ज्यावर जनतेचा विश्वासच नाही. कारण यापूर्वीच्या अनेक औद्योगिक व विकास प्रकल्पांचा अनुभव त्यांच्या गाठीशी आहे. एम.आय.डी.सी.ने आजवर कधी स्थानिकांना वा विस्थापित शेतकऱ्यांना नोकऱ्या देण्याची जबाबदारी अंगावर घेतली नाही. आपण फक्त औद्योगिक भूखंड विकसित करणार व मूलभूत सुविधा पुरवणार एवढीच जबाबदारी त्यांनी घेतली होती. सरकारी यंत्रणा असूनही विकासक म्हणून नोकऱ्या देण्यास ते सक्षम नव्हते तर आज रिलायन्स खाजगी विकासक असून सर्वांना नोकऱ्या देण्याचे आश्वासन कशाच्या जोरावर देत आहेत? हा प्रश्न लोकांच्या मनात आहेच. त्यासाठी कसलीही कायदेशीर तरतूद नसताना तर अशी आश्वासने अंमलात येण्याची शक्यता आणखीच धूसर होते.

शेतीवर अवलंबून असणाऱ्या प्रचंड मोठ्या ग्रामीण जनसंख्येला पर्याय न देता विस्थापित करणे ही शेतीवरील अवलंबित जनसंख्येचा बोजा कमी करण्याची पद्धत असू शकत नाही. आजच्या घडीला तोट्यात असली तरी शेतीव्यवस्थाच एवढ्या मोठ्या प्रमाणात रोजगार पुरवू शकते, उद्योग व अत्याधुनिक उद्योग ते करू शकत नाहीत हे केव्हाच सिद्ध झाले आहे. तेव्हा रोजगार निर्माण करायचा असेल, तो सुरक्षित करायचा असेल तर शेतीला संरक्षण देणे अपरिहार्य आहे. शेती क्षेत्राची दुरावस्था सरकारच्या अनास्थेच्या व चुकीच्या धोरणांमुळे आहे. ती अनास्था बेफिकीरीकडे वळवणे ही उपाययोजना असू शकत नाही. पण खेदाची गोष्ट अशी की शासनव्यवस्था आज हीच वृत्ती दाखवत आहे. हे करताना जागोजाग लढून मिळवलेले जमीन सुधारणा कायदे पोकळ केले जात आहेत, गुंडाळून ठेवले जात आहेत. प्रसंगी रद्दही केले जात आहेत. ज्या कायद्यांना आपण नवव्या अनुसूचीत ठेवून संरक्षण दिले तेच कायदे मोडीत काढण्यात येत आहेत. यातून निर्माण होणारा आणखी महत्त्वाचा प्रश्न आहे अन्नसुरक्षेचा. ज्या देशात अन्नधान्याची आयात करावी लागते व त्यासाठी श्रीमंत देशांचे मांडलिकत्व पत्करावे लागते, आपली निर्णयप्रक्रिया व लोकशाही त्यांच्याकडे गहाण टाकावी लागते त्या देशात शेतीखालची इंचभरही जमीन बिगरशेतीसाठी हस्तांतरित होऊ देणार नाही अशी आपली भूमिका हवी. पण जमिनीमध्ये ज्यांना अब्जावधी रुपये कमावण्याची संधी दिसते त्या लाखो लोकांच्या रोजगाराचे, उपजीविकेचे व अन्नसुरक्षेचे काय?

सेझ येणारा बहुतांश विभाग मोठ्या शहरांच्या व समुद्रकिनाऱ्याच्या जवळ आहे. दळणवळणाच्या सोयी व शहरातील सुविधांचा फायदा घेत प्रचंड किमतीच्या जमिनी कवडीमोल दराने शेतकऱ्यांना लुबाडून ताब्यात घेण्याचा व त्यावर रियल इस्टेटद्वारे पैसे कमावण्याचा हा डाव आहे, हे उघड आहे. त्याचमुळे एकूण जमिनीतील केवळ २५% जमिनीवर औद्योगिक उपक्रम राबवले जातील, असे धोरण होते. आता देशभर याची चर्चा सुरू झाल्यावर ५०% क्षेत्राचा वापर औद्योगिक उपक्रमांसाठी व्हावा, असे धोरण घेण्यात आले. परंतु बहुराष्ट्रीय कंपन्यांबरोबर रिलायन्सने या जमिनी ताब्यात येण्याआधीच व्यवहार केले आहेत, याचीही माहिती उघड होत आहे.

जनआंदोलनाच्या रेट्यामुळे सेझसाठी घेण्यात येणाऱ्या क्षेत्रावर मर्यादा घालण्यात आली असली तरी ती अत्यंत घिसाडघाईने घालण्यात आली आहे. यापूर्वीच्या वारेमाप जमिनी सेझ विकासकांच्या घशात घालण्याचे धोरणही तर्कसंगत नव्हते



व सुधारित धोरणामागे देखील कोणताही तर्क दिसत नाही. देशातील प्रचंड मोठ्या जनसंख्येवर आघात करणारे सेझचे धोरण हे असे तर्कहीन व अवाजवी आहे.

केवळ रायगडमधीलच नव्हे तर पुणे, औरंगाबाद जिल्ह्यातील जमिनीही दोनच नव्हे चार-पाच पिके घेणाऱ्या, काही सिंचित, काही सिंचनाच्या लाभक्षेत्रासाठी आधीच संपादित आहेत. रायगडच्या पेण तालुक्यातील बत्तीस गावे हेखले प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील आहेत. तेथील शेतकऱ्यांना त्याच जमिनीसाठी संपादनाच्या नोटीसा मिळाल्या आहेत. पाटबंधारे खात्याने या जमिनी सेझसाठी घेण्यास हरकत घेतली आहे. परंतु तरीही सक्तीचे भूसंपादन पुढे रेटण्यात येत आहे. शिवाय हे क्षेत्र एम.एम.आर.डी.ए.च्या प्लॅननुसार 'ग्रीन झोन' आहे. परंतु हे आरक्षण सोयीनुसार बदलून त्याच जमिनीत आता सेझ आणण्यात येत आहे.

या साऱ्या संपादन प्रकरणात शेतकऱ्यांना तर अजिबात विश्वासात घेण्यात आलेले नाही. कागदोपत्री फसवाफसवी, घोषणाबाजी आणि अंमलबजावणीतील फसवणूक ही तर इतकी प्रचंड आहे, ज्यात संपूर्ण सरकारी यंत्रणा-लोकप्रतिनिधी व नोकरशहांसह सामील झाली आहे, की आता सामान्य जनतेचा त्यांच्यावरचा विश्वास उडालेलाच आहे. निव्वळ सरकारवरचा नव्हे तर कायद्यावरचा, कायदेशीर व्यवस्थेवरचा विश्वासच उडाला आहे. ही सर्वात गंभीर बाब आहे. त्यामुळे नंदीग्राम, माण येथील परिस्थितीसारखी स्फोटक परिस्थिती अन्य ठिकाणीही उद्भवू शकते.

अशाप्रकारे शेतकरी व शेतीशी निगडित ग्रामीण कष्टकरी भरडला जातो आहे ही सेझमुळे होणाऱ्या आक्रमणाची फक्त एकच बाजू आहे. पण हा प्रश्न फक्त शेतकऱ्यांच्या जमीनसंपादनाचा व त्यांच्या विस्थापनाचा नाही. त्यांना पहिला फटका बसतो आहे. त्यांच्यापुढे आणखी अनेक घातक बळी आहेत. त्यांचीही चर्चा पुढे करायला हवी, तरच शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाचा मुद्दा सुटल्यावर सेझ आणायला हरकत नाही, असे म्हणणाऱ्यांच्या प्रश्नाला उत्तर व 'सेझ कायदाच रद्द व्हायला हवा' या मागणीपाठची भूमिका स्पष्ट होईल.

**कामगार कायद्यांमधून सूट**

स्पेशल इकॉनॉमिक झोनचा पाया ज्या तत्त्वांवर आधारलेला आहे, त्यातले दुसरे तत्त्व आहे; की कामगार कायदे शिथिल करण्यात यावेत. नफा कमवायला, उद्योगपतींचे भाग्य फळफळायला आणि पर्यायाने या देशाच्या विकासाला (म्हणजे कोणाच्या?) अडसर आहे तो कामगार चळवळीचा. कामगारांचे हक्क देणे व प्रत्येक उद्योगातील नफ्यात वाटा देणे हे तर फारच कठीण. तेव्हा उद्योग फळफळायला हवेत तर ही अडचण काढून टाका. किमान वेतन, कामाच्या ठिकाणी हक्क, सुविधा, बोनस, प्रॉव्हिडंट फंड, हक्काची सुट्टी हे नाही मिळाले तर भांडायचा अधिकार — सारे नकोच. हा व्यर्थ वेळ घालवणे आहे.

सेझमुळे लाखो रोजगार निर्माण होणार म्हणताना त्या रोजगारांची व कामगारांची स्थिती अशी असुरक्षित आहे. या विरोधात डाव्या पक्षांनी संसदेत आवाज उठवल्यानंतर संबंधित तरतूद बदलण्यात आली व खालीलप्रमाणे वाक्यप्रयोग करण्यात आला.

''केंद्र सरकार सेझ कायदा किंवा कुठल्याही अन्य केंद्रीय कायद्याबाबत एक नोटिफिकेशन काढून असा निर्णय घेईल की सदर कायदा 'सेझला लागू होणार नाही' अथवा सेझला लागू होईल. फक्त ही बाब कामगार संघटना, औद्योगिक तंटे, कामगार कल्याण, कामाच्या ठिकाणी सुविधा, प्रॉव्हिडंट फंड, पेन्शन, मातृत्व सुविधा, नुकसानभरपाई याबाबत लागू होणार नाही.''

ही अत्यंत मोघम तरतूद आहे व केंद्रीय कायद्यांपुरतीच मर्यादित आहे. राज्यसरकार कामगार संरक्षणाबाबत वेगळे निर्णय घेऊ शकते. जे जवळपास सर्व राज्यांनी (प. बंगाल व केरळ वगळता) केलं आहे व कामगारविषयक सर्व अधिकार सेझच्या कमिशनरना देऊन टाकले आहेत. 'सेझ'चे हितसंबंध जपण्यासाठी नेमलेले आयुक्त सेझच्या चौकटीतच याबाबत निर्णय घेणार हे उघड आहे. औद्योगिक व कामगारविषयक सर्व बाबी व तंटे सोडवण्याचे सर्व निर्णय या आयुक्तांनी घ्यायचे आहेत.

तसेच केंद्रीय कायद्यासह सर्व राज्यांनी ''औद्योगिक तंटे कायद्यात सुधारणा आणून 'सेझ' ही 'सार्वजनिक सुविधा' मानावी'' असे कायद्यात पक्के करून घेतले आहे, ज्यामुळे कामगारांच्या हक्कासाठी लढण्यावर, संप वा टाळेबंदी करण्यावर बंदी येते. महाराष्ट्र शासनाने तर बालमजूर प्रतिबंधक कायद्यानुसार नेमलेले निरीक्षक 'सेझ'मध्ये जाऊ शकणार नाहीत, ते अधिकार 'सेझ' आयुक्तांनाच राहतील, अशीही सुधारणा केली. त्यामुळे या कायद्याचा दुसरा फटका बसणार आहे कामगारवर्गाला. आज शेतकरी जात्यात भरडला जातो आहे. त्याच्या पाठोपाठ जाणार कामगारवर्ग. जमिनीची लूट करण्याचे उद्योगपतींचे अधिकार संरक्षित झाले आहेतच, त्याबरोबर दुसरी लूट आहे श्रमाची व श्रमिकांची. सेझ कायद्याने ही लूट करण्याचे मार्ग मोकळे केले आहेत. तिसरी लूट आहे या देशातील सामान्य करदात्यांची.

**करांमध्ये प्रचंड, अवाजवी सवलती**

स्पेशल इकॉनॉमिक झोनमधील बांधकामापासून सर्व उद्योगांना प्रचंड प्रमाणात करसवलती देण्यात आल्या आहेत.

- राज्य सरकारच्या सर्व शुल्कांतून सवलत
- स्टॉंप ड्यूटी व रजिस्ट्रेशन सवलत
- सेल्स टॅक्स, पर्चेस टॅक्स, ऑक्ट्रॉय सेझमधून पूर्ण सवलत
- पाणी व वीज यावर कर नाही
- इन्कम टॅक्समधून दहा वर्षे पूर्ण सवलत
- निर्यातीतून मिळणाऱ्या फायद्यावर प्राप्तीकर लागू नाही
- कच्च्या मालाच्या आयातीवर व देशांतर्गत मालवाहतुकीवर सर्व शुल्क माफ
- आयात-निर्यात मालाची दैनंदिन तपासणी नाही
- सेवा कर व केंद्रीय विक्रीकरातून सूट
- व्हॅट लागू नाही
- विदेशी कंपन्यांना सर्व नफा स्वदेशी पाठविण्याची मुभा
- १००% थेट परदेशी गुंतवणुकीची परवानगी
- आयात-निर्यातीसाठी परवान्याची गरज नाही
- कस्टम ड्यूटीतून सवलत

या देशात शेतकरी आत्महत्या करत आहे पण त्यांना कधी पाणी वा वीज आपण करमुक्त देऊ शकत नाही पण या उद्योगांना मात्र या करातून पूर्ण माफी आहे. अशा सर्व करांमधून सवलती देण्यामुळे देशाचे किती नुकसान होणार आहे याचा वित्त मंत्रालयाने दिलेला आकडा आहे १,७५,००० कोटी रुपयांचा. ज्यामुळे देशाची अर्थव्यवस्था कोसळेल असा इशारा रिझर्व्ह बँकेने पण दिला आहे. पण तो डावलून कर सवलतींचे धोरण रेटले जात आहे. कंट्रोलर व ऑडिटर जनरलने तर मागील काही वर्षांचे आकडे पुढे मांडून या संपूर्ण धोरणाच्या लाभ-हानीचे गणित तपासावे व पुर्नविचार करावा, असे म्हटले आहे. त्यांनी दिलेल्या आकड्यानुसार यापूर्वीच्या एक्स्पोर्ट प्रमोशन झोन(EPZ)मध्ये ७५०० कोटी रुपये करसवलतीपोटी गमावून निव्वळ ४७०० कोटी रु. परकीय चलन आपण मिळवले. म्हणूनच हे गणित मांडण्याची सूचना करण्यात आली आहे. इतक्या प्रचंड नुकसानीचा बोजा कुणाच्या माथी मारला जाणार आहे? उघड आहे, तो सामान्य करदात्यांवरच लादला जाणार वा सेझबाहेरील अन्य उद्योगांवर. त्या करांमध्ये वाढ करावी लागणार वा असलेल्या विविध विकास योजनांना कात्री लावावी लागणार. या साऱ्यातून भरडला जाणार आहे सामान्य करदाता वर्ग. आज सुपात असलेला पण उद्या जात्यात जाणारा हा प्रचंड मोठा सामान्य नागरिकांचा वर्ग. एवढ्या करसवलती लाटून या उद्योगपतींनी देशासाठी कोणती जबाबदारी पेलायची आहे याबाबत मात्र चकार शब्द या कायद्यात नाही. यापूर्वीही उद्योगांना सवलती व प्रोत्साहने देण्याची धोरणे होती. त्याचा प्रचंड गैरवापर त्यांनी केलेला आहे. महाराष्ट्र विधिमंडळाच्या लोकलेखा समितीसमोर रिलायन्स, व्हिडिओकॉन व अन्य कंपन्यांनी अशा प्रचंड सवलती लाटून ७०,००० कोटी रु. बुडवल्याचे प्रकरण सुनावणीसाठी आहे. तरीही याच चोरांच्या हातात पुन्हा तिजोरीच्या चाव्या सोपवल्या जातात याचा अर्थ उघड आहे, राज्यकर्ते विकले गेले आहेत.

शिवाय आर्थिकदृष्ट्या सेझची उभारणी शक्य आहे का? यावर दिल्लीतल्या एका इन्फ्रास्ट्रक्चर सल्लागार कंपनीचे तज्ज्ञ खंडेलवाल यांनी दिलेली आकडेवारी 'आऊटलूक'मध्ये प्रसिद्ध झाली आहे. ते म्हणतात, "सेझमध्ये निव्वळ प्रोसिसिंग झोन उभे करायला ३३०० हजार कोटी रु. लागणार. आणि गेल्या चौदा वर्षातील (१९९१-२००५) गुंतवणूक पाहिली तर सर्व खाजगी क्षेत्र मिळून ती १८९४ हजार कोटींची आहे. मग एवढे भांडवल कुठून उभे राहणार हा प्रश्नच आहे." या उभारणीसाठीच रियल इस्टेटमधील सट्टेबाजी आवश्यक आहे की काय? असा प्रश्न उभा राहतो. म्हणूनच सेझमधला मोठा डाव रियल इस्टेटमधल्या बड्या धेंडांचा आहे. जमिनी ताब्यात येण्याआधीच रियल इस्टेटमधील परदेशी कंपन्यांनी — मॉर्गन स्टॅन्ले, मेरील लिंच, जी.ई.सी. फायनान्स, जे. पी. मॉर्गन, नाईट फ्रँक व इतर — यांनी सुमारे २२०० हजार कोटींची गुंतवणूक केल्याचे आकडे पुढे येत आहेत. त्यामुळे 'सेझ' हे औद्योगिकीकरण नव्हे तर रियल इस्टेटचाच डाव आहे, हे उघड आहे.

**पर्यावरणाचा प्रश्न**

सेझला अनेक पर्यावरण कायद्यातूनही सूट देण्यात आली आहे. समुद्रकिनाऱ्यावरील कोस्टल रेग्युलेशन झोन, जे समुद्री पर्यावरणाच्या संरक्षणासाठी व मच्छिमारांसाठी राखून ठेवण्यात आले होते, ते गोल्फ कोर्सेस अथवा पर्यटन हॉटेल्ससाठी उठवण्यात येतील. या क्षेत्रांसाठी 'इन्वायरनमेंट इम्पॅक्ट असेसमेंट' (EIA) जे कुठल्याही उद्योगांसाठी बंधनकारक आहे व त्यासाठी तेथील स्थानिक लोकांच्या तक्रारी जनसुनावणीद्वारे ऐकून मगच मान्यता देण्यात येते, ती सुनावणी सेझसाठी आवश्यक नाही. तशी तरतूद यापूर्वीच २००१ मध्येच EIA नोटीफिकेशनमध्ये केंद्र सरकारने केली आहे.

शिवाय सेझमधील बांधकामासाठी लागणारी माती, दगड, रेती रॉयल्टीशिवाय उपलब्ध असल्याने प्रचंड प्रमाणात माती

व दगडाचा उपसा होणार आहे. रायगडमधल्या केवळ एका अंबानीप्रणीत झोनमधील १४,००० हेक्टर जमिनीत भराव घालण्यासाठी जिल्ह्यातील सर्व डोंगर खणून काढले जातील असा अंदाज आहे. त्याशिवाय तेथील खाडीतील तिवरांची राने प्रचंड प्रमाणात मारली जातील जी समुद्री पर्यावरण रक्षणासाठी अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. पण या गोष्टींची दखल 'सेझ' उभारणीसाठी अनावश्यक आहे. कारण प्रचंड नफा व परदेशी चलन कमावणे या उद्देशापुढे हे सारे गौण आहे, अशी धारणा राज्यकर्त्यावर्गाने करून घेतली आहे.

**पंचायत यंत्रणा बरखास्त**

सेझमध्ये स्थानिक स्वराज्यसंस्था म्हणजे आज असलेल्या ग्रामपंचायती, पंचायत समिती व जिल्हा परिषदा बरखास्त करण्यात येतील व औद्योगिक वसाहतींमध्ये त्यांचे रूपांतर करून तेथे सेझचे विकास आयुक्त सारा कारभार पाहतील. भारतीय राज्यघटनेत ७३वी व ७४वी घटनादुरुस्ती आणून पंचायत यंत्रणेला दिलेले अधिकार गुंडाळून ठेवण्यात येतील व विकासाशी साटेलोटे असणारे आयुक्तच हा कारभार पाहतील. मग या क्षेत्रातील नागरिकांच्या लोकशाही हक्कांचे काय? हा सवाल आहेच.

**सेझ कायद्याला सर्वोच्च अधिकार**

सेझ कायद्याला सर्व कायद्यांच्यावर अधिकार कक्षा देण्यात आली आहे (कलम ५१). हाच कायदा आता अन्य कायद्यांच्या वर राहील. याच्याशी सुसंगत नसणारे सर्व कायदे केवळ नोटिफिकेशनद्वारे बदलण्यात येतील (कलम ४९). त्यासाठी संसद वा राज्य विधिमंडळात सुधारणा विधेयक आणण्याची पण गरज नाही. तसेच सेझ क्षेत्रांना व विकासकांना मान्यता देणाऱ्या बोर्डाच्या सदस्यांवर व अधिकाऱ्यांवर कोणतीही कायदेशीर प्रक्रिया चालवता येणार नाही (कलम ४८). अशा प्रकारे लोकशाही प्रक्रिया गुंडाळून ठेवणारा, अत्यंत जाचक असा हा कायदा आहे.

**विदेशी भूमी**

या क्षेत्रासाठी कोर्ट व सुरक्षायंत्रणा स्वतंत्र राहील, तसेच हे क्षेत्र म्हणजे विदेशी भूमी मानण्यात येईल. म्हणजे देशांतर्गत आता नवीन ४२२ परदेश अथवा आधुनिक संस्थाने येऊ घातली आहेत. ज्यांचे संस्थानिक अंबानी, रहेजा, हिरानंदानी, बाबा कल्याणी व इतर अनेक विकासक, उद्योगपती असतील व येथे येण्याजाण्यासाठी नागरिकांना ओळखपत्र बाळगावे लागेल. याशिवाय या क्षेत्रात दैनंदिन मालाची तपासणी आवश्यक नसल्याने समुद्रकिनाऱ्यावरील क्षेत्रात देशाच्या सुरक्षेचा प्रश्न उभा राहू शकतो. तसेच सेझमधील व सेझबाहेरील उद्योग यामध्ये असमतोल येऊन बाहेरील उद्योग पूर्ण ढासळतील अशी शक्यता आहेच. येथील सर्व सवलती लाटून सवलतींचा काळ संपल्याबरोबर तेथील युनिट बंद पाडून दुसरीकडे सुरू करणारे महाभागही असतील, जे आजही आहेतच.

संपत्तीच्या केंद्रीकरणाला प्रोत्साहन देत देशात विषमता व असमतोल वाढवणारा, श्रम-संसाधन-श्रमिकांची लूट करायला खुला परवाना देणारा, आतापर्यंत विविध चळवळींनी लढून मिळवलेले अनेक कायदे संपवणारा, गरिबी वाढवणाऱ्या, विस्थापन लादणाऱ्या प्रक्रिया हजारो हातांनी सुरू करणारा, देशाला पुन्हा एकदा सरंजामी अवस्थेकडे लोटणारा व लोकशाही तसेच सार्वभौमत्व संपवणारा हा कायदा आहे. अशा स्थितीत केवळ शेतकऱ्यांचे योग्य पुनर्वसन करण्याइतपतच हा मुद्दा नाही. त्यामुळे फक्त 'शेतकऱ्यांना दुखवू नका' एवढेच म्हणून भागणार नाही. सेझसारखा जुलमी, जाचक कायदाच रद्द करा हीच भूमिका घ्यायला हवी. त्यासाठी लढा उभारायला हवा. जागतिकीकरणाच्या वातावरणात कष्टकरी व सामान्य जनतेशी, शेतकऱ्यांशी जे खेळ आतापर्यंत केले गेले त्याचा हा परिपाक आहे. याविरुद्ध शेतकरी, कामगार, मध्यमवर्ग, विद्यार्थी साऱ्यांनी एकजुटीने लढायला उभे राहायला हवे. याचा अर्थ औद्योगिकीकरण नको, असा नाही. या देशात अंतर्गत बाजारपेठेचा विकास करणारे, सामान्य जनतेचे जीवनमान उंचावणारे, पर्यावरण राखणारे, कष्टकऱ्यांचा हक्क संरक्षित करणारे रोजगाराभिमुख औद्योगिकीकरण हवेच आहे. त्याचबरोबर शेतीला मजबूत संरक्षण व प्रोत्साहन देणारे धोरण हवे आहे. विशेषत: स्पेशल इकॉनॉमिक झोन धोरणाचे समर्थन करणाऱ्या धनिक व उच्च मध्यमवर्गाने येथल्या वास्तवाकडे डोळे उघडून बघायला हवे. अन्यथा समाजाचा पाया व धनिकांचा डोलारा ज्यांच्या हातावर उभा आहे त्या कष्टकरी, शेतकरी वर्गाचा असंतोष हा सारा डोलाराच उध्वस्त करेल, त्याची तयारी ठेवायला हवी.

सेझच्या निमित्ताने भांडवलशाहीने अधिक उग्र व हिंसक, राक्षसी रूप धारण केले आहे. शासनानेही आपला कल्याणकारी मुखवटा काढून फेकला आहे. तेव्हा या साऱ्या गोष्टींचा विचार करता जे चित्र समोर उभे राहते त्यामध्ये हा कायदा ज्या पायावर उभा आहे त्यातील पायाभूत तत्त्वे — कायदा नको, सरकार नको, करव्यवस्था नको, लोकशाही नको ही आहेत. सेझच्या निमित्ताने लोकशाही यंत्रणेच्या सर्व आधारस्तंभाचे स्वरूप व पोकळपणा उघड झाला आहे, तेव्हा त्या पलीकडे जाऊन ही आक्रमणे थोपवण्यासाठी लढाऊ, व्यापक, धगधगते जनआंदोलन हवे आहे. आधीच खूप उशीर झाला आहे.

# चीनमधील विशेष आर्थिक क्षेत्र : शेंझेनच्या झगमगाटामागील वास्तव

**भारतामध्ये सेझची संकल्पना आपण शेजारच्या चीनकडून आणली त्या चीनमधील वास्तव संक्षिप्त स्वरूपात–**

- २००३ पर्यंत चीनमध्ये सुमारे ७००० छोटे-मोठे सेझ होते. ज्यासाठी त्या क्षेत्रातील ७०% जमीन बेकायदेशीर पद्धतीने बळकावण्यात आली. त्यापैकी बरीच जमीन उपयोगात आणली गेली नाही.
- या ७००० सेझपैकी ४८०० झोन्स नंतर रद्द करण्यात आले व नव्या सेझच्या मंजूरी व स्थापनेची प्रक्रिया पुढे ढकलण्यात आली.
- २००५ पर्यंत चीनमध्ये ८७,००० विविध प्रकारचे लढे व जनतेने केलेल्या विरोधाचे कार्यक्रम नोंदले गेले.
- जानेवारी-ऑक्टोबर २००४ या काळात ८६७ निदर्शने नोंदण्यात आली ज्यामध्ये ५०,००० मजूर सहभागी झाले.
- शेंझेन या सर्वात मोठ्या सेझमध्ये ८३% लोकसंख्या अस्थिर आहे.
- १९७८ ते २००४ या काळात २ कोटी ६० लाख ८० हजार कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या मजूरांचे रोजगार गेले.
- सेझमध्ये मजूरांचे शोषण प्रचंड मोठ्या प्रमाणात होत आहे व बदलीमजूरही मोठ्या प्रमाणात आहेत.
- गेल्या काही वर्षांत पाण्याचे दुर्भिक्ष्य वाढले आहे व पर्यावरणाच्या विविध समस्यांना चीनला तोंड द्यावे लागत आहे.
- शेतजमीन मोठ्या प्रमाणात सेझसाठी वळवल्याने अन्नसुरक्षेचा प्रश्न तेथे गंभीर बनला आहे. दरवर्षी धान्याचे उत्पादन घटते आहे. २०३० पर्यंत १ कोटी १६ लाख टन धान्याचा तुटवडा जाणवेल असा अंदाज आहे.
- विषमतेची दरी प्रचंड गतीने तेथेही वाढत आहे. त्यामुळे चीन सरकारला २००६ मधील ११व्या पंचवार्षिक योजनेमध्ये शेती क्षेत्रावर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घ्यावा लागला आहे.

*(संदर्भ : राष्ट्रीय जन वकालत अध्ययन केंद्राची वर्किंग पेपर सिरीज, फेब्रुवारी २००७)*



*'काट्याकुट्याचा तुडवित रस्ता,*
*गावाकडं चल माझ्या दोस्ता'*

इंद्रजित भालेराव अशी विनवणी करत शहरी दोस्तांना गावाकडे घेऊन जातात. या कवितेला दहा वर्षं झाली तरी गावं आपली तशीच! सुधारणा झाली असेल तर 'खड्ड्यांनी भरलेला सिमेंट रस्ता' अशी भर घालावी. बाकी गावाकडील आयुष्य काट्यांनी भरलेलेच आहे. केवळ बाभळीचं बन माजू शकते असे वातावरण असल्यावर निवडीचे स्वातंत्र्य फक्त काट्यापुरतेच असू शकते. पाणी नाही, जळण नाही. वीज, शाळा, दवाखाना व एस.टी. असून नसल्यासारखे आहेत. कधी पाऊस गायब, कधी वादळी पाऊस, कधी बियाणं अजिबात उगवत नाही, कधी पिकावरची जोरदार कीड. हे कमी पडले तर रोगराई. कशी उभारी येईल गावातल्या माणसाला? आरोग्य, पाणी, वीज, शिक्षण, वाहतूक या मूलभूत सोयीही उपलब्ध नाहीत, ही ग्रामीण भागातील जनतेची क्रूर चेष्टा आहे. कुठल्याच सुविधा गावात नाहीत. या परिस्थितीमुळे येणारे नैराश्य व असुरक्षितता यामधून अनेक सामाजिक अपघात घडत आहेत व घडण्याच्या

**अतुल देऊळगावकर**

# त्यांनी जिंकले गावांसी


# हॅलो मेडिकल फाउण्डेशन



वाटेवर आहेत. सरकारी वा बिगर सरकारी संस्थांची विश्वासार्हता नावाला सुद्धा शिल्लक नाही. सर्व राजकीय पक्षाचे समस्त नेते मोठ्या तोऱ्यात पेट्या व खोकी भरण्यात मश्गुल आहेत. करुणा, संवेदनेचा मागमूस उरलेला दिसत नाही. 'किमान सहृदयता दाखवावी' इतकीच बिचाऱ्या लोकांची अपेक्षा असते. आजार, मृत्यू, कठीण प्रसंगात विचारपूस करण्याची सभ्यतासुद्धा नेत्यांकडे उरलेली नाही. महाराष्ट्राचे राजकीय व सामाजिक जीवन हे विकलांग अवस्थेत आहे. चैतन्याचा मागमूसदेखील नाही. ताण-तणाव व अवघडलेपण साचून राहिले आहे. ही दुरावस्था सार्वजनिक आरोग्यातून प्रकट होत राहते. नित्यनियमाने हगवण, हिवताप, कावीळ यांची लागण होत राहते. (आकड्या रोगाने (चिकन गुनिया) तर अवघा देश व्यापून टाकला होता.). राकट देशाचे 'रोगट देशात' अवस्थांतर करण्यात आपण यशस्वी झालो आहोत.

अशा विपरीत परिस्थितीतही व्यक्ती आणि समाजामध्ये वसणाऱ्या उर्जेवर श्रद्धा ठेवून काम करणारे क्रियावंत आणि समूह आजही देशभर आहेत. ते पाहून आपल्या आसपासही असं काही घडायला काहीच हरकत नाही, असा विश्वास वाटून आपल्याला उभारी येते. 'हॅलो मेडिकल फाऊंडेशन'मुळे तुळजापूर तालुक्यातील पन्नास गावांनी 'मी कात टाकली' अशी घोषणा केली आहे. उंबरठा ओलांडून माहीत नाही, मान वर करण्याची हिमंत नाही अशा महिलांच्या हातात औषधं आली. घराला, गावाला लागलेले 'रोग' कोणते हे तिला कळू लागलं. उपचारही समजले होते. 'आपण औषध देऊन साधे आजार घालवू शकतो' ही प्रचीती आली. हाताला गावाची 'नाडी' लागताच घरे आणि गावे निरामय होऊ लागली. सदासर्वकाळ मुक्या राहिल्या असत्या अशा महिला कमालीच्या आत्मविश्वासाने जगाला भिडू लागल्या. 'हॅलो मेडिकल फाऊंडेशन'ने जग पाहण्यासाठीची खिडकी उघडून दिली.

'हेल्थ अँड ऑटो लर्निंग ऑर्गनायझेशन — हॅलो' या संकल्पनेचा जन्म १९८० साली झाला. तुळजापूर तालुक्यातील खुदावाडीचे डॉ. शशिकांत अहंकारी औरंगाबादच्या वैद्यकीय महाविद्यालयात पदव्युत्तर शिक्षण घेत होते. अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे, बाबा आमटे यांच्या सहवासात आल्यामुळे अहंकारींची 'वाट' वेगळी झाली होती. मेडिकल कॉलेजमध्ये पाय टाकून अंगावर अॅप्रन आणि गळ्यात स्टेथोस्कोप येताच 'डॉक्टर'ची घडण चालू होते. 'पेशंट' ही प्रयोगशाळेतील वस्तू बनते. त्यातूनच पेशंट आणि डॉक्टर अशी जगाची विभागणी होते. पेशंटविषयीची भावना अनास्था, उपेक्षा आणि तुच्छता अशा चढत्या भाजणीने वाढत जाते. याचे शशिकांत अहंकारी साक्षीदार होते. अशा परिसरात ते अस्वस्थ होते. ही बेचैनी त्यांनी कागदावर उतरवून काढली.



"तुम्ही तुमच्या आईच्या गर्भाशयात वाढत होता, तेव्हा तुमच्या व तिच्यासाठी तपासणी केंद्राची सोय नव्हती. तिला टी.टी. ची इंजेक्शने मिळाली नाहीत. तुमची नाळ दगडाने ठेचली की विळ्याने कापली, हे तुम्हालाही माहीत नाही. एवढं मात्र खरं की तुम्ही नशिबानं वाचलात. त्याचवेळी कित्येक जण दगावले असतील. अजूनही असं मरण तितकंच स्वस्त आहे. कारण उपचार महाग वाटावेत अशी अवस्था असणारे अधिक आहेत. त्यांना तसंच मरू द्यायचं असेल तर डोळे झाकून जगताय तसंच चालू द्या. हे बदलावं असं वाटत असेल तर उद्या संध्याकाळी हॉलमध्ये भेटा.'' बेसावध क्षणी पाठीमागून धक्का मारल्यावर डोळ्यांसमोर काजवे चमकावेत अशी स्थिती अनेकांची झाली. ठरलेल्या वेळी हॉल अडीचशे विद्यार्थ्यांनी भरून गेला. "समस्या तर आहेत, पण आपण काय करू शकतो, हे तर सरकारचं काम आहे आता आपण केवळ शिकलं पाहिजे.'' प्रश्नांचा भडिमार सुरू झाला. "आपण शिकता शिकता जवळच्या खेडेगावात जाऊन रुग्णांना तपासू शकतो. आपण काय शिकतो तेसुद्धा तपासून पाहता येईल. कॉलराचा रोगी इथे पाहतो. आता त्या गावात जाऊन पाहू. रोगाची कारणं समजतील.'' शशिकांत अहंकारींनी सुचवलं. ह्या कळा 'हेल्थ अँड ऑटो ऑर्गनायझेशन — हॅलो'च्या जन्माच्या होत्या. वैद्यकीय महाविद्यालयातील दुसऱ्या व तिसऱ्या वर्षाचे विद्यार्थी रविवारी व सुट्टीच्या दिवशी खेड्याकडे निघाले.

कित्येक मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांना गावाचा तिटकारा असतो. तर गावातून आलेले काही विद्यार्थी वास्तव टाळण्याचा प्रयत्न करत असतात. दोन्हींचा परिणाम एकच–गावापासून दूर! असे तऱ्हेतऱ्हेचे विद्यार्थी गावाला भिडू लागले. तर एरवी आजार अंगावर काढणारे गावातच डॉक्टर आल्यामुळे आनंदित झाले. खेड्यात आहार कोणता असतो, पाणी कसे असते, कोणत्या सोयी-सुविधा असतात, याची विद्यार्थ्यांना प्रचीती येऊ लागली. या भेटीतून भावी डॉक्टरांमध्ये सामाजिक जाणीव आणि समाजाला वैद्यकीय भान येऊ लागले. 'आपण काही उदात्त करतोय', या भावनेने विद्यार्थ्यांना स्फूर्ती आली. नवीन कल्पना सुचू लागल्या. रोग होऊ नयेत याकरिता प्रतिबंधक उपाय कोणते करावेत? ते समजावून कसे सांगावेत? रोगांबाबतच्या अंधश्रद्धा दूर कशा कराव्यात? यावर अनेक करडे मेंदू विचार करू लागले. खेळ, नाटक सादर करून सोप्या भाषेत आरोग्याचे शिक्षण घडवू लागले. विद्यार्थ्यांचा वैद्यकीय ज्ञानाचा पाया भक्कम होऊ लागला. 'हॅलो'मध्ये सामील होण्याला प्रतिष्ठा प्राप्त झाली. विद्यार्थी आणि प्राध्यापक वर्गात 'हॅलो'चा दबदबा निर्माण झाला. आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात 'हॅलो'च्या मुशीतून बाहेर पडलेल्या तीनशे डॉक्टरांनी त्यांच्या भागात स्वत:चा ठसा उमटवला आहे. क्रांती व माधुरी रायमाने, विजय गायकवाड, संजय गायकवाड, अशोल बेलखोडे, आनंद निकाळजे, जगन्नाथ व अंजली दीक्षित हे 'हॅलो'चे आघाडीचे शिलेदार! प्रत्येकाने व्यवसायात सात्त्विकता जोपासली. प्रत्येकाने स्वत:ची ओळख निर्माण केली. तरीही 'हॅलो'च्या उपक्रमांसाठी सवड काढतात. त्यांचे अग्रक्रम कधीही ढळले नाहीत. या सर्वांनी 'हॅलो'च्या कक्षा रुंदावण्याकरिता १९९२ साली 'हॅलो मेडिकल फाउंडेशन'ची स्थापना केली.






## गावे कोसळून पडल्यानंतर !

३० सप्टेंबर १९९३! पहाटे चार वाजून चाळीस मिनिटांनी किल्लारी - सास्तूर परिसराला ६.४ रिश्टरच्या भूकंपाने हादरवून टाकले. साडे नऊ हजार बळी या भूकंपाने घेतले. वीस हजार जखमी झाले. पन्नास हजार घरं उध्वस्त झाली. दीड लक्ष घरांची पडझड झाली. भूकंपाने गावगाडा ठप्प केला. आरोग्यव्यवस्था कोसळून पडली. हे आव्हान स्वीकारून 'हॅलो मेडिकल फाउंडेशन'ने गावात कायमस्वरूपी आरोग्य कार्यकर्ते - भारतवैद्य तयार करण्याचा निर्णय घेतला. अणदूरला 'भारतवैद्य प्रशिक्षण केंद्र' स्थापन केले. शशिकांत व शुभांगी अहंकारी ह्या डॉक्टर दांपत्यांनी अणदूरला 'जानकी रुग्णालय' चालू केले होते. शशिकांतने पूर्णपणे भूकंपग्रस्त भागाच्या आरोग्याकडे लक्ष केंद्रित केले. त्यावेळी भूकंपग्रस्त भागाकडे वस्तू व मदतीचा ओघ सुरू होता. देशभरातून डॉक्टरांची अनेक पथके आली होती. परंतु ही काय कायमस्वरूपी सोय नव्हती. 'हॅलो' ने गावातील आठवी उत्तीर्ण महिलेला भारतवैद्याचे प्रशिक्षण देण्याचे ठरवले.

आरोग्य चळवळीतील अनेक डॉक्टर शिकवण्यास आले. डॉ. श्याम अष्टेकरांचे 'भारत वैद्यक' हे पुस्तक संदर्भासाठी वापरले गेले. गावातील महिला तीन आठवडे आरोग्याचे धडे गिरवू लागल्या. त्याचबरोबर बचत गट, महिला मंडळाची सुरुवात कशी करावी याचीही त्यांना माहिती मिळाली. प्रशिक्षणानंतर त्यांच्या हाती मेडिकल किट दिले गेले. त्यात जीवनावश्यक चाळीस औषधे, वजनकाटा, डिलिव्हरी पॅक, रक्तदाब तपासायचे उपकरण आणि स्टेथोस्कोपसुद्धा होता. आरोग्य शिक्षणासाठी उपयुक्त पुस्तके व पोस्टर्स होती.

गावात कधी वर मान करून न पाहणारी बाई गळ्यात स्टेथोस्कोप लावून हृदयाचे ठोके मोजू लागली. साध्या आजाराचे निदान करून औषध-गोळ्या देऊ लागली. गंभीर आजारासाठी मोठ्या रुग्णालयात पाठवू लागली. गर्भवतीची काळजी कशी घ्यायची, हे सांगू लागली. बालसंगोपन समजावू लागली. लसीकरण मोहिमेत सहभागी होऊ लागली. परिसर स्वच्छतेची निकड का आहे, हे पटवून त्यात पुढाकार घेऊ लागली. गावातल्या बदलाची ती दूत झाली आणि गावाचा अविभाज्य घटक झाली. भारतवैद्यच्या डायरीत सर्व नोंदी असल्या पाहिजेत, असा नियम आहे. केशेगावच्या सुशीला हुकीरे यांच्या डायरीतील नोंद, ''.....त्याला मळ्यात जुलाब झालेत समजल्यावर मी तिकडं गेले. चेहरा ओळखू येईना एवढा निरजीव होता. सुस्त, बोलता येत नव्हते. मी घरी आले. ओ.आर.एस.(ओरल रिहायड्रेशन सॉल्ट-तोंडाने घ्यावयाचे सलाईन), फ्युराडिन व अँटासीडच्या गोळ्या घेतल्या. अँटासीड चोखायला दिले. ओ.आर.एस.चे पाणी पाजले. लागलीच घाई करून कोणत्याही दवाखान्यात घेऊन जा, म्हणून सांगितले. पेशंटला गाडी करून डॉ. अहंकारींकडे नेले. पेशंटची नाडी लागत नव्हती. त्याला सलाईन लावून दोन दिवस उपचार केल्यावर बरा झाला. डॉक्टर म्हणाले, माझ्या उपचारामुळे तो वाचला.''

पन्नास गावातील आरोग्याची जबाबदारी 'हॅलो'च्या भारतवैद्यांनी लीलया पेलून दाखवली. त्यांच्याशिवाय गावातलं



पान हलेनासं झालं. अन्यथा विधवा, घटस्फोटित महिलांचं खेड्यातील आयुष्य अतिशय खडतर असतं. घरात व बाहेर कुठेही स्थान नसतं. कुढत कसेबसे दिवस ढकलले जातात. 'हॅलो'ने त्यांना आत्मसन्मान बहाल केला. त्यांचा आत्मविश्वास फुलवला. त्यांचं क्षितीज रुंदावत गेलं आणि तसंतसं कर्तृत्त्व बहरत गेलं. काही भारतवैद्यांनी वेळीच कॅन्सरचं निदान केलं आहे. कुणी क्षय, तर कुणी एड्सचे केलेले अनुमान योग्य ठरले आहे. पन्नासजणींच्या डायऱ्या म्हणजे बदलणाऱ्या ग्रामीण आयुष्यावरील समर्पक भाष्य आहे. त्या भारतवैद्य झाल्या नसत्या तर किती आजार बळावत जाऊन दुर्धर झाले असते? किती बळी गेले असते? गावकऱ्यांचा किती खर्च झाला असता? याची अंकगणितातून मोजदाद करणे अशक्य आहे. भारतवैद्य नसणाऱ्या गावाकडे पाहिल्यास आरोग्याची उडालेली दैना पाहून याचा अंदाज बांधता येतो.

## आरोग्यसेवेतून ग्रामसुधार

आरोग्य हीच धनसंपदा (संपत्तीचे मूल्य करता येते, संपदा अनमोल असते) आहे आणि आरोग्यसेवा हे ग्रामसुधाराचे पहिले पाऊल आहे. त्या पुढची वाटचाल आपसूक सोपी होत जाते. याचा प्रत्यय 'हॅलो'ला येत गेला. प्रत्येक गावात किशोरी मेळावे सुरू झाले. शाळेत जाणाऱ्या मुला-मुलींसाठी निबंधस्पर्धा चालू झाली. त्यातून त्यांची अभिव्यक्ती दिसू लागली. मुलींना शाळा करून घरासाठी किती खपावं लागतं हे त्या बोलू-लिहू लागल्या. ते तर अंगवळणी पडलं होतं. त्यात गैर काही वाटत नव्हतं. त्याचा विचारच केला नव्हता. घराच्या ओझ्याने वाकलेले बालिकांचे खांदे आता गावाला दिसू लागले. 'मला शिकू द्या, आताच लग्न नको' असे ध्वनी घराघरात ऐकू येऊ लागले. मग 'हॅलो' ने प्रत्येक गावात तीन सायकली आणल्या. मुली सायकल शिकू लागल्या. एक रुपया तास शुल्क घेऊन गावातलीच मुलगी सायकलींची देखभाल करू लागली. त्या गावातल्या मुलींचे शिकणे आटोपले की सायकली पुढच्या गावाकडे जाऊ लागल्या. सायकलच्या चक्राने मुलींची मने गतीमान केली. आपणही ऐटीत सायकल चालवू शकतो, हा आत्मविश्वास पुढे आयुष्यभराचा मूलाधार ठरणार आहे, याची जाणीव त्यांना हळूहळू होऊ लागली.

गावात कुठलाही कार्यक्रम असला की त्याचे उद्घाटन बचतगटाच्या कार्यकर्तींच्या हस्तेच करण्याचा प्रघात सुरू झाला. इतकंच काय स्वातंत्र्यदिनाचे झेंडावंदनसुद्धा महिला मोठ्या दिमाखाने करू लागल्या. महिलांमध्ये कायापालट होतो म्हणजे काय याची अनुभूती 'हॅलो'च्या गावातील महिलांकडून मिळते.

किशोरी गटासाठी खास मेळावे भरवण्यास आरंभ झाला. प्रतिसाद तुडुंब होता व आहे. हळदीकुंकू प्रत्येकीने करीत बसण्याऐवजी त्यालाही सार्वजनिक रूप आणले. तो केवळ उपचार न करता त्यात आरोग्यविषयक माहिती देणे चालू केले. पुस्तक हे वाण होऊन गेले. वर्षभरात लग्न झालेल्या नववधूंचे स्वागत व सासूंचा सत्कार असाही कार्यक्रम सुरू झाला. मनातील आढी निघावी, असुरक्षितपणाची भावना जाऊन एकमेकींचा आधार वाटावा, यासाठी सर्वांनी एकत्र येणे हा मार्ग सुखकर होता. दारू पिऊन मारहाण झाली, नवऱ्याने कायमचे माहेरी पाठवले, कुठलीही समस्या असली तरी संस्था सावलीसारखी पाठीशी आहे, याचा अनुभव यच्चयावत महिलांना येऊ लागला. बचतगटातून आर्थिक स्वावलंबन मिळवण्यासाठी महिलांची धडपड सुरू झाली. शेळीपालन, मिरची कांडप, पिठाची गिरणी, शेवयाचे यंत्र घेऊन व्यवसाय सुरू केले. या घटनांचा परिणाम खूप खोलवर होत असतो. आता 'हॅलो'मय गावात कोणतेही सरकारी अधिकारी कुठलीही योजना आखताना तिथली भारतवैद्य व बचत गटाची कार्यकर्ती यांचा सल्ला जरूर घेतात. कृषी अधिकाऱ्यांकडे केंद्र सरकारची शेतीमध्ये सहभाग वाढवण्यास प्रोत्साहन देणारी योजना आली. 'हॅलो'कडेच त्या योजनेची सूत्रे आली. रोपवाटिका, बियाणे - सेंद्रीय खत - कीटकनाशकाची निर्मिती, अळंबी, खाद्य व दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन यामध्ये बचतगटांचा संचार सुरू झाला.

## पत व प्रतिष्ठा

सरकारसुद्धा योजना आखते. कित्येक स्वयंसेवी संस्था गावात काम करून मदत करतात. त्यांच्या कामात व 'हॅलो'मध्ये




फरक काय? तर पन्नास ते साठ गावातील महिलांना स्वयंप्रकाशी करण्याचे अजोड कार्य 'हॅलो'ने केले. केवळ आर्थिक हातभार लावला असता तर त्यांची स्थिती सुधारली असती. परंतु गावात व समाजात पत मिळाली नसती. आज 'हॅलो'च्या कार्यकर्त्यांना कमालीची प्रतिष्ठा लाभली आहे. 'हॅलो' महिला मेळाव्याला भाजी-भाकरी बांधून, स्वत:चा खर्च करून चार-पाच हजार महिला जमतात, ते उगीच नाही. त्या अनुभव लिहितात, सभेसमोर बोलतात. 'हॅलो'च्या सततच्या प्रयत्नामुळे त्यांना त्यांचा 'स्वर' मिळाल्याच्या असंख्य खुणा आपल्याला पाहावयास मिळतात.

अशा सर्वस्पर्शी सामाजिक बदलातून राजकारणदेखील प्रगल्भ झाले तरच तो बदल आणखी व्यापक होत जातो. संवेदनशील व्यक्ती राजकारणात आल्या तर आशेला थोडीतरी जागा मिळेल. गावच्या राजकारणात वर्षानुवर्षे दांडगटांचे वर्चस्व होते. त्यांना बाजूला सारणे अवघडच होते. अशा कोंडलेल्या वातावरणात संधी मिळाल्यावर ग्रामस्थांनी महिला कार्यकर्त्यांना प्रतिनिधी निवडले, ही घटना अनेक अर्थांनी सूचक आहे. यंदाच्या ग्रामपंचायत निवडणुकीत अडतीस पंच, पाच सरपंच आणि दोन पंचायत समितीचे सदस्य होण्याचा मान 'हॅलो'च्या कार्यकर्त्यांना मिळाला. 'उत्तम कामगिरी करणाराच आपला प्रतिनिधी असावा. जात, धर्म, लिंग या बाबी गौण आहेत' ही भावना वारंवार अधोरेखित होत आहे.

दररोज दोन वेळचे जेवण, डोक्यावर बरे छप्पर, पिण्यास स्वच्छ पाणी, संडास, मुलांना शाळा, गरज पडेल तेव्हा औषध घेण्याची ऐपत एवढ्या किमान गरजा भागवू शकत नाहीत, अशा आपल्या देशातील निर्धन लोकांची संख्या पंचवीस कोटीहून अधिक आहे. त्यामध्ये शेतकरी, शेतमजूर, अकुशल कामगार, आदिवासी, बेरोजगार, अपंग येतात. ज्यांच्याकडे गमावण्यासारखे काहीही नाही आणि जगण्याचा अधिकारदेखील नाही, असा हा 'नाही रे' वर्ग आहे. आजार म्हटलं की त्यांची परवड चालू! शक्यतो अंगावर आजार काढण्याचे व्रत अखंड चालू आहे. आजार वाढत गेला आणि हॉस्पिटल गाठावे लागले की काहीतरी विकायला काढणे अथवा सावकारी कर्ज एवढे दोनच पर्याय उरतात. सावकारी पाशातून सुटका होत नाही. आजारपणातील कर्ज हे कित्येक शेतकऱ्यांच्या आत्महत्येमागील कारण आहे.

शहरात 'मेडिक्लेम'साठी विमा कंपन्यांची चढाओढ सुरू आहे. थेट रुग्णालयात दाखल व्हा, उपचार घ्या आणि बिल कंपनी देऊन टाकेल, अशा सुविधा मध्यमवर्गीय व नोकरदारांना मिळत आहेत. खरी निकड असूनही असंघटित कष्टकरी मात्र ह्या सोयीपासून वंचित आहेत. याची बोच डॉ. अहंकारींना वाटत होती. त्यांनी युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीच्या अधिकाऱ्यांना गाठले. सव्वा चारशे बचत गटांच्या संजीवनी महिला बचत महासंघाला सभासदांच्या आरोग्याचा विमा उतरवायचा आहे, हे समजल्यावर अधिकाऱ्यांनीही मार्ग सांगितला. कुटुंब आरोग्य विमा योजनेत १९९ रुपयात अपघात विमा, घरासाठीचा आग व भूकंपासाठीचा विमा यांचाही समावेश केला. या योजनेत वर्षभरात लाभधारकाला बाळंतपण व इतर कुठल्याही आजाराकरिता रुग्णालयात दाखल केल्यास ५०००/- रुपये पर्यंतचा खर्च परत मिळू शकतो. वर्षातून एकदा संपूर्ण शरीराची तपासणी मोफत करून मिळणार आहे. ही योजना गोरगरीबांसाठी संकटकाळी बाहेर पडण्याचा मार्ग ठरली आहे. डॉ. अहंकारींनी अनेक व्यासपीठांवरून तिचा

पाठपुरावा केला. ते स्वत: राज्य नियोजन मंडळाच्या आरोग्य गटाचे सदस्य आहेत. आता राज्य सरकारने उस्मानाबाद, बीड व ठाणे जिल्ह्यात आरोग्यविमा लागू करण्याचा पथदर्शी प्रकल्प हाती घेतला आहे. त्याची सूत्रे 'हॅलो मेडिकल फाउंडेशन'वर सोपवण्यात आली आहेत.

२००७ सालच्या जून महिन्यात 'हॅलो मेडिकल फाउंडेशन'चे सर्व सोयींनी सुसज्ज रुग्णालय अणदूर येथे सुरू झाले. दहा रुपयात नोंदणी व तपासणी, मलमपट्टीसाठी पाच, इंजेक्शनचे दहा, रक्त तपासणीचे वीस, इ.सी.जी.चे चाळीस, एक्स रेचे साठ, सोनोग्राफीचे एकशे पन्नास रुपये असे माफक दर आहेत. रुग्णालयात दाखल झाल्यास खाटेला दररोज पन्नास रुपये एवढे शुल्क लागते. डॉ. शुभांगी अहंकारी कटाक्षाने बाळंतपण नैसर्गिक रीतीने होऊ देतात. त्यासाठी त्या पहिल्या महिन्यापासून योग्य तो सल्ला देत असतात. त्यांच्याकडे सिझरची वेळ फार क्वचितच येते. इतरत्र नैसर्गिक बाळंतपण इतिहासजमा होऊ लागले आहे. बाळंतपणाचा खर्च आठशे, सिझरकरिता पाच हजार एवढ्या नाममात्र दरात आरोग्याच्या सर्व सुविधा अणूदूरमध्ये उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे त्यांना पन्नास किलोमीटर जाऊन सोलापुरात यापेक्षा दुप्पट खर्च करण्याची वेळ येत नाही.

## विस्कटलेल्या समाजाला सांधण्यासाठी

'गावात काम करताना गावकऱ्यांची साथ मिळत नाही. अडचणी वाढत जात आहेत.' गावाशी संबंध येणारे शासकीय कर्मचारी, स्वयंसेवी मंडळी, राजकीय पक्ष, संघटनांची हीच भावना आहे. वीजेच्या तारेवर आकडा करून वीज थेट घरात न्यावी, पाईप फोडून पाणी शेताला वळवावं, लावल्या जातील तेवढ्या तोट्या पळवाव्यात, ही वहीवाट झाली आहे. परिणामी गावातील व्यवस्थापान यंत्रणा मोडून पडली आहे. गावातल्या सगळ्या सुविधांचा बट्ट्याबोळ झाला आहे. शहरात गेल्यावर शिस्त पाळणारे गावात आल्यावर मात्र स्वच्छता, नियमानं वागण्याच्या शहरीपणाची यथेच्छ टिंगल करतात. गणपती, नवरात्र, जयंत्यांना एकत्र येणारं गाव वाटेल तेवढा खर्च करतं. मंदिरांवर लाखभर रुपये सहज जमवतात. पण पाणी व्यवस्थापन, सार्वजनिक सुविधांसाठी ढुंकून पाहायची तयारी नसते. इतर कुणी पुढाकार घेतला तर गावाची साथ मिळत नाही. त्यातूनही कुणाला पटलं आणि तो स्वयंसेवी संस्थेच्या कामात मदत करू लागला तर टग्यांकडून रॅगिंग सहन करावं लागतं. अशा प्रसंगी सज्जनांचा आवाज क्षीण असतो, बाकी गाव मजा बघतं. कर्मचारी, शासकीय असो वा बिगर शासकीय गावात काम करता येणं अशक्य आहे, यावर त्यांचं एकमत असतं. अशा कोंदट वातावरणात 'हॅलो'ची गावे लख्ख उजळलेली दिसतात, ते सामूहिक कर्तबगारीमुळेच! त्यामागील सूत्रधार आहेत, डॉ. शशिकांत अहंकारी!

डॉ. अहंकारी यांनी ठरवून ग्रामीण भागाकडे जाण्याची सदैव निवड केली. पदवी घेतल्यावर त्यांनी पुण्याच्या के.इ.एम.रुग्णालयासाठी वडू गावात काम करताना स्वत:चा ठसा उमटवला होता. गाव स्वच्छ करताना आबालवृद्धांचा



सहभाग घेण्यात ते यशस्वी झाले होते. दोन वर्षच ते तिथे होते. पण त्या भागातील ग्रामस्थ अजूनही त्यांना भेटायला अणदूरला येत असतात. एवढीच आपुलकी त्यांना औरंगाबाद जवळच्या आडगाव, वैजापुरात लाभली. १९८०च्या दशकात ते काही वर्षे लोहकरे गुरुजींमुळे बार्शीजवळील गौडगाव परिसरात जात होते. त्यावेळेस तिथले रहिवासी डॉ. अहंकारींची वाट पाहत असत. आणि आता 'हॅलो'मुळे त्यांचा सुमारे एक लक्ष ग्रामस्थांशी संपर्क आहे. तीन वर्षात तीस हजार रुग्णांवर भारतवैद्यांनी उपचार केले आहेत.

सामाजिक चळवळींचे गाढे अभ्यासक व 'ग्रंथाली'चे संस्थापक दिनकर गांगल नेहमी म्हणतात, ''शहरातल्या सोयीसुविधा नसताना ग्रामीण भागात काही महिने राहणे हीच बाब दाद देण्यासारखी आहे. शहरात आपल्याला कित्येक गोष्टी सहज उपलब्ध असतात. औषधांपासून शुद्ध पाण्यापर्यंत आणि समविचारी मित्रांपासून करमणुकीपर्यंत काहीही मिळणार नाही, याची आपण कल्पनाच करू शकत नाही. असे असताना आपले आयुष्य ग्रामीण भागात घालवणाऱ्यांना आदराने वंदन केले पाहिजे.'' स्वत:चे वेगळे आयुष्य न ठेवता ग्रामीण जीवनात समरस होऊन त्यांच्यात बदल घडवणारे अहंकारी दांपत्यासमोर नतमस्तक होणाऱ्यांची भावना अशीच असते.


विवाहानंतर गावाकडे जायचे आहे, असे समजल्यावर कुठली डॉक्टर तरुणी तयार होईल? मुंबईच्या वैद्यकीय महाविद्यालयात शिकलेल्या डॉ. शुभांगींचा निर्णय जाणीवपूर्वक होता. १९८० साली अणदूरमध्ये फ्लशचा संडास नावालासुद्धा नव्हता. वातावरणातील फरक शब्दात सांगता येत नाही. नातेवाईक, मैत्रिणी नावे ठेवत असताना डॉ. शुभांगींचा निर्धार कायम राहिला. भूकंपानंतर शशिकांत गावोगावी फिरत असतात. रुग्णालय पूर्णपणे त्याच सांभाळतात. रात्री, अपरात्री, पहाटे बाळंतपण, सर्पदंशाचे रुग्ण येतात. बाई उठून उपचाराला लागतात. अणदूर भागातील पन्नास-साठ किलोमीटर अंतरापासून रुग्ण येत असतात. किती पैसे मिळाले, किती बुडाले याचा हिशेब ठेवायचाच नाही. शिवाय सोबत 'हॅलो'चा वाढता पसारा. महिला मेळावा, रोगनिदान शिबिर, किशोरी प्रशिक्षण, सतत कार्यक्रम चालूच! मृदू आवाजात बोलणाऱ्या सौम्य स्वभावाच्या शुभांगींना हा परिसर 'फ्लोरेन्स नाइटेंगल' मानतो.

आता गावात गावपण राहिलं नाही. कुणी कुणाला विचारत नाही. नाती तुटत चालली आहेत. ही खंत केवळ शहरी नाही तर गावांमधूनही हेच ऐकायला मिळते. पण केवळ तक्रार करत बसण्याने काय साधणार? विस्कटत जाणाऱ्या समाजाला सांधण्यासाठी सकारात्मक विचार देणारी कृती आवश्यक



आहे. आरोग्यसेवेपासून सुरुवात केल्यास समाज सहज एकटवतो. ('प्रेम, सेवा, शरण सहज जिंकी मना' हे नुसतं गाण्यापुरतं ठेवून समाजाचा गाडा कसा चालेल?) साहचर्याच्या असंख्य कृतींची शृंखला अभिक्रिया त्यातून उभी राहते. हे 'हॅलो'च्या संघटित प्रयत्नांमधून सिद्ध होते. गेल्या तीन वर्षात सत्तर भारतवैद्यांनी पन्नास हजार रुग्णांवर उपचार केले. दीड हजार रुग्णांना संदर्भ सेवेसाठी पाठवले. साडे चार हजार बाळंतपणे केली. तीस भ्रूणहत्या वाचवल्या. अनवाणी डॉक्टरांच्या ह्या कर्तृत्वाचे मोल कशात करणार?

चीन महासत्ता होण्याच्या मार्गावर आहे. तिथले अर्थशास्त्रज्ञ सरकारला इशारा देत आहेत, 'चीनची आरोग्यव्यवस्था अनवाणी डॉक्टरांनी समर्थपणे पेलली आहे. तिला कुठलाही धक्का बसला तर अर्थरचनेला तडे जातील.' अर्थतज्ज्ञ अमर्त्य सेन हेच सांगून थकले. आपलं काय होणार?



स्त्री मुक्ती संघटनेचा जन्म, कोणत्याही चळवळीप्रमाणे, सामाजिक गरजेमधून झाला; परंतु संघटनेचे वैशिष्ट्य असे, की तिची नंतरच्या काळातील जोपासना व तिचा विकास-विस्तार जाणीवपूर्वक व बराचसा योजनेने झाला. त्या पाठीमागे शारदा साठे व ज्योती म्हापसेकर यांची कर्तबगारी आहे. शारदाची बुद्धिप्रगल्भता व अष्टपैलू नेतृत्व आणि ज्योतीची प्रतिभा व खळाळता उत्साह यांमधून स्त्री मुक्ती संघटनेच्या कार्याचा पसारा उभा राहिला आहे. त्या दोघींनी गेल्या तीस-बत्तीस वर्षांत अपार कष्ट घेतले आहेत आणि त्यामुळे स्त्री मुक्ती संघटना हे त्यांचे जीवनव्रत आणि हाच त्यांचा ध्यास बनून गेला आहे.

भारताच्या स्वातंत्र्योत्तर वीस वर्षांत येथील बराच अधिक समाज साक्षर-सुशिक्षित होत गेला. त्याला प्रगतीच्या वाटा दिसू लागल्या. जाणीवजागृती घडून आली. अस्मिता चैतन्यमय होऊ लागल्या. कामगार संघटनांचे मोर्चे, शेतकरी आंदोलन, शिवसेनाचा मराठी आग्रह, भूमिहीन शेतमजूर यांच्या चळवळी, 'ग्रंथाली'चा ग्रंथप्रसार, थिएटर ॲकेडमी-छबिलदाससारखे बंडखोर उपक्रम

**दिनकर गांगल**

## चळवळ ते प्रगल्भ संस्था
# स्त्री मुक्ती संघटना



अशी त्याची दृश्य लक्षणे होती. ह्यांतील बहुतेक प्रयत्न स्थानिक गरजेतून, इच्छा-आकांक्षा-उर्मीतून निर्माण झाले होते. पण त्याच सुमाराला आपल्या येथे सुरू झालेल्या स्त्रियांच्या स्वातंत्र्य चळवळीला जागतिक पार्श्वभूमी होती. इंग्लंड-अमेरिकेसारख्या प्रगत देशांतदेखील विसाव्या शतकाच्या आरंभाला सुरू झालेल्या या मोहिमेने जोमदार स्वरूप धारण केले ते पाचव्या-सहाव्या दशकात. बघता बघता, या मोहिमेने बंडखोरीचे, मुक्तीचे नारे देणे, परंपरेचे सारे संकेत धुडकावून लावणे सुरू केले आणि त्याचे ध्वनी-प्रतिध्वनी आपल्याकडे उच्चशिक्षित वर्गात प्रथम उमटले. स्वाभाविकच त्यांचा बाज उच्चभ्रूपणाचा, निव्वळ वैचारिकतेचा आणि सिद्धांतनाचा होता. स्त्री मुक्ती संघटनेने, १९७५ साली जन्म घेताच हे आवरण भेदले आणि मुक्ती संकल्पना थेट सर्वसामान्य स्त्री (व पुरुष) पर्यंत जाऊन पोचवली. त्यातील पुरुषविरोधी सूर काढून टाकला आणि स्त्री-पुरुष समानतेची हाक दिली. हे नवे आवरण या मातीत सहज रुजणारे होते. पुन्हा संस्थेला नाव दिले तेदेखील हेतू सहज कळेल असे.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे हा संदेश नेण्यासाठी त्यांना उत्तम अस्त्र लाभले ते "मुलगी झाली हो!" ह्या नाटकाचे. ज्योतीचे हे नाटक पाहताना अवघा जनसमुदाय हेलावून जाई आणि त्याच भावनेच्या ओघात विचारप्रवृत्त होई. माणसाच्या हृदयाला हात घालून त्याच्या मेंदूला कार्यप्रवृत्त करण्याची ही जी किमया त्या नाटकाने साधली तसे उदाहरण जगातील चळवळींच्या व आंदोलनांच्या इतिहासात अभावानेच आढळेल. 'मुलगी झाली हो'चा पहिला जाहीर व मोठा प्रयोग 'ग्रंथाली'च्या वाचकदिनी, २५ डिसेंबर १९७५ रोजी झाला होता. त्या एका तासाच्या अनुभवाने एकाच वेळी भारावून गेलेले, सद्‌गदित व अंतर्मुख झालेले साताठशे चेहरे अजून आठवतात–ही सर्व मंडळी उच्चशिक्षित, बुद्धिनिष्ठ, सार्वजनिक जीवनातील सभ्यता-संयम जाणणारी होती. पण साऱ्यांचे डोळे पाणावले होते. स्त्री मुक्ती संघटनेच्या हाती हत्यार आले होते. संघटनेला या नाटकाने 'लीड' दिला. ह्या क्षेत्रात त्या काळात अनेक संस्था काम करू लागल्या, परंतु स्त्री मुक्ती चळवळ स्त्री मुक्ती संघटनेशी एकरूप झाल्यागत भासू लागले. संघटनेच्या नेतृत्वाकडे तशी वैचारिक सामग्री होतीही!

स्त्री वरील अन्याय-अत्याचार, जुलूम-जबरदस्ती, हुंडाबळी अशी प्रकरणे ७०-७२ सालापासूनच पुढे येऊ लागली होती, त्याविरुद्ध ठिकठिकाणी असंतोष प्रकट होत होता, त्यासाठी आघाड्या स्थापन होत होत्या. भगिनीभाव हा त्यावेळी परवलीचा शब्द होता. स्त्री मुक्ती संघटनेच्या कार्यकर्त्या त्या आंदोलनात व्यक्तिश: व नंतर संघटना स्थापन झाल्यावर असतच; पण त्यांचा अधिक रोख प्रसारावर दिसून येतो. त्यासाठी दौरे-यात्रा-भाषणे अशी अनेक माध्यमे होती. त्यांची १९८३ सालची औपचारिक व सर्वसमावेशक मोठी स्त्रीमुक्ती यात्रा ही मोठी झेप ठरली. त्यातून वैचारिक स्पष्टता आली आणि संघटना या मातीशी जोडली गेली. स्त्री मुक्तीचा लढा मानवमुक्तीच्या लढ्याशी जोडल्याबाबत शारदाने त्या यात्राकाळात केलेले विवेचन अजूनही अनेकांच्या लक्षात आहे. तिची संयमित भाषा वापरून आग्रहाने निवेदन करण्याची शैली ही स्त्री मुक्ती संघटनेची ताकद ठरली. 'मुलगी झाली हो'मधून तेच निवेदन खड्या आवाजात होत होते. संघटनेचे ते नाटक आणि कलापथक आजही तेवढेच चैतन्यमय आहे. नवनवीन





नाटके, गाणी रचली जातात आणि नवनव्या लोकांना–गटांना खेचून घेत असतात. बत्तीस वर्षांची अखंड परंपरा!

स्त्री मुक्ती संघटनेच्या (आणि चळवळीच्याही) इतिहासाचे तीन टप्पे पाडता येतील. पहिला १९८० पर्यंतचा काळ ओळख पटण्याचा, जाणीव जागृत होण्याचा काळ होता. तो अनेक तऱ्हेच्या वैचारिक ताणतणावांनीदेखील भरलेला होता. त्यानंतरची पाच-सात वर्षे संघर्षाची, विरोधाची, अस्मिता जाणवून देण्याची आहेत. त्यात आंदोलने आहेत, सत्याग्रह आहेत त्याचबरोबर प्रसारही आहे. त्यानंतर मात्र संस्थात्मक-संघटित कामाचा काळ दिसतो. बऱ्याचशा संस्थांनी या काळात अल्पबचत मोहीम व तदनुषंगिक कामे यांमधून स्त्रीचा आत्मविश्वास



जागा केला व दृढही केला. गावोगावच्या अशा बायका सभासंमेलनातून बोलताना पाहिल्या – ऐकल्या की चळवळीच्या कामाचे सार्थक झाल्यासारखे वाटे!

स्त्री मुक्ती संघटनेचा जन्म मुंबईतला असला तरी यात्रा-दौरे-भाषणे आणि कार्यकर्ता संपर्क यांमधून संघटनेचे कार्यजाळे महाराष्ट्रभर पसरले होते. संपर्क अधिक दृढ झाला तो 'ललकारी' ह्या मासिकातून. संघटनेने ते एकवीस वर्षांपूर्वी सुरू केले. त्याचा साधेपणा आणि आशयाच्या अंगाने पुरेसे गांभीर्य यामुळे मासिक चळवळीचे मुखपत्र बनून गेले, सर्वसामान्य स्त्रीशी सहज संवाद साधू लागले. 'ललकारी'ची संपादक शारदा. तिची वैचारिक झेप मोठी, पण लिहिण्याची शैली सरळ, अनलंकृत व मुद्देसूद; वाचकाला विश्वासात घेऊन त्याच्याशी थेट बोलणारी. त्यामुळे 'ललकारी'ची संपादकीये हे त्या मासिकाचे, एकूण संघटनेचे विचारवैभव ठरत गेले. ती संपादकीये अलीकडे पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली आहेत.

संघटनेच्या दृष्टीने १९८०-९० हे दशक एकाच वेळी प्रसाराचे आणि सुदृढ पायावर उभे राहण्याचे होते. ते साध्य झाले रचनात्मक कामाने. संघटनेने ठिकठिकाणी सल्लाकेंद्रे उभारली, पीडित स्त्रियांना अन्यायावर उतारा आहे, याची खात्री झाली. कामकरी स्त्रियांच्या मुलांसाठी पाळणाघरे उभी राहिली. शारदा-ज्योती यांची त्या काळातील धावपळ आठवली तरी अंगावर काटा उभा राहतो. आईला घारीची उपमा देतात तशा तऱ्हेने या दोघींचे लक्ष महाराष्ट्रभर पसरलेल्या कार्यकर्त्यांच्या, हितचिंतकांच्या कामावर असे, परंतु नजर मुंबईतील सदृढतेवर असे. कोठून कोठून आणि काय-काय मार्गाने त्यांनी साधनसंपत्ती जमा केली! त्या दशकातले कष्ट



आणि सांकेतिक काम त्यांच्या अंतर्गत ताकदीने प्रकट झाले ते पुढील दशकातील 'जिज्ञासा' व 'परिसर विकास' या प्रकल्पामधून, 'जिज्ञासा' पौगंडावस्थेतील मुला-मुलींचे प्रबोधन करते. त्यामधून त्यांचा लिंगभाव विकसित होतो. ही घडण स्त्री-पुरुष समानतेच्या विचारविकासाच्या दृष्टिने महत्त्वाची. संघटना या प्रकल्पाच्या माध्यमातून महापालिका शाळेतील दीड लाख मुलांपर्यंत पोचू शकली. हा प्रकल्प राज्यातील अन्य आठ-दहा गावांत कार्यान्वित झाला आहे.

परिसरविकास ही तर क्रांतीकारक कल्पना आहे. ती स्त्रीमुक्तीच्या मुळाशी जाऊन पोचते. कचरा वेचणाऱ्या महिलांना एकत्र करून त्यांच्या जाणीवजागृतीच्या प्रयत्नांमधून हा प्रकल्प सुरू झाला आणि आता त्याने खत बनवून विकासापर्यंतचे विशाल रूप घेतले आहे. कचरा वेचक महिलांमार्फत कचरा गोळा करून त्याची व्यवस्थित विल्हेवाट लावणे हे या कामाचे सूत्र. त्यात परिसरस्वच्छतेची जाण जशी विकास पावते, तसाच स्त्रीवर्ग स्वायत्त व स्वतंत्र होतो आणि कचरा व्यवस्थापनाच्या कल्पनेतून आधुनिकतेशी जोडला जातो.

स्त्री स्वातंत्र्याच्या एका अमूर्त पण मूलभूत कल्पनेतून स्त्री मुक्ती संघटनेची सुरुवात झाली आणि आज, त्या संस्थेचे काम पथदर्शक ठरले आहे. स्वातंत्र्य भौतिक साधनसुविधांच्या उपलब्धतेतून जबाबदारीने हस्तगत करता येते या सूत्रापर्यंत संघटना येऊन पोचलेली दिसते.

शारदा साठे आणि ज्योती म्हापसेकर या स्त्री मुक्ती संघटनेच्या सूत्रधार राहिल्या आहेत, पण त्यांनी कार्यकर्त्यांची मोठी फळी उभी केली आहे. त्यांतील काहींनी स्वत:ची वेगवेगळी कामे सुरू केली आहेत, तरीदेखील अमोल केरकर, वृषाली मगदूम, अरविंद वैद्य, करुणा गोखले असे त्यांचे साथीदार विविध कामे कसोशीने हाताळत असतात. चळवळ व प्रकल्प अशी योजना संघटनेने आरंभापासून केलेली आहे त्यामुळे मनुष्यबळ व निधी या दोन्ही गोष्टी सुकरपणे जमविता येतात असे जाणवते.

स्त्री मुक्ती संघटनेला देशविदेशात मान्यता आहेत, अनेक पुरस्कार लाभले आहेत. 'युनो'च्या 'एकॉनॉमिक ॲण्ड सोशल कॉज' या संस्थेच्या अंतर्गत संघटनेची नोंद आहे, त्यामुळे विविध परिषदां-बैठकांनिमित्ताने संघटना प्रतिनिधी देशी-विदेशी जात असतात व आपला ठसा उमटवतात. ज्योती म्हापसेकर आंतरराष्ट्रीय नाटककार परिषदेची सभासद व पदाधिकारी आहे. त्या स्वतंत्र बाण्याने तिची भ्रमंती चालू असते. शारदा राज्य महिला आयोगाची सदस्य होती. त्या माध्यमातून शासकीय धोरणावर व योजनावर आपण प्रभाव टाकू शकलो हे समाधान तिला आहे.

चीनमधील बीजिंग येथे १९८५मध्ये जागतिक महिला परिषद भरली होती. तेथे ज्योती म्हापसेकरने भारतातर्फे 'ले कंधोपर आधा आकाश' गाणे सादर केले. तो रोमांचक क्षण होता. त्या गाण्याचा 'पोस्ट बीजिंग पोएट्री' या मिनिसोटा विद्यापीठाने (अमेरिका) प्रकाशित केलेल्या आंतरराष्ट्रीय कवितासंग्रहात समावेश आहे. ही फार मोठी गोष्ट आहे. त्या दोघींनी अशा अनेक साध्यता गेल्या बत्तीस वर्षात कमावल्या आहेत आणि संघटनेच्या चरणी अर्पण केल्या आहेत. त्यामुळेच स्त्री मुक्ती संघटना चैतन्याने सतत बहरलेली असते. संघटना काळाच्या गरजेतून १९७५साली चळवळ रूपाने निर्माण झाली हे खरे, परंतु तिने आज कालानुरूप प्रगल्भ संस्थेचे रूप धारण केले आहे. स्त्री स्वातंत्र्याची चळवळ आहेच; परंतु चळवळीला जोड आहे अनेक स्थायी प्रकल्पांची. स्त्री मुक्ती अबाधित राहो! स्त्री-पुरुष समानता अमर राहो!



दि. २७ ऑक्टोबर २००७चा दिवस, वेळ दु. २-२.३०ची. स्थळ रयत शिक्षणसंस्थेच्या सातारा येथील मध्यवर्ती कार्यालयातील दुसऱ्या मजल्यावरील पदाधिकाऱ्यांच्या बैठकीची खोली. डॉ. सुबोध वागळे सांगत होते की, नीरा-देवधर धरणाचे काम जवळ जवळ ९०% पूर्ण झाले आहे. पैशाअभावी १०% उर्वरित काम बांधा-वापरा तत्त्वावर द्यायचे घाटते आहे. एवढे ऐकताक्षणीच एक निश्चयी, गंभीर पण जोशपूर्ण आवाज आला, ''असे असेल तर हा प्रश्न हातात घ्यायला हवा. तुम्ही परिषद बोलवा, मी तुमच्या बरोबर येतो.'' हा आवाज होता महाराष्ट्राला परिचित असणाऱ्या व नुकतेच ऐंशीव्या वर्षात पदार्पण केलेल्या अफाट ऊर्जेचा. या ऊर्जेचं नाव अर्थातच एन. डी. पाटील. महाराष्ट्र सरकारच्या प्रस्तावित भूजलविधेयकावरील चर्चासत्र २७-२८ ऑक्टोबर २००७ रोजी साताऱ्यामध्ये झाले. बीजभाषक होते एन. डी. पाटील. त्या आधीच्या काही मिनिटांपूर्वीचा हा प्रसंग एनडींच्या व्यक्तिमत्त्वाची योद्धा आणि विचारवंत ही दोन्ही रूपे (त्या-त्या क्षणाच्या / प्रश्नाच्या गरजेनुसार) पुढे आणणारा. एन. डी. ही दोन अक्षरे महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात गेली

**किशोर बेडकिहाळ**

# विचारवंत योद्धा
# एन. डी. पाटील



जवळपास सहा दशके रुजली आहेत. सत्तेत असो अथवा नसो मूल्यनिष्ठा, नैतिक आचरण, सामान्य माणसांच्या प्रश्नांशी बांधीलकी यामुळे एनडी आज सामान्यांचा 'आवाज' ठरले आहेत. एनडी या अक्षरामागे उभी असलेली ताकद मात्र एनडींनी विद्यार्थीदशेपासून कमावली आहे व आजतागायत ती राखली आहे.

वाळवे तालुक्यातील ढवळी हे खेडेगाव कृषिप्रधान कुटुंबात जन्मलेले एनडी शिक्षणाच्या वाटेला गेले तेही आधीच्या पिढ्यांची निरक्षरतेची परंपरा मोडण्यासाठीच. विद्यार्थीदशेतच राष्ट्र सेवा दलाचे संस्कार मिळाले. परीट गुरुजी, आर. व्ही. खैरमोडे यांच्यासारख्या वाचनवेड्या, संस्कारक्षम शिक्षकांचा सहवास मिळाला. हाडापेरांनी मजबूत असलेल्या व परिश्रमाला सरावलेल्या एनडींच्या व्यक्तिमत्त्वाला यातूनच धुमारे फुटले. एकपाठी, विलक्षण स्मरणशक्ती, कुशाग्र बुद्धिमत्ता असणाऱ्या एनडींचे वाचनाचे वेड एका बाजूला वाढत होते. त्याचवेळी १९४२ची चळवळही त्यावेळच्या अखंड सातारा जिल्ह्यात जनमानसाची पकड घेत होती. एनडी या वातावरणापासून अलिप्त राहूच शकत नव्हते. दारूदुकान बंद पाडण्याचा आपल्या मित्रांसह आखलेल्या उपक्रमात त्यांचे नेतृत्वगुण जसे दिसले तसेच त्याचा परिणाम म्हणून वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांना पहिला कारावास घडला. आपल्याकडे ज्या वयात विद्यार्थ्यांचे 'करिअर' सुरू होते, त्या वयात एनडींना एका तुरुंगावासाचा अनुभव आला होता. त्यांच्या पुढील सर्व सार्वजनिक आयुष्याचा, सोसलेल्या तुरुंगवासाचा हा आरंभ होता.

कोल्हापूरला महाविद्यालयात शिकताना एनडींच्या राजकीय जाणीवा आकार घेत होत्या. शंकरराव मोऱ्यांच्या संपादकत्त्वाखाली निघणाऱ्या साप्ताहिक जनसत्ताचे अंक हातावर घेऊन एनडी विकत असत. त्या काळात चालू असणारी शेतकऱ्यांची आंदोलने, साप्ताहिक जनसत्तामधील राजकीय–सामाजिक घडामोडींविषयक लेखन, शेतकऱ्यांच्या परिषदा यातून एनडी हळूहळू राजकारणात सक्रिय होऊ लागले. रूढार्थाने ते एम.ए., एलएल.बी. आहेत. पण शिक्षण व राजकीय चळवळीतील सहभाग याचा त्यांनी परस्परांवर परिणाम होऊ दिला नाही. त्यातच त्यांचे वडील व थोरले बंधू एकाच वर्षी निधन पावल्यावर त्यांना कर्मवीर भाऊराव पाटील यांचा आधार मिळाला. भाऊरावांची मते, रोखठोकपणा व एनडींच्या व्यक्तित्त्वाचे रसायन जुळले. कर्मवीरांना त्यांच्या हयातीतच त्यांच्या कार्याचा वारसदार मिळाला. जवळपास १९५० सालापासून आजतागायत एनडी शेतकरी कामगार पक्षात आहेत. तसेच १९५९ साली कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या निधनानंतर ते रयत शिक्षण संस्थेच्या कार्यात आले, ते आजतागायत त्यातही आहेत. शे.का.प. व रयत शिक्षण संस्था ही एनडींची दोन जीवनदानी कार्यक्षेत्रे म्हणायला हरकत नाही. या कार्यक्षेत्रांशी निष्ठा, इमान राखत, त्यांच्या जबाबदाऱ्या



पेलत, आपल्या निष्ठांशी सुसंगत अशा अनेक चळवळीत, एनडींनी केवळ योगदानच दिले नाही तर नेतृत्वही दिले. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ असो, वा गिरणी कामगारांचा लढा असो, शेतकरी आंदोलन असो वा शेतमजुरांचा लढा असो, दलित-आदिवासींचे लढे असोत वा आंबेडकर अकादमी, समाजवादी प्रबोधिनी यांचे प्रबोधनाचे उपक्रम असोत वा अंनिसची चिवट चळवळ असो, एनडींचे अस्तित्त्व यात असणारच. आणि ते अस्तित्वही केवळ वा नाममात्र नाही तर लढाईचा अजेंडा ठरवण्यापासून त्याची रणनीती आखण्यापर्यंत व अंमलबजावणी यशस्वीरीत्या करण्यापर्यंत ते क्रियाशील असतात. लढाई रस्त्यावरची वा विधिमंडळातील डावपेचांची असो, मंत्रिमंडळातील निर्णयांच्या आग्रहाची असो वा पक्षाच्या जाहीरनाम्याच्या आग्रहाची असो वा बौद्धिक वादविवादाची असो एन.डी. पाटील सर्वच ठिकाणी, तेवढ्याच उत्साहाने, निष्ठेने व आवश्यक त्या तयारीनिशी सहभागी होणार व आपला ठसा उमटवणारच.

एनडींच्या नेतृत्त्वाची काही वैशिष्ट्ये त्यांच्या लढ्यातून, चळवळीतून सहजच दिसतात पण एस.एम.जोशी यांच्यासारख्या दूरदृष्टी असणाऱ्या नेत्याला ते आधीच दिसले होते. खुद्द एसेमनीच मृत्यूपूर्वी ३/४ वर्षे आधी एनडींना सांगितले होते की, महाराष्ट्रातल्या डाव्या पक्षांना आघाडीच्या रूपात एकत्र फक्त एनडीच ठेवू शकतील. (प्रस्तुत लेखकाला खुद्द एनडींनीच ही आठवण सांगितली आहे). एसेम जोशींचे हे बोल शब्दश: खरे ठरल्याचे आज अनुभवाला येत आहे. स्वत:च्या पक्षाच्या पलीकडे जाऊन महाराष्ट्रातील डाव्या आघाडीचे नेतृत्व आजतागायत एनडींकडे आहे. डावी आघाडी असो वा जागतिकीकरण विरोधी कृति समिती असो, एन्रॉन विरोधी लढा असो वा कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा लढा असो, बिगरसंसदीय संघटनांचे लढे असोत वा विविध प्रश्नांवर मुख्यमंत्र्यांना भेटण्याचा/भेट मिळवून



देण्याचा प्रश्न असो, सीमाप्रश्न असो, नेतृत्व एनडींचेच असते. कार्यकर्त्यांकडे साधन म्हणून न पाहण्याच्या एनडींच्या खास व्यक्तित्वाचा हा परिणाम आहे.

एनडींनी केलेल्या चळवळी पाहिल्या किंवा ज्या इतर चळवळीत त्यांनी मन:पूर्वक सहभाग दिला त्या पाहिल्या तर सर्व थरातील लोकांच्या प्रश्नांशी एनडींची बांधीलकी स्पष्ट होते. अगदी कोल्हापूरातले व्यापारीसुद्धा किरकोळ व्यापारातील येऊ घातलेल्या परकीय भांडवलाच्या विरोधात काही तरी केले पाहिजे यासाठी एनडींकडेच आल्याचे एनडी आपल्या खास शैलीत सांगतात. शेतकरी, शेतमजूर, गिरणीकामगार, दलित-आदिवासींच्या जमिनींचे प्रश्न, शैक्षणिक प्रश्न, प्रबोधनाचे उपक्रम, अंनिस, नर्मदा आंदोलन यांसारख्या चळवळी, कार्यकर्त्यांवर झालेल्या हल्ल्यांचा-हद्दपारींचा प्रश्न, दुष्काळ, कापूस एकाधिकार, वीजप्रश्न, पाणीप्रश्न यांसारख्या व इतर अनेक प्रश्नांवर एनडी आजही चळवळी करतात वा चळवळींना मदत/सहभाग देतात. ते ज्या चळवळीत वा संस्थेत ज्या पदावर असतात, त्या पदाला पूर्ण न्याय देतात. आज आठ ते दहा संस्थांचे अध्यक्षपद त्यांच्याकडे आहे. शिवाय काही चळवळींचे ते म्हटले तर कायम नेते आहेत. रयत शिक्षणसारख्या बलाढ्य शिक्षण संस्थेत अनेक नवे उपक्रम, प्रशासनातील पारदर्शकता दाखवणारी पद्धती त्यांच्या आग्रहाने व प्रेरणेने सुरू आहेत. विनाअनुदान संस्कृतीपासून 'रयत' दूर आहे, हेही त्यांच्याच दृष्टीचे फलित म्हणावे लागेल. सामाजिक चळवळींना 'रयत'चे उघडे असलेले दार हाही त्यांच्याच आग्रहाचा भाग आहे.

महाराष्ट्रात लढणारे आणि लिहिणारे, विचार करणारे यांच्यात एक सतत द्वैत मानले गेले आहे. बऱ्याचदा दुसऱ्यांना कमी लेखण्यासाठीही याचा वापर केला जातो. बऱ्याचदा दोन्ही प्रकारच्या व्यक्तींना श्रेष्ठत्त्वाच्या भावनेने ग्रासलेले आढळते.




वास्तविक चळवळीला दोन्हींची गरज सारखीच असते त्यामुळे हे द्वैत खरे तर कृत्रिम आहे पण या कृत्रिमतेला वास्तविकता समजून चालल्यामुळे हे द्वैत अधिकच घातक ठरत आहे. विचार करणारे व लढणारे यांच्यातील संवाद वाढला पाहिजे एवढेच नव्हे तर दोन्ही प्रक्रियेत कार्यकर्त्यांनी, नेत्यांनी असले पाहिजे असे मानणाऱ्यांपैकी एनडी आहेत; पण खरे तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वात हे द्वैत पूर्णतः लोप पावले आहे. म्हणूनच एनडींचे वर्णन 'विचारवंत योद्धा' असेच करावे लागेल. सामाजिक प्रश्नांचे सवतेसुभे निर्माण करून, ते वाटून घेऊन त्यावर आपलीच मक्तेदारी निर्माण करणाऱ्या (सांप्रदायिक) नेतृत्वापेक्षा एनडींचे नेतृत्व वेगळे उठून दिसते ते या अद्वैतामुळेच. चळवळीतील/मोर्चातील त्यांची भाषणे धडाडणाऱ्या तोफेसारखी असतात तर चर्चासत्रे, शिबिरे यांतील भाषणे त्यांच्या व्यासंगाचे, अद्ययावततेचे दर्शन घडवणारी असतात; तर विद्यापीठे, विचारवंतांची संमेलने, शताब्दी समारंभ इत्यादींतील भाषणे त्या-त्या प्रश्नांचा तपशीलवार वेध घेऊन भविष्यातील दिशा दाखविणारी असतात. व्यक्तीगत संबंधात ऋजू, संवेदनशील, हळवे वाटणारे एनडी विधिमंडळात आक्रमकही होतात व ती आक्रमकता ही त्यांची कळकळ आणि व्यासंग, प्रश्नांची तीव्रता आणि व्याप्ती यांच्यातून आलेली असते. नर्मविनोद, उपहास, वक्रोक्ती यांनी भरलेली त्यांची संभाषणे ज्यांनी ऐकली असतील त्यांना त्यांच्या सर्वगामी व मूलगामी वक्तृत्वाचा (व नेतृत्वाचाही) प्रत्यय नक्कीच येईल. प्रत्यक्ष प्रश्नांवर लढत असताना एनडींनी लेखणीही चालवली आहे. शासनाच्या विविध योजनांच्या चिरफाड करणाऱ्या पुस्तिका, शेतीमालाच्या हमीभावाचा प्रश्न, महागाई, महागडे शिक्षण, महर्षी वि. रा. शिंदे यांसारख्या विषयांवर त्यांनी लेखन केले आहे. तळमळ, उत्कटता ही त्यांच्या व्यक्तित्वातील वैशिष्ट्ये त्यांच्या लेखनातही दिसतात. म्हणूनच मांडणी करणारे, लिहिणारे एनडी आणि लढणारे एनडी यात फरकच करता येत नाही. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, स्वामी रामानंदतीर्थ विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ यांनी डी. लिट.सारखी सन्माननीय पदवी देऊन एनडींच्या व्यक्तित्वातील विचार आणि कृती यांच्या अद्वैताचाच सन्मान केला आहे असे म्हणता येते.

तसं पाहिलं तर एनडी हे एका डाव्या पक्षाचे नेते. कट्टर मार्क्सवादी-लेनिनवादी. पण अनेक मार्क्सवाद्यांमध्ये दिसणारं कट्टर आंधळेपण त्यांच्यात दिसत नाही. वर्गसंघर्ष किंवा वर्गलढा मान्य करूनही केवळ तेवढ्यानेच परिवर्तन होईल, असं एनडी मानत नाहीत. भारताच्या संदर्भात वर्गलढ्यांबरोबरच





वर्णलढा, जातिअंताचा लढा जाणीवपूर्वक चालवावा लागेल. आपोआप काही घडणार नाही, असं एनडी आजही आग्रहाने मांडतात व त्याचाच भाग म्हणून प्रबोधनाच्या व सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीतही तेवढेच सक्रिय राहतात. 'एक गाव एक पाणवठ्या'ची मोहीम असो वा त्यासाठीचे सत्याग्रह असोत; शनिशिंगणापूरची लढाई असो वा नामांतराची, एनडी सर्वत्रच दिसतात, तो त्यांच्या वैचारिकतेचा भाग म्हणूनच. राजकीय-आर्थिक प्रश्नांइतकेच महत्त्व एनडी सामाजिक सुधारणांच्या चळवळींना व प्रश्नांना देतात. याबाबतीत त्यांची तुलना करायचीच झाली तर, त्यांचेच आद्यस्फूर्तिस्थान असणाऱ्या कर्मवीर वि. रा. शिंदे यांच्याशीच करावी लागेल. वि. रा. शिंदे यांच्या विचाराबद्दल, दृष्टीबद्दल एनडी अत्यंत तळमळीने बोलतात, त्यांच्यावरचा शिंद्यांचा प्रभाव त्यांच्या नेहमीच्या बोलण्यातूनही जाणवतो. या प्रभावामुळे शिंद्यांची 'इतरमीमांसा' एनडींनी आत्मसात केली. महाराष्ट्राच्या आजच्या परिवर्तनवादी चळवळीतील ब्राह्मणी-अब्राह्मणी या पेचात किंवा वादात एनडी अडकून पडले नाहीत. त्याचेही कारण महर्षी शिंदे यांच्या एनडींवर असणाऱ्या प्रभावात दिसतं. म्हणून जातीच्या निकषावर माणसांना जवळ करणं किंवा दूर लोटणं (वैचारिक आणि संघटनात्मक अशा दोन्ही क्षेत्रांत) असला 'एककल्ली पुरोगामीपणा' एनडींजवळ नाही. बरोबर असणाऱ्या माणसांचे विचार व निष्ठा एवढे त्यांना माणसे निवडण्यास, जवळ करण्यास पुरेसे वाटते, असे ते सहजपणे सांगतात. एनडींचा मार्क्सवाद केवळ त्यांना वर्गीय चळवळीत गुंतवू शकला नाही, त्याचे कारण या त्यांच्या दृष्टीतही स्वच्छ दिसतं. कोणत्याही प्रकारचा 'डावा' कार्यकर्ता म्हणूनच त्यांना आपला वाटतो व त्याच्यासाठी ते शक्य असेल तर निश्चितच काहीतरी करतील याची सर्वांना खात्री असते. आज एनडी केवळ शे. का. प.चे नेते म्हणून नाही तर डाव्या आघाडीचे अनभिषिक्त नेते म्हणून मान्यता पावले, तेही त्यांच्या या दृष्टिकोणामुळेच.

ज्या चळवळीत जन्म घालवला ती आज वाईट स्थितीत आहे याचं दुःख त्यांना नक्कीच वाटतं, पण कधीकाळी राज्यात क्रमांक दोनवर असलेल्या आपल्या पक्षाचे आज फक्त पाच आमदार आहेत आणि त्याचं प्रभावक्षेत्र फारच सीमित झालं आहे ही वस्तुस्थिती त्यांना निराश करणारी नव्हे तर अंतर्मुख करणारी वाटते. त्यांच्या दृष्टीनं अंतर्मुख होणं म्हणजे जबाबदारी ओळखणं. केवळ भूतकालीन गौरवाचं चर्वितचर्वण करत स्मरणकातर (Nostalgic) होणं त्यांच्या स्वभावात बसत नाही, तर प्रतिकूल दिवसातही आपल्या तात्त्विक बैठकीवर दृढ विश्वास बाळगून पिछेहाटीची परखड कारणमीमांसा करणं त्यांना अधिक श्रेयस्कर वाटतं. पूर्वी पक्षाच्या दर आठवड्याला किमान पाचदहा तरी लहानमोठ्या सभा व्हायच्या. आता महिनेच्या महिने उलटतात पण सभा होत नाहीत. स्वकष्टांनी पक्षबांधणी करण्याऐवजी कोणत्यातरी प्रस्थापित पक्षाच्या पालखीचे भोई होण्यात धन्यता मानण्याची अनिष्ट प्रवृत्ती तरुणांमध्ये वाढत चालली यालाही पक्षांचे ज्येष्ठ धुरीणच जबाबदार आहेत असं एनडींना वाटतं. लोकांच्या विश्वासाला आपण पात्र ठरत नसू तर यात दोष लोकांचा नाही, आपलाच आहे हे सत्य स्वीकारून त्यांच्या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी अंग मोडून काम करण्याची तयारी आपण ठेवली पाहिजे असं एनडी म्हणतात. लोकांच्या जीवन-मरणाशी संबंधित प्रश्नांवर चळवळी उभारणे, हाच त्यांना कोंडी फोडण्याचा मार्ग दिसतो. म्हणूनच आजही डाव्या पक्षांच्या जागतिकीकरणविरोधी कृतिसमितीचं पुढारपण एनडींकडे आपोआपच चालून आलं. शेतकऱ्यांचे प्रश्न, दलितांचे प्रश्न, बंद पडणाऱ्या उद्योगातील कामगारांचे प्रश्न आजही ते लढ्याचे विषय बनवतात. त्यांच्या सगळ्याच लढ्यांत, कामांत त्यांना यश मिळतंच असं नाही, पण तरीही काम थांबवायचं नाही हे कार्यकर्त्यांनी स्वीकारलंच पाहिजे हाच त्यांचा कटाक्ष राहिला.

सामाजिक चळवळींचे एक विश्वसनीय आधारस्तंभ आणि मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्राला एनडी जेवढे माहीत आहेत तेवढे अन्य डाव्या पक्षातही दुसरे कोणी आढळत नाहीत. चळवळींनी त्यांना मदतीची हाक द्यावी आणि त्यांनी शक्य होईल ते सारे काही चळवळींसाठी करावे, हा जणू नियमच झाला आहे. महाराष्ट्राच्या कोणत्याही भागातील आणि




बृहन्महाराष्ट्रातल्याही एखाद्या चळवळीनं एनडींना भाषणासाठी बोलवावं आणि अत्यंत व्यस्त कार्यक्रमातही एनडींनी त्यांना वेळ द्यावा हे चळवळींच्या क्षेत्रात वावरणाऱ्या सर्वांनाच परिचयाचं आहे. चळवळीसाठी जमेल तेवढं मनापासून करताना एनडी कधीच त्या चळवळींना आपल्या नेतृत्वाच्या वा पक्षाच्या पंखाखाली घेऊ पाहत नाहीत. चळवळींची स्वायत्तता, स्वतंत्र नेतृत्व आणि कार्यक्रमात्मक मुभा यांचा ते नेहमीच आदर करतात. चळवळ कोणाची आहे यापेक्षाही ती कोणत्या प्रश्नावरची आहे आणि बहुजन समाजाच्या दृष्टीने तिचे किती महत्त्व आहे एवढ्यावरूनच एनडी स्वत:ला चळवळींशी जोडत असतात. एनडींच्या तोलामोलाचा पाहुणा वक्ता उपस्थित असूनही चळवळींच्या सूत्रधारांना गुदमरल्यासारखं वा गोंधळल्यासारखं वाटत नाही. त्यांचं कार्यकर्त्यांवर कधी दडपण येत नाही की नेत्यांना कधी चळवळी आपल्या हातून निसटून जाण्याचा धोका दिसत नाही. एनडींच्या उपस्थितीनं, झाला तर चळवळीला फायदाच होईल, नुकसान कधीच संभवत नाही याची त्यांना खात्री असते. अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ, पाणी पंचायत, नर्मदा आंदोलन वगैरे चळवळींना प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे एनडींचा सक्रिय पाठिंबा नेहमीच लाभला आहे.

चळवळींना मदत करण्यात पक्षभेदांच्या विभाजनरेषा एनडी कधीही आड येऊ देत नाहीत. उभ्या महाराष्ट्रातील सर्व पुरोगामी व परिवर्तनवादी चळवळींच्या कार्यकर्त्यांचे नाव-पत्ते, त्यांच्या चळवळींचे टप्पे, वैचारिक भूमिका आणि संघर्ष यांची जशी खडान्‌खडा माहिती एनडी ठेवतात तशीच प्रत्यक्ष प्रश्नाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, सरकारी समित्यांच्या शिफारशी आणि प्रसृत झालेली आकडेवारी एनडींच्या स्मरणशक्तीत पक्की बसलेली असते. गरज पडताच ती त्यांच्या जिभेवर हुकमी पद्धतीने येते. सततच्या भटकंतीतही आपलं वाचन, चिंतन, मनन आणि टिपण निरंतर सुरू ठेवणारे जे फार थोडे अभ्यासू नेते महाराष्ट्रात आज आहेत त्यात एनडींचा खूप वरचा क्रम लागतो. चळवळींना एनडींच्या या व्यासंगाचा आणि अद्ययावत माहितीचा नेहमीच फार उपयोग होत असतो. त्यांच्या प्रासंगिक भाषणांमधूनही कार्यकर्त्यांचे उत्तम प्रबोधन होत असते. व्यासपीठावरच्या त्यांच्या भाषणाइतकंच त्यांचं साधं संभाषणही उद्‌बोधक असतं. त्यांचा कमी-अधिक सहवास ज्यांना घडतो त्या सर्वांचा असा अनुभव आहे की त्यातून नवे काहीतरी हमखास पदरात पडल्यावाचून राहत नाही. त्यामुळेच त्यांचा सहवास चळवळींसाठी संप्रेरक ठरतो.

महाराष्ट्रातील जनतेशी एकरूप झालेल्या या नेत्याला महाराष्ट्र फाउण्डेशन 'विशेष पुरस्कार' देऊन सन्मानित करते आहे. महाराष्ट्रातील कष्टकरी, पीडित-शोषित समूहांच्या तसेच परिवर्तनवादी चळवळींच्या अस्मितेचाच हा गौरव मानायला हवा. एनडींना हार्दिक शुभेच्छा.

प्रवृत्तीने अभ्यासक, कामाची गरज म्हणून वकील, व्यवस्थापकीय प्रशिक्षणाच्या अंगाने प्रशिक्षक आणि स्वत:च्या आवडीचे क्षेत्र म्हणून कार्यकर्ता बनलेल्या, ३८ वर्षांपूर्वी ठाणे जिल्ह्यातील तलासरी तालुक्यात बोर्डिंगमध्ये देखरेख करण्यासाठी शिक्षक म्हणून आलेल्या प्रदीप प्रभू याचा शिक्षक ते आदिवासी प्रश्नांवरील भाष्यकार हा प्रवास साऱ्यांनाच अचंबित करावा असाच आहे.

१९६९मध्ये तलासरीत येण्यापूर्वीचा प्रदीप आधी 'फादर' आणि नंतर काही काळ कामगार संघटनेत काम करण्याचं स्वप्न पाहत होता अन् त्यादृष्टिने शिक्षणही घेत होता, परंतु बोर्डिंगमध्ये भेटलेल्या आदिवासी युवकांनी, तेथील परिस्थितीने त्याचं सारं विश्वच बदलून टाकलं.

१९६९मध्ये तत्त्वज्ञान विषय घेऊन पदवी, १९७२मध्ये टाटा सामाजिक विज्ञान संस्थेत एम.ए., १९७५मध्ये ज्ञानदीप विद्यापीठात धर्मशास्त्राची पदवी (ह्या तिन्ही परीक्षेत फर्स्टक्लास फर्स्ट) आणि पुढे १९७५मध्ये कायदेविषयक पदवी, १९८५मध्ये कायदेविषयक पदव्युत्तर पदवी ही त्याची शैक्षणिक पार्श्वभूमी.

**रमाकांत रामचंद्र पाटील**

# आदिवासींच्या हक्कांचा शिल्पकार
# प्रदीप प्रभू




तलासरीत काम करीत असतानाच, तेथील तरुणांनी दापचरी प्रकरणातील जमिनीचा प्रश्न हाती घेतला. ह्या प्रश्नाच्या अंगाने लोकांना संघटित करण्याचे कामही काही प्रमाणात झाले. यातूनच संपाचे हत्यारही उगारले गेले. परंतु ह्या पहिल्याच लढाईत नवतरुणांना हार पत्करावी लागली. कायद्याची पार्श्वभूमी नसेल तर लढाई अवघड बनते हेही ह्या पहिल्याच लढाईने प्रदीपला लक्षात आणून दिलं. यातूनच त्याने पुढं कायद्याचं शिक्षण घेतलं.

पुण्याहून परतून तो पुन्हा ह्या भागाकडे वळला. याचदरम्यान, मार्क्सवादी विचाराचा व पावलो फ्रेअरीच्या शिक्षणपद्धतीचा फार मोठा प्रभाव त्याच्यावर पडला होता. १९७७मधील तीस-चाळीस युवकांच्या दहा दिवसांच्या शिबिरातून मग त्याच्या आणि कष्टकरी संघटनेच्या प्रवासाला सुरुवात झाली.

" 'आपला इतिहास' घडविण्याची जबाबदारी आपण हातात घ्या", आपला इतिहास आपण घडवा ह्या मूलमंत्राच्या मोहिनीने ह्या तरुणांना उभं करण्याचं काम ह्या शिबिराद्वारे घडले. 'ह्या शिबिराने माझं भविष्य बदललं' ही ह्या शिबिरातील अनेक युवकांची प्रतिक्रियाच शिबिराचं सारं यश सांगून जाणारी होती. पुढे ऑगस्ट ७७मधील आशागड येथील दुसऱ्या शिबिरानं ही वाटचाल अधिक सजग बनविली. कॉम्रेड गोदाताई परुळेकरांचं 'जेव्हा माणूस जागा होतो' आणि 'माणसाच्या ऐहिक इतिहासाची गोष्ट' ही दोन पुस्तके ह्या दुसऱ्या शिबिरात वापरण्यात आली. त्यानंतर यालाच जोड म्हणून छोटा उदयपूर (रंगपूर) येथील संघटनेसह शहाद्यातील श्रमिक संघटना आणि पालघर तालुक्यातील भूमिसेनेचं काम ह्या तरुणांनी तिथं जाऊन जवळून पाहिलं.

आणि यांतील शहाद्यातील भेटीदरम्यानच ह्या तरुणांनी 'कष्टकरी संघटना' नावाने संघटना स्थापन करण्याचा निर्णय घेतला. प्रदीपनंही ह्या तरुणांना साथ देत, संघटनेत सामील व्हायचं मान्य केलं. परंतु हा निर्णय घेऊन घरी परतलेल्या तरुणांना आपापल्या घरात 'तुम्हाला एकट्याने निर्णय घेण्याचा अधिकार कोणी दिला?' ह्या अनपेक्षित प्रश्नाला सामोरं जावं लागलं. हा प्रश्न घरातील स्त्रियांनी उपस्थित केला होता. परिणामी हा निर्णय स्थगित करणं भाग पडलं. पुन्हा एकत्रित बैठक होऊन संघटना स्थापनेचा हा निर्णय उचलून धरण्यात आला. यावर शिक्कामोर्तब झालं २३ डिसेंबर १९७८ रोजी. हाच दिवस मग संघटनेचा स्थापना दिवस बनला. तेव्हापासून





संघटनेनं आणि प्रदीपनंही मागं असं वळून पाहिलंच नाही. संघटनेत सामील होऊन अशा प्रकारे संघर्षात्मक काम करण्याचा निर्णय, प्रदीप ज्या मिशनरी संस्थेमार्फत ह्या भागात कामासाठी दाखल झाला होता, त्यांना खपला नाही. परिणामी प्रदीपची तेथून हकालपट्टी होऊन तेथील त्याचे पाश आपोआपच तुटले.

संघटनेच्या प्रारंभीच पालेमोड-सावकारीविरुद्धच्या लढ्याचं रणशिंग फुंकलं गेलं. ह्या लढ्यात स्त्रियांचा मोठा पुढाकार राहिला. याच लढ्यादरम्यान एका गावात दुकानदारापुढं आंदोलन सुरू केलं तर ज्याची तक्रार होती तो तरुणच गायब झाला. साहजिकच संघटना मोठ्या पेचात सापडली. परंतु त्याचवेळी अन्यायग्रस्त स्त्री पुढं आली. ह्या स्त्रीचं धाडस आणि संघटनेचं पाठबळ यातून यश मिळालं आणि यातूनच पुढं स्त्रिया संघटनेच्या आधार बनल्या.

सावकाराकडील गहाणवट—पैसे जसजसे परत मिळू लागले, तसतशी शारीरिक बळ, व हिंसेची तोवर वाटणारी भीती हळूहळू गळू लागल्याचं चित्रं दिसू लागलं. ह्या लढ्याने सावकारापुढे आव्हान उभे केले. परंतु त्याहीपेक्षा प्रस्थापित राजकीय पक्षांना अधिक कापरं भरण्याचा प्रत्यय लगेचच आला.

गांगणगाव - आंबेसरी येथील चारशे पोती धान्य परत मिळविण्याच्या लढ्यात संघटनेवरील अत्याचाराचं राजकारण सुरू झालं. हा संघर्ष आणखी काही गावांमध्ये पसरला. आठ गावांमध्ये पोलिसांची पथके तैनात राहिली. सारे पुरुष जंगलात आणि पोलिसांचा संघर्ष स्त्रियांशी असं काहीसं हे चित्रं होतं. याच काळात दरोडा-खून-बलात्काराचा प्रयत्न असे आरोप लागून प्रदीपसह कार्यकर्त्यांना पोलीस कोठडीत दिवस काढावे लागले. यात मारझोडीलाही सामोरे जावे लागले.

संघटनेच्याच नव्हे तर प्रदीपसह कार्यकर्त्यांच्या अस्तित्वाचा अन् जीवन-मरणाचा हा संघर्ष थोडा थोडका नव्हे तर बारा-पंधरा वर्षे चालू राहिला. यामध्ये संघटनेच्या म्हणून मानल्या जाणाऱ्या गावांवर-पाड्यांवर हल्ले होत राहिले. मालमत्तेच्या नुकसानीबरोबरीने कार्यकर्त्यांना मारहाणीचे प्रकारही घडले. प्रदीपवर हद्दपारीची नोटीस बजावली गेली इतकेच नव्हे तर बऱ्याच उशिरानंतरही 'टाडा'अंतर्गत अटक करण्याचा विचारही सरकारनं बोलून दाखविला. एसेम अण्णांसह प्रधानसर, वर्देसर, नवनीतभाई, सुहास पालेकर, शरद कुळकर्णी इत्यादींनी त्या काळात संघटनेबरोबर उभं राहून दिलेली साथ संघटनेला भवितव्य देऊन गेली. परंतु त्याहीपेक्षा या सर्व काळात प्रदीप लोकांमध्ये उद्यासाठीच्या जगण्याकरिता धैर्याचं बळ ओतत राहून लोकांचं मनोधैर्य उंचावत राहिला. यातून पुढे सारेजण तावून-सुलाखून बाहेर पडले.

आणि मग संघटनेने आपली दिशा काहीशी बदलत, वनजमिनीच्या प्रश्नात उतरण्याचा निर्णय घेतला. यातून संघटनेचे क्षेत्र आपोआपच विस्तारत गेले. वनजमिनींच्या ह्या प्रश्नात

लागवडीखालील, कसित असलेल्या ह्या जमिनींवर कब्जा करण्यात संघटनेने पुढाकार घेतला. आणि संघटनेचा हा पुढाकार गेली तीस वर्षे टिकून आहे.

वनजमिनींचा हा प्रश्न पुढे सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेला. प्रदीप प्रभू विरुद्ध महाराष्ट्र सरकार म्हणून परिचित ह्या केसने "पुरावा म्हणून सरकारी कागदपत्रे नाहीत, तर हक्क प्रस्थापित होणार नाहीत" हा तोवरचा मान्य पायंडा बाजूला पाडला. आणि "योग्य अधिकाऱ्यामार्फत चौकशी होऊन हा दावा स्वीकारण्यात यावा" हे तत्त्व नव्याने प्रस्थापित झाले. इतकेच नव्हे तर ही प्रक्रिया गावात ग्रामसभेद्वारे चालेल, हेही मान्य करण्यात आले. राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील प्रदीपचं हे मोठं यश होतं.

वनजमिनींवरील कित्येक वर्षांच्या लागवडीतून उभा राहिलेला, वनजमिनींवरील हक्कांचा हा प्रश्न केवळ ठाणे जिल्ह्यातच नव्हे तर नाशिक, धुळे, विदर्भासह साऱ्या राज्यभर होता. यातूनच राज्य पातळीवरील 'जबरन ज्योत आंदोलन' उभे राहिले. पुढे रायगड जिल्ह्यात दळी जमिनींचा प्रश्न म्हणूनही तो उभा राहिला.

यापुढील आजवरच्या काळात जंगलाचा राजा म्हणविला जाणारा आदिवासी, एकतर अतिक्रमक किंवा जंगलाचा विनाश करणारा म्हणून ओळखला जाऊ लागला. जंगलावरील त्याचे हक्क हळूहळू हिसकावून घेण्यात आले. कधी मोठ्या विकास प्रकल्पाच्या नावाखाली तर कधी अभयारण्याच्या नावाखालीही त्याला हुसकावून लावण्याचे काम होत राहिले. एकवेळ जंगल हे त्याचे उदरनिर्वाहाचे साधन व आधार होते तेथेच तो आता परका बनू लागला. ही प्रक्रिया केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर साऱ्या देशभर चालली. यातूनच वनजमिनींचा प्रश्न वनांवरील आदिवासींच्या हक्काच्या लढाईपर्यंत जाऊन पोचला.

प्रदीपने ह्या लढाईत फार मोलाची भूमिका बजावली. 'ईज्जतसे जीने का अधिकार अभियान'द्वारा त्याने देशभरातील आदिवासी संघटनांना एकत्रित करून दिल्ली दरबारी यासाठी कायदा बनविण्याची मागणी केली. आदिवासींचे भवितव्य आणि वने हे एकमेकांपासून अलग करता येणार नाही, हे सध्याच्या केंद्र सरकारला पटवून देण्यात तो साऱ्यांसह यशस्वी ठरला. यातूनच त्याला ह्या कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या गटात सहभागी करून घेण्यात आले. यातूनच पुढे वनांवरील हक्काचा कायदा (२००६) बनला. आदिवासींवरील ऐतिहासिक अन्याय दूर करीत असल्याचे ह्या कायद्याच्या उद्दिष्टांमध्येच नमूद करण्यात आले. वनव्यवस्थेचा दृष्टिकोन वसाहतवादी चौकटीच्या बाहेर काढून अधिकारप्राप्त अशा देशाच्या नागरिकांच्या चौकटीत आणणारा कायदा म्हणूनही ह्या कायद्याचे विशेष महत्त्व आहे. ह्या कायद्याच्या अंमलबजावणीच्यादृष्टीने नियम बनविण्याकरिता नियुक्त समितीतही त्याचा समावेश होता. मात्र नियमाचा मसुदा तयार होऊनही सरकार कायद्याच्या अंमलबजावणीत टाळाटाळ करीत असल्याने, सरकारला जागे करण्यासाठीच्या आंदोलनामध्ये तो सध्या गुंतलेला आहे.

१९९६मध्ये केंद्राने मंजूर केलेल्या 'आदिवासी स्वशासन' कायद्यामागेही त्याचीच प्रेरणा आणि त्याने उभं केलेलं बळ आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे माजी आयुक्त डॉ. बी. डी. शर्मासह बनलेल्या 'भारत जन आंदोलन'च्या माध्यमातून स्वशासन कायद्यासाठीची लढाई लढविली गेली आणि ती यशस्वीही झाली.

तामीळनाडूतील समाजकल्याण-शिक्षण-आरोग्य-पिण्याचे पाणी या विभागाच्या प्रशासनामध्ये सुधारणा घडवून आणण्यातही त्याचा इतर सहकाऱ्यांच्या बरोबरीने हातभार लागलेला आहे. नागालँडमध्ये शिक्षण व आरोग्य विभागाची कामे व निधी गावसमूहाकडे सोपविण्याच्या निर्णयामध्येही त्याची भूमिका महत्त्वाची ठरलेली आहे.

जागतिक आरोग्य संघटना व केंद्रीय आरोग्य मंत्रालयामार्फत ठाणे जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या 'आमचे आरोग्य आमच्या हाती' ह्या गावसमूहांना गावातील आरोग्य सेवांवर देखरेखीचे अधिकार देणाऱ्या उपक्रमानेही आज महाराष्ट्रात राजमान्यता





मिळविलेली आहे व आंतरराष्ट्रीय स्तरावर भविष्यातील आदर्श व्यवस्था म्हणून ज्याकडे पाहिले जाते अशा तामीळनाडूतील सहभागी पाणी उपक्रमाशीही त्याचे नाव जोडले गेलेले आहे.

केंद्र शासनाने अलीकडे घोषित केलेले पुनर्वसन धोरण निश्चित करण्यातही त्याचा सहभाग राहिलेला आहे. पंतप्रधान मनमोहनसिंगांनी गठित केलेल्या आदिवासी विकासासंबंधीच्या स्थायी समितीत त्याचा समावेश आहे. आदिवासी सक्षमीकरण सुकाणू समिती, सर्वशिक्षा अभियान उपगट व सर्वशिक्षा अभियान पाचवी पुनर्निरीक्षण समिती, आदिवासी जमीन हस्तांतर व पुनर्प्रस्थापनविषयक राष्ट्रीय तज्ज्ञ समिती अशा विविध महत्त्वाच्या समित्यांवर अभ्यासक-तज्ज्ञ म्हणून १९८६पासून काम करण्याची संधी त्याने प्राप्त केलेली आहे.

प्रशिक्षक म्हणून आंदोलनाला त्याचे मोठे योगदान लाभलेले आहे. त्याची प्रशिक्षणाची शैली, शिकविण्याच्या विविध सर्जनशील पद्धती आणि जोडीला मार्क्सवादी राजकीय सिद्धान्ताची तर्कशुद्ध पण रसाळ मांडणी या सर्वांच्या तोडीस तोड क्वचितच कोणी मिळेल. त्याने देशभरातील अनेक जनसंघटनांना मूलगामी दृष्टीकोन देण्याचे व राजकीय नेतृत्वाचे केडर बांधण्यात महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. याचबरोबरीने शासकीय अधिकाऱ्यांसह भारतीय प्रशासन सेवेतील प्रोबेशनर्स तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याच्या कामातही तो सतत गुंतलेला असतो.

भारतभरच्या आदिवासी समूहांच्या इतिहासांचा, संस्कृतींचा व समाजजीवनांचा त्याने गाढा अभ्यास केलेला आहे. या अभ्यासास, स्वत: आदिवासी क्षेत्रात संघटनेचे काम करीत असताना, मिळालेल्या अनुभवांची जोड देऊन तो स्वत:चा असा वैशिष्ट्यपूर्ण सिद्धान्त मांडतो. या सिद्धान्तात आदिवासी व जंगलाचे असलेले परस्परावलंबी नाते व त्यातून निर्माण होणारा त्यांचा जंगलावरील हक्क तो प्रभावीपणे समोर ठेवतो. त्यातूनच त्याची आदिवासींच्या सद्यस्थितीतील समस्या व त्यावरील आवश्यक उपाय यांची असलेली समज दिसून येते. या अभ्यासाचे व सुस्पष्ट अस्सल सिद्धान्ताचे मूल्य अनेकांनी जाणल्यामुळेच त्याला विविध ठिकाणी काम करण्याची संधी मिळालेली आहे आणि ह्या प्रत्येक संधीचे त्याने सोनेही केलेले आहे.

७३-७४च्या घटनादुरुस्तीद्वारा स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात आलेले अधिकार, त्यानंतरचा आदिवासी स्वशासन कायदा, अलीकडील संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजना, माहितीचा अधिकार कायदा, वनांवरील हक्कांना मान्यता देणारा कायदा आणि नवीन पुनर्वसन धोरण इत्यादींसारखे भविष्यवादी कायदे जनसंघटनांच्या मार्गानेच झालेले आहेत असे सांगत तो देशभरातील विविध जनसंघटनांचे—त्यांच्या आघाड्यांचे महत्त्व अधोरेखित करतो. 'सेझ'कडेही भविष्यातील एकमेव आशा म्हणून पाहिलं जात होतं. परंतु सरकारला आपल्या मूळ भूमिकेपासून कित्येक पावले मागे हटावं लागतंय,

हेही जनसंघटनांमुळेच असे स्पष्ट करताना, आपल्या शेजारच्या रायगड जिल्ह्यात सेझविरोधी लढा देण्यात आणि सरकारला मागे हटविण्यात जनसंघटनाच पुढे होत्या हेही तो निर्दशनास आणून देतो. याचवेळी आम्हाला राजकीय प्रक्रियांपासून वेगळे राहता येणार नाही. इतकेच नव्हे तर तुम्ही पापी व आम्ही पवित्र अशी भूमिकाही आम्हाला घेता येणार नाही, असे तो बजावतो.

राज्य आणि देशपातळीवरील त्याचे हे काम उल्लेखनीय असेच म्हणावे लागेल. मात्र ठाणे जिल्ह्यातील डहाणू, जव्हार, मोखाडा, विक्रमगड, तलासरी ह्या तालुक्यांसह कष्टकरी संघटनेच्या माध्यमातून गेल्या २९ वर्षांत जे काम उभे राहिलेले आहे, त्याचीही एक विशेष अशी ओळख सांगता येईल.

प्रदीपच्याच शब्दात सांगायचं तर दहा हजाराहून अधिक कुटुंबांना ज्यामध्ये संघटनेच्या सदस्यांबाहेर इतरांचाही समावेश आहे, उदरनिर्वाहाची शाश्वती देण्यात ते यशस्वी ठरलेले आहेत. सुरक्षित निवाऱ्याचा अधिकार आणि त्याहूनही दादागिरी, हिंसक दबाव व सावकारी-गुंडगिरीतून मुक्ती देण्याचे मौलिक काम या काळात झालेले आहे. संघटनेच्या अस्तित्वानंतर पोलीस हस्तक्षेपाचे प्रमाण खूप कमी झालेले आहे. आदिवासी स्वशासन कायद्यातून मिळालेला स्वशासनाचा अधिकार व्यवहारात प्रत्यक्षात मिळालेला नसला तरी, ह्या कायद्यामुळे मिळालेले अधिकार खूप मोलाचे आहेत.

संघटनेच्या २९ वर्षांच्या वाटचालीत, संघटना शिक्षणप्रक्रियेत हस्तक्षेप करू शकली नाही (विशेषतः थेट केंद्रातील सर्व शिक्षा अभियानाच्या समित्यावर काम करूनही), हे तो मोकळेपणानं मान्य करतो. परंतु लोकांच्या जीवनात निश्चिततेची परिस्थिती निर्माण झाल्याने स्थलांतराचे प्रमाण खूप कमी झाले. परिणामी जास्त मुले शिक्षणाकडे वळू लागली हा महत्त्वपूर्ण बदल ह्या काळात घडला. मात्र तरीही आजच्या शिक्षणपद्धतीने आदिवासी संस्कृती नष्ट करण्याचे काम केल्याची खंतही त्याला आहे. आज आदिवासींमध्ये सुशिक्षित सापडतील परंतु त्यांच्यामध्ये जंगल, जमीन, सृष्टी इत्यादींचा दृष्टिकोन हरवलेला आहे, हे दुःख त्याला सतावते. म्हणूनच यापुढील काळात शिक्षणप्रक्रियेत हस्तक्षेप कसा करता येईल, हे कार्यक्षेत्र त्याला खुणावतंय.

संघटनेच्या सुरुवातीपासून साथीदार काळूराम धांगडा, जॉन धांगडा, रडकीबाई; नंतरच्या काळात साथ देणारी मधू धोडी, शिवाजी गोडे, मनोजसारखे असंख्य कार्यकर्ते आणि अर्ध्यावर साथ सोडून गेलेले ताईबाईसारखे अनेक कार्यकर्ते यांच्या बळावरच संघटनेची ही वाटचाल शक्य झालेली आहे.

साऱ्याच क्षेत्रात काम करणाऱ्या पुरुषांच्या बाबतीत त्यांच्या पत्नीची साथ—तिचा वाटा खूप मोठा राहिल्याचं आपण नेहमीच वाचत अन् ऐकतही असतो. प्रदीपच्या बाबतीतील हे सत्य काहीसे वेगळे आहे. प्रदीपसह सारी संघटनाच एका प्रचंड अशा कोंडीत सापडलेली असताना, ह्या कोंडीतून बाहेर पडण्यासाठी सिराजची मिळालेली साथ, त्याचवेळेस त्याच्या आयुष्यातील तिचे आगमन त्याच्यासाठी व्यक्तीगत म्हणून आणि त्याहीपेक्षा संघटनेसाठी खूप मोलाचे ठरले, असे तो मानतो.

सिराजचं केवळ आगमनच नाही तर संघटनेचा सारा इतिहासच स्त्रियांनी रचलेला आहे असेही तो मानतो. संघटनेची पहिली अन् दुसरी हुतात्माही स्त्री आहे. संघटनेसह सारेचजण एका अग्निदिव्यातून जात असताना, छळ-बलात्कार यामध्येही स्त्रियांनीच अधिक भोगलंय आणि संघर्षाच्या प्रक्रियेत - नेतृत्व घेण्यातही स्त्रियाच पुढे राहिल्या. शिसणे, हळदपाडा, नागझरी, सुखडआंबा इथे असे सर्वत्रच हे चित्र राहिलं. आदिवासी समाज व संस्कृतीचा विचार करता, हा काही योगायोग नव्हता तर ही स्वाभाविक अशी प्रक्रियाही होती असे म्हणता येईल. परंतु आज हे चित्र बदलतेय. स्त्रियांना संघर्षाऐवजी संरक्षणाच्या स्थितीत जावं लागतंय. पुरुष पुढे आणि स्त्रिया मागे असं काहीसं सलणारं आणि संघटनेला अनेक पावलं मागे नेणारं असं हे चित्र असल्याची कबुली तो देतो.

असे असले तरीही कष्टकरी संघटना आज या क्षेत्राकरता एकमेव असे हुकमी ठिकाण आहे, जेथे लोक विश्वासानं येतात. संघटनेकडे आलं की काही तरी उत्तर हमखास मिळेल ही हमी-शाश्वती इथं येणाऱ्या साऱ्यांनाच असते. म्हणूनच तर काँग्रेस-राष्ट्रवादीच नव्हे तर मार्क्सवादी समर्थकही इथे आपले प्रश्न-समस्या घेऊन येत असतात. कष्टकरी संघटनेचं आणि प्रदीपचं यश यातच सामावलेलं आहे.

प्रदीप आणि आम्हा साऱ्यांचाही सहकारी ब्रायन लोबो याच्याच शब्दात सांगायचं तर, ''स्थानिक पातळीवरील कार्यकर्ता ते राष्ट्रीय पातळीवरील नेता, तालुका न्यायालयातील वकील ते सर्वोच्च न्यायालयातही समर्थपणे बाजू लावून धरणारा, तरुणांचा—देशभरातील विविध संघटनांचा प्रशिक्षक ते भारतीय प्रशासन सेवेतील वरिष्ठ अधिकाऱ्याचा प्रशिक्षक आणि दुखल्या-खुपल्याला कोठेही सहजगत्या उपलब्ध होणारा ते राजकीय विचारवंत-आदिवासी प्रश्नांवरील भाष्यकार हीच प्रदीपची बहुपेडी अशी खरी ओळख सांगता येईल.''

८९६४


''पुरोगामी हिंदूंच्या चष्म्यातूनच मुस्लीम समाजाकडे पाहतात आणि मग त्यांची मुस्लीम समाजाविषयीची निरीक्षणे साफ चुकतात. मुस्लिमांविषयी ते हिंसक, क्रूर असल्याची एक प्रतिमा तयार करण्यात आली आहे. प्रत्यक्षात ते तसे नाहीत. किंबहुना ते हिंदूंपेक्षा सौम्य आहेत. म्हणूनच हिंदूंमधील प्रबोधनकर्त्यांचा, सुधारकांचा जेवढा सनातन्यांकडून छळ झालेला दिसतो, तेवढा मुस्लिमांमधील परिवर्तनवाद्यांना कर्मठांकडून त्रास झालेला नाही. आम्हां परिवर्तनावाद्यांच्या विचारांना कर्मठ मुस्लिमांकडून उग्र भाषेत विरोध झाला आणि होत आहेही; पण भाषा उग्र असली तरी कधीही ते टोकाच्या भूमिकेला जात नाहीत,'' अन्वर राजन तळमळीने सांगत होता.

कोणत्याही विषयावर अन्वर काम करीत असो किंवा बोलत असो, तळमळीने बोलत असतो. त्या विषयाविषयीची त्याची आस्था व्यक्त होत असते. तो त्या विषयाचे न उकललेले पापुद्रे सहज सोलून हाती ठेवतो. त्यात कोणताही आव नसतो. त्याच्या नजरेला दिसेल तशी एक सरळ साधी मांडणी असते. कुठेही खोटेपणा नको, एवढीच त्याची मागणी असते. मुस्लीम प्रश्नांशी

**संतोष शेणई**



# 'अन्वर'त कार्य



तो पहिल्यापासूनच बांधला गेलेला आहे. गेल्या तीस-पस्तीस वर्षांत अनेक प्रकारच्या सामाजिक कामात तो कमी-अधिक गुंतत गेला; पण मुस्लीम प्रश्नांचा धागा कायम राहिला आहे. त्यामुळेच या प्रश्नांचा विचार करताना चुकते कुठे, हे अन्वर नेमकेपणाने सांगू शकतो.


अन्वर राजनचे कुटुंब मूळचे गुजरातमधील. त्याचे वडील पेणला होते. तेथे त्यांच्यावर स्वातंत्र्यचळवळीचा प्रभाव पडला होता. त्यांनी काही काळ काँग्रेसच्या युवक संघटनेत कामही केले होते. जयप्रकाश नारायण यांचे ते भक्त होते. एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे त्यांना आवडायचे. काँग्रेसमधील समाजवादी विचारधारेकडे अन्वरच्या वडिलांचा ओढा होता. त्याचबरोबर स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विज्ञानवादाचाही त्यांच्यावर प्रभाव होता. त्या संस्कारामुळे ते धार्मिक नव्हते. हमीद दलवाईंच्या चळवळीचे ते समर्थन करीत असत. पाकिस्तानविषयी पराकोटीची विरोधाची भावना त्यांच्या मनात होती. त्यामुळे पाकिस्तान हा घरात नेहमीच चर्चेचा विषय होता. पाकिस्तानातील काही नातेवाइकांचा कटू अनुभव पाकिस्तानविरोधी भावना दृढ करीत गेला. हे सगळे संस्कार शालेय वयातील अन्वरवर होत होते. वडील घरच्या परिस्थितीमुळे कुठच्या चळवळीत प्रत्यक्ष काम करीत नव्हते, पण छोट्या अन्वरला घेऊन वेगवेगळ्या सभांना जरूर जात असत. त्यातून अन्वरच्या मनात राजकीय, सामाजिक जाणिवा नकळत तयार होत गेल्या.

१९७०-७१मध्ये बांगलादेश निर्मितीच्या निमित्ताने वातावरण तापत चालले होते. त्या वेळी युवक क्रांती दलातर्फे पाकिस्तानविरोधात मोठा मोर्चा निघाला होता. त्यात अन्वर सहभागी झाला होता. ही त्याची पहिली जाणीवपूर्वक केलेली सामाजिक कृती होती. मात्र अन्वरच्या या कृतीतूनही त्याच्या वडिलांची पाकिस्तानविरोधाची पराकोटीची भावनाच व्यक्त होत होती. त्या वेळी 'युक्रांद' त्याला माहीत नव्हतं. म्हणूनच त्यानंतर लगेचच झालेल्या निवडणुकीत जनसंघाच्या रामभाऊ म्हाळगींचे त्याने काम केले होते. त्या दिवसांविषयी अन्वर म्हणाला, ''राजकीय सामाजिक जाणिवा घडत होत्या, पण पक्क्या झाल्या नव्हत्या. युक्रांद माहीत नव्हतं. त्यांनी पाकिस्तानविरोधी मोर्चा काढला. आमचे घर पाकिस्तानविरोधी होते. मी या मोर्चात भाग घेतल्याने वडिलांनाही बरे वाटणार होते. म्हणून मी सहभागी झालो होतो. निवडणुकीत म्हाळगींचे काम करू लागलो; पण त्या वेळी जनसंघाचेही विचार नीट माहीत नव्हते. मनात काँग्रेसविरोधाचा विचार पक्का होता. दैनिक 'सकाळ'चा आमच्यावर प्रभाव होता. 'सकाळ'ने म्हाळगींना पुरस्कृत केले होते. तसेच वडील दिवाणजी म्हणून काम करीत. दिवाणजींची संघटना भारतीय मजदूर संघाशी संबद्ध होती. त्यामुळे जनसंघातील काही नेत्यांचा वडिलांशी संपर्क होता, म्हणून मी निवडणुकीत म्हाळगींचे काम करीत होतो.''

याच काळात अन्वरचे युक्रांदशी नाते जुळत गेले. दलितांसाठी शिष्यवृत्ती हवी म्हणून युक्रांदने मराठवाड्यात आंदोलन सुरू केले होते. अन्वरच्या वडिलांना हे आंदोलन आवडले नव्हते. जातींवरून कोणत्याही मागण्या असू नयेत, असे त्यांना वाटे. त्यामुळे अन्वर एके दिवशी युक्रांदच्या कार्यालयात जाऊन वाद घालून आला. त्याच्या घरी त्या वेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे एक कार्यकर्ते येत असत. याच विषयावर अन्वरने त्यांच्याशीही चर्चा केली. चार-पाच महिने अन्वर युक्रांद व संघाच्या कार्यकर्त्यांशी चर्चा करीत होता. या चर्चेतूनच त्याला त्याचा मार्ग दिसत गेला आणि तो युक्रांदमध्ये सामील झाला.

जेपींनी आंदोलन सुरू केले होते. वडील जेपींचे भक्तच होते. युक्रांदही या आंदोलनात सहभागी झाले होते. त्यामुळे अन्वरही सामील झाला. त्यानंतर काही काळातच आणीबाणी पुकारली गेली. आणीबाणीच्या दुसऱ्याच दिवशी ग. प्र. प्रधान यांच्या नेतृत्वाखाली पुण्यात सत्याग्रह होता. त्यात युक्रांदतर्फे अश्विनी मार्कंडेय व अन्वर सहभागी झाले होते. त्या वेळी वीस दिवसांची शिक्षा झाली. अन्वरचा हा पहिला तुरुंगवास. कारागृहातून बाहेर आल्यावर आणीबाणीविरोधी काम सुरूच होते. त्यामुळे लवकरच पुन्हा अटक झाली. हा पंधरा महिन्यांचा बंदिवास अन्वरच्या दृष्टीने खूपच लाभदायक झाला.

अन्वर या कारागृहातल्या दिवसात चांगले मराठी बोलू लागला. तोवर अन्वरचे मराठी हा मित्रांच्या चेष्टेचा विषय होता. अन्वरचे कुटुंब गुजराती भाषक. त्याचे मॅट्रिकपर्यंत शिक्षणही गुजराती माध्यमात झालेले. तो राहायचा मुस्लीम



मोहल्ल्यात. स्वाभाविकच पुणेकर असूनही त्याला मराठी नीट बोलता येत नसे. हा भाषेचा अडसर दूर झाल्याने पुढे विविध गटांत, विविध स्तरांत, ग्रामीण भागातही काम करणे अन्वरला सोपे झाले. त्याने खूप काही लेखन केले नाही; पण एखादा विचार चळवळीच्या दृष्टीने वृत्तपत्रात मांडायचा असेल तेव्हा तो स्पष्टपणे व नेमका मांडता येणे त्याला शक्य झाले. तो 'वक्ता दशसहस्रेषु' कोटीतील नाही; पण मरगळ झटकून जोमाने कार्याला लागण्याची प्रेरणा देण्याइतके सळसळते वक्तृत्व त्याच्यापाशी आहे. त्याची भाषा निर्मळ, स्वच्छ, स्वच्छंदपणे खळखळ वाहणाऱ्या झऱ्यासारखी आहे. कुणाला दुखवायचे नाही, उलट जमलेच तर आपल्या सहवासाने प्रसन्न करून सोडायचे, ही अन्वरची खास शैली. स्वभावातील काही गुणांना कारागृहातच पैलू पडले व मराठीही सुधारली, हा त्याला पुढच्या वाटचालीसाठी मोठा लाभ वाटतो. आणीबाणीच्या दिवसांत कारागृहात वेगवेगळ्या विचारधारांच्या मंडळींबरोबर झालेल्या चर्चांमधून आपले खऱ्या अर्थाने राजकीय, सामाजिक शिक्षण झाले असे तो मानतो. परिवर्तनाच्या विचारांचा पाया मनात खोल व विस्तृत होत गेला. मांडणी पक्की होत गेली.

आणीबाणी संपली. तुरुंगातून सुटका झाली. पुढे काय? एकीकडे घरच्या आर्थिक स्थितीमुळे काम करणे आवश्यक बनले होते, तर दुसरीकडे सामाजिक कार्यात पूर्णवेळ झोकून द्यावे, असे अन्वरला वाटत होते. दरम्यान युक्रांदमध्ये फूट पडली. आणीबाणीने संसदीय राजकाणाची गरज पटवून दिली होती. आणीबाणीत सर्व बिगर राजकीय संघटना, कामगार



संघटना निष्प्रभ झाल्या होत्या. लोकांना चेतवू शकतील अशा संघटना उरल्या नव्हत्या. त्यामुळे संसदीय राजकारणाद्वारे परिवर्तनाचा लढा सुरू ठेवावा, असे एका गटाला वाटत होते; तर दुसरा गट संसदीय राजकारणापासून दूर राहून दबाव गटासारखे काम करू इच्छित होता. अखेर काही मंडळी युक्रांदमधून बाहेर पडून संसदीय राजकारणाच्या वाटेने निघाली. त्यात अन्वर राजनही होता. या काळात तो 'युवा जनता पक्षा'च्या राज्य शाखेचा उपाध्यक्ष होता. मात्र पक्षीय राजकारणात तो रमला नाही. त्याला अपेक्षित असलेले सामाजिक काम करण्यासाठी त्याला वेळ हवा होता. त्यामुळे तो लवकरच पक्षीय राजकारणातून बाहेर पडला. या सगळ्या काळात एकीकडे तो सत्यशोधक मुस्लीम चळवळीत काम करीतच होता. संघटनेत काही जबाबदाऱ्या त्याने स्वीकारल्या होत्या. पेलल्या होत्या. त्यातील 'महिला मदत केंद्र' चालवण्याची त्याचीच कल्पना त्याने यशस्वी करून दाखवली होती. दोन वर्षे हे केंद्र चालवण्याची जबाबदारी त्याने उचलली आणि पुढे पाच वर्षे हे काम केले. शाहबानो प्रकरणाने सुरू झालेल्या लढ्यात अन्वर खूप गुंतत गेला. त्यात नोकरी गमावून बसला. यापूर्वीच त्याच्या लक्षात आले होते, की इतरांसारखी नोकरी करीत सामाजिक काम करणे आपल्याला शक्य होणार नाही. मग त्याने आपल्या सामाजिक कामात मदत होईल अशीच नोकरी करण्याचे ठरवले. डॉ. शरच्चंद्र गोखले यांनी 'केसरी'मध्ये त्याला नोकरी दिली. या काळात सामाजिक परिषदेची शताब्दी व विषमता निर्मूलन परिषद यांचे आयोजन करण्यात त्याचा मोठा वाटा होता. पुढे दहा-बारा वर्षे विषमता निर्मूलन शिबिरे तो घेत होता.

नंतर चार वर्षे मोहन धारिया यांच्याबरोबर 'वनराई'त त्याने काम केले. अन्वरच्या कामाचा झपाटा मोठा. अंगावर घेतलेली जबाबदारी तडीस नेली पाहिजे, एवढेच तो जाणतो. 'वनराई'त तर कित्येकदा तो सोळा-सोळा तास काम करीत असे. ही चार वर्षे खूप आनंदात गेली असे तो सांगतो. ग्रामीण भाग, शेती, पर्यावरण या प्रश्नांशी शहरी अन्वरचा पहिल्यांदाच संबंध आला होता. येथे काम करताना दृष्टिकोन खूप व्यापक होत गेला असे त्याला वाटते. त्यानंतर मणिभाई देसाईंबरोबर 'बाएफ'मध्ये काही काळ त्याने काम केले.

'हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्यूट'च्या स्थापनेत अन्वरचा सहभाग होता. पहिली पाच वर्षे त्याने या संस्थेत विश्वस्त सचिव म्हणून काम केले. या काळात 'सर्वधर्मसमभाव आणि विकास' या विषयावर राज्यात बारा चर्चासत्रे त्याने आयोजित केली. त्यानंतर तयार केलेल्या अहवालाच्या प्रस्तावनेत अन्वरने अल्पसंख्याकांवरील अन्यायाविषयी निरीक्षणे नोंदवली होती. हीच निरीक्षणे सच्चर अहवालामुळे अधोरेखित झाली आहेत, हे तो दाखवून देतो.

अन्वरचा मुस्लीम प्रश्नांचा अभ्यास सखोल आहे. अन्वर मुस्लिमांच्या एका गरीब वस्तीत वाढला. लहानपणापासूनच त्याने सर्वसामान्य मुस्लीम माणसांचे जगणे जवळून पाहिलेले. काही चटके स्वत:ही सोसलेले. त्यामुळेच तो मुस्लीम सत्यशोधक चळवळीला पहिल्यापासून जोडला गेला होता. या संघटनेतील नेत्यांशी जुळवून घेत काम करीत राहिला होता. या नेत्यांनी खूप काम केले खरे, पण त्यांना मर्यादाही खूप आहेत, हे जाणूनही तो काम करीत राहिला. पण गुजरातमधील दंगलीनंतर चळवळीच्या काही नेत्यांनी परस्पर पत्रक काढले. चळवळीच्या आजवरच्या भूमिकेशीच ते विसंगत होते. मुस्लिमांनी अयोध्येवरचा दावा सोडावा व हिंदूंनी दंगली घडवू नयेत, असा त्या पत्रकाचा आशय होता. हिंदू व मुस्लीम या दोन्ही धर्मीयांवर नियंत्रण ठेवू शकेल अशी एकच एक संघटना त्या त्या धर्मात नसताना, असे आश्वासन कोण कोणास देऊ शकेल? आणि कोणी कोणाचे मानावे? दुसरी गोष्ट अशी, की असे संवेदनशील विषय न्यायपालिकेच्या व संसदेच्या कक्षेतील असतील व ते त्याच दोन संस्थांनी सोडवावेत यावर चळवळीचा विश्वास होता. मग एकदम चळवळीने हा विषय त्या दोन संस्थांकडून परस्पर आपल्या हाती का घ्यावा? चळवळीच्या एकूण भूमिकेशी ही विसंगत भूमिका होती. त्यामुळे अन्वरने जाहीर प्रतिक्रिया नोंदवत चळवळ सोडली.

मुस्लीम सत्यशोधक चळवळीशी असलेला पंचवीस-तीस वर्षाचा संबंध संपला, पण मुस्लीम प्रश्नांशी असलेला संबंध तुटला नाही. 'प्रगतिशील भारतीय मुस्लीम आंदोलन' या नवीन संघटनेत रजिया पटेल, राजू इनामदार, अन्वर शेख यांच्याबरोबर काम सुरूच राहिले. 'मासूम' संस्थेचा विश्वस्त म्हणून काम करतानाही हा प्रश्न मनात असतोच. वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील हल्ल्यानंतर सासवड, मालेगाव येथे दंगली झाल्या. त्या वेळी तेथे धार्मिक सलोखा निर्माण करण्यासाठी त्याने भरपूर काम केले. कौटुंबिक हिंसाचाराविरोधात काम करण्यासाठी 'मासूम' अंतर्गत 'साथी' गट स्थापन केला आहे. या गटाचे प्रशिक्षण करून त्याला आंदोलनाचे स्वरूप देण्याच्या कामात अन्वर सध्या गुंतला आहे. सध्या गावातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना, दुर्बल घटकांना सत्ता मिळाली आहे. हे अधिकार त्यांना प्रभावीपणे कसे वापरता येतील. यासाठीही अन्वर मार्गदर्शन करीत आहे.

अन्वरची माणसावरची श्रद्धा अभंग आहे. मुस्लीम धर्मीयांविषयी गैरसमज खूप असल्याने, प्रश्न अधिक जटिल होतो, असे त्याचे म्हणणे आहे. तो म्हणतो, ''सर्वसामान्य मुस्लीम माणूस हा कोणत्याही सर्वसामान्य हिंदू माणसासारखाच साधा, सरळ, गरीब आहे. तो या भारतीय समाजाचा घटक आहे. भारतीय मुसलमान कुणी उपरे नाहीत. ते याच भूमीतील आहेत. त्यांची भाषा इथलीच आहे. मग त्यांच्याविषयी दुरावा का? हिंदू पुरोगाम्यांनाही त्यांचे खरे रूप कळले नाही. जेवढी मुस्लीम माणसाची हिंसक, क्रूर म्हणून प्रतिमा तयार करण्यात आली आहे, तसा भारतीय मुस्लीम अजिबात नाही. हमीद दलवाईंचे कट्टर विरोधक मासफ खान हे हमीदना त्यांच्या अखेरच्या काळात आर्थिक मदत करीत होते, हे किती जणांना माहीत आहे? मी करीत असलेले सामाजिक कार्य, माझे विचार हे माझ्या कित्येक नातेवाइकांनाही पटत नाहीत. माझ्या मोहल्ल्यातही माझे विरोधक आहेत. पण त्या सर्वांचा विरोध माझ्या विचारांपुरता आहे. संघर्षवाहिनीची कार्यकर्ती असलेल्या अरुणा तिवारीशी माझे लग्न ठरले. अगदी ठरवून समारंभपूर्वक लग्न झाले. पुण्यात स्वागत समारंभ होता. मी आंतरधर्मीय विवाह केलेला, निकाह पढलेला नव्हता, कोणतेही धार्मिक विधी केले नव्हते हे सर्वांना माहीत होते; पण सारा मोहल्ला माझ्या आनंदात सहभागी झाला होता. त्यांचा विरोध हा कुणाही भारतीयासारखा लोकशाही पद्धतीने व्यक्त होतो. त्यांची भाषा उग्र असेल, पण कधीही ते टोकाची भूमिका घेत नाहीत. असा माझा आजवरचा अनुभव आहे. उलट एका समाजवादी विचारांच्या संघटनेत विपरीत अनुभव आला होता. तेथील सदस्यांच्या भावनांना समजून न घेण्याइतका कर्मठपणा होता. त्या संघटनेत दोन कार्यकर्त्यांचे 'कोर्टमार्शल' माझ्या डोळ्यांदेखत झाले होते. लोकशाही वर्तन तुम्ही प्रत्यक्षात कसे करता, याचे आव्हान पेलता आले पाहिजे.''

अन्वरची जीभ एरवी 'मृदुनि कुसुमादपि' आहे. तो काहीसा गोष्टीवेल्हाळही आहे. पण एखादे मत मांडताना त्याची जीभ तितकीच परखड व नेमकी होते. ती नम्र जरूर आहे. पण गरज असेल तेव्हा भीडमुर्वत न ठेवणारी आहे. तो मित्र जोडत जातो. त्याला आजवरच्या प्रवासात काही कामे मध्येच सोडावी लागली असली तरी त्या वेळच्या सहकाऱ्यांविषयी त्याच्या तोंडून कटू शब्द निघत नाहीत. तो त्याच्यातील चांगुलपणा सांगतो आणि नव्या कामात गुंतत जातो. मध्यंतरी पाकिस्तानचा दौरा करून आल्यानंतर तो 'पाकिस्तान-भारत लोकमैत्री मंच' या संघटनेच्या कामात गुंतला आहे. लोकस्वतंत्रता संघटना, सामाजिक कृतज्ञता निधी यांची काही जबाबदारी त्याने स्वीकारलेली आहे. कार्यकुशलतेने तो आपले काम समाजाभिमुख आंदोलनात परिवर्तित करीत आला आहे.

अन्वरचा एक विशेष म्हणजे त्याची नित्य प्रसन्नता. अन्वर कधी दमत नाही, थकत नाही. प्रत्येकाला प्रेरणा देत तो नवीनवी माणसे आंदोलनात जोडत जाईल आणि त्याच्या मुखी शब्द असतील 'साथी हाथ बढाना...'




सन १९७० ते ८० या दशकात संपूर्ण भारतात झालेल्या राजकीय उलथापालथीनंतरचे १९८० ते ९० हे दशक म्हणजे समाजकारणाचे सुवर्णयुग मानता येईल. या दोन दशकात पू. जयप्रकाश नारायण यांच्या ''संपूर्ण क्रांतीच्या'' नाऱ्याने संपूर्ण देश ढवळून निघाला होता. पहिले दशक हे राजकीय घडामोडीचे होते. डाव्या पुरोगामी, समाजवादी मंडळींना या काळात मिळालेली राजकीय संधी ते गमावून बसले, मध्यममार्गी काँग्रेस पुन्हा स्थिरस्थावर झाले आणि तोपर्यंत सतत दबावाखाली राहिलेल्या प्रतिगामी विचारधारेने सर्वच स्तरावर आपले बस्तान बसविले. पुरोगामी डाव्या समाजवादी मंडळींच्या राजकीय अपयशामुळे त्यांच्यातील संपूर्ण क्रांतीने प्रेरित झालेला युवावर्ग मोठ्या निराशेत होता. व्यापक परिवर्तनासाठी समाजकारण ही एकमेव आणि पुढे एकांगी बनलेली समाजकारणाची वाट या समाजवादी युवकवर्गाने पत्करली.

तळकोकण म्हणजे पूर्वीचा एकत्रित रत्नागिरी जिल्हा (आजचे रत्नागिरी व सिंधुदुर्ग) हा त्या काळी समाजवाद्यांचा बालेकिल्ला होता. राष्ट्र सेवा दलाच्या शाखा शिबिरांतून सार्वजनिक कार्यासाठी

**डॉ. सुरेश जोशी**


वंचितांचा कैवारी

# राजन इंदुलकर







उत्सुक असलेली तरुणांची फळी तयार होत होती. त्यातूनच ३५-४० जणांचा एक गट संघटित झाला. मागच्या पिढीला राजकारणात मिळालेल्या अपयशामुळे हा गट सामाजिक कार्याकडे वळला. या गटाला "श्रमिक सहयोग" हे नाव देण्यात आले. राजन इंदुलकर हा या गटातील एक बिनीचा शिलेदार! सुरुवातीची दोन वर्ष त्यांनी राष्ट्र सेवा दलाचा




जिल्हा संघटक म्हणून पूर्णवेळ कार्य केले होते. पुढे आयुष्यभर पूर्णवेळ सार्वजनिक कार्य करायचे असा निश्चय त्यांनी केला होता. मध्यंतरी आर्थिक स्थैर्यासाठी आठ वर्षे सहकारी बँकेत नोकरी केल्यानंतर पुढे १९८९मध्ये पत्नी सुषमाने शिक्षिकेची नोकरी पत्करल्यानंतर तो श्रमिक सहयोगाच्या कार्यात पूर्णवेळ रुजू झाला.

त्या काळात तळकोकणात सामाजिक कार्याची चळवळ अस्तित्वात नव्हती. शोषित जनआंदोलनाचे प्रभावक्षेत्र आदिवासी पट्ट्यात म्हणजे ठाणे, रायगड या दोन जिल्ह्यांपुरते मर्यादित होते. त्यामुळे चळवळीचे मानस असूनही श्रमिक सहयोगने संस्थात्मक ढाचा स्वीकारला. अर्थातच हा संस्थात्मक ढाचा केवळ व्यवस्थेपुरता होता. सेवाभावी काम करण्यापेक्षा तळकोकणातील खडतर आणि काहीशा सुस्तावलेल्या जनजीवनात परिवर्तनाची चळवळ उभी करायची अशी या गटाची इच्छा होती. हे काम अर्थातच संघर्षात्मक होते. हा संघर्ष आत-बाहेर अशा दोन्ही पातळ्यांवरचा होता. पहिला संघर्ष आपल्याच परिवारातील वडिलधाऱ्यांबरोबरच होता, राजापूर तालुक्यातील अडीवरे येथील महाकाली देवीच्या महायज्ञास जाहीर विरोध करण्यासाठी ७०-८० युवा जिल्हाभरातून एकटवले. तेव्हा सत्तेतील समाजवादी मंडळी संतप्त झाली. पण त्यामुळे हा युवांचा उत्साह ढळला नाही. त्यांच्या पाठीमागे दिवंगत भिकाजीराव चव्हाण, दि. प्रा. शम्सुद्दीन, अ. ग. परकार हे बुजुर्ग ठामपणे उभे होते हेही विसरता येणार नाही.



अभ्यास, चिंतन, विचारविनिमय हा श्रमिक सहयोगचा स्थायीभाव आहे. प्रत्यक्ष काम करण्यापूर्वी रात्र रात्र जागवून सखोल चर्चा करणे, योग्य दिशा ठरविणे, कार्यपद्धती ठरविणे अशी सवय असल्याने या गटाने प्रथम रत्नागिरी जिल्ह्यातील सामाजिक-आर्थिक परिस्थितीचा सखोल अभ्यास केला. आपल्या हस्तक्षेपात योग्य मुद्दे, रणनीती कोणती ते ठरविले. सारेजण समवयीन मित्र असल्याने हा अभ्यास खेळीमेळीत आणि तितकाच खोलवर व्हायचा. तळकोकणात त्या काळी स्थलांतराचे प्रमाण मोठे होते. तेथील डोंगर-दऱ्यातील खडतर जीवनापेक्षा शहरात जाऊन चाकरी करण्याकडे लोकांचा अधिक कल होता. ही कोकणी माणसे पुढे मुंबईतील सर्वच क्षेत्रांमध्ये आघाडीवर राहिलेली. कोकणातील सर्व घडामोडीदेखील या चाकरमान्यांच्या डोक्याने चालत असल्याने कोकणाकडे स्वत:ची अशी सकारात्मक सुसंगत विकासाची दिशा राहिली नाही. शहरांना मजूर-नोकर पुरविणे, कच्चा माल पुरविणे, मनोरंजन करणे अशीही भूमिका कोकणाकडे आली.

अशा वातावरणात श्रमिक सहयोगने सखोल चिंतनातून कोकण विकासाचा स्वत:चा असा दृष्टिकोन तयार केला. मूलगामी मुद्द्यांना हात घालण्याचे ठरविले. स्थानिक उत्पादकतेला उठाव देण्यासाठी प्रथम या उत्पादकतेच्या आड येणाऱ्या अडसरांना विरोध करणारी चळवळ उभी करण्याचे ठरविले. कोकणातील समृद्ध निसर्गाचा संहार करणारी जंगलतोड थांबविणे हे पहिले काम होते. देवरूख येथील 'पुरोगामी युवक संघटना' या नावाने संघटित झालेल्या मित्र गटाने सह्याद्रीत फोफावलेल्या कोळसा भट्ट्यांना पायबंद घालण्यासाठी न्यायालयीन लढा






दिला आणि तो यशस्वी झाला. पुढे श्रमिक सहयोगतर्फे १९८९ साली उद्‌भवलेल्या महापूराचा सर्व्हे करून "निसर्गातील मानवी हस्तक्षेप" हाच अशा संकटांना कारणीभूत आहे असा निष्कर्ष जाहीरपणे मांडण्यात आला आणि सरकारला शेतजमिनींच्या दुरुस्तीस मदत देण्यास भाग पाडण्यात आले. कोकणात पसरू पाहणाऱ्या रासायनिक कारखानदारीच्या धोरणाविरोधात हा गट ठामपणे उभा राहिला. लोटे परशुराम एम.आय.डी.सी.मुळे या परिसरात व विशेषत: दाभोळखाडीत जे प्रदूषण झाले त्याचा शास्त्रीय अभ्यास करण्यात आला. एका बाजूला लोकांना संघटित करीत दुसऱ्या बाजूला न्यायालयीन लढाई चालू केली. या रिट पिटीशनचा निकाल लागून एम.आय.डी.सी.च्या विस्ताराला पायबंद बसला.

श्रमिक सहयोगने तळकोकणातील विनाशकारी विकासाविरोधात उभी केलेली चळवळ पुढे विस्तारत गेली. त्यातूनच "कोकण संघर्ष समिती"ची स्थापना करण्यात आली. तळकोकणातील स्थानिक जन संघटना त्यात एकवटल्या. एन्‍रॉन विरोधी लढा, दाभोळ खाडी परिसर संघर्ष समिती, महाडजवळील सप्ततारांकित संघर्ष समिती, मच्छिमार कृती समिती, वेळागर संघर्ष समिती, गणेशगुळे जेटीविरोधी संघर्ष समिती अशा जन संघटना पाठबळ देत त्यांना एकत्र बांधण्याचा प्रयत्न झाला. त्यातून कोकण विकासाची कसदार भूमिका पुढे यावी असा प्रयत्न होता. या चळवळीला जन आंदोलनाच्या राष्ट्रीय समन्वयाशी जोडण्यात आले.

कोकणातील जमीनदारी म्हणजेच खोतांची मुळे खोलवर रुजलेली आहेत. प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या कूळ वहिवाटदार शेतकऱ्यांची मालकी सिद्ध व्हावी म्हणून समविचारी संस्था-संघटनांना सोबत घेत पीक पाहणी नोंद मोहिमा राबविण्यात आल्या. या सर्वांच्या सहभागाने "रत्नागिरी सिंधुदुर्ग जिल्हा बेदखल कुळे कृती समिती"चे काम पाच-सहा वर्ष चालले. कूळकायद्यात सुधारणेचा आग्रह धरण्यात आला आणि तो काही प्रमाणात यशस्वी देखील झाला.

स्त्रीप्रश्नाविषयी श्रमिक सहयोगला प्रथमपासूनच आस्था आहे. कोकणातून स्थलांतरीत होणाऱ्या पुरुषांच्या मागे येथील स्त्रिया मोठ्या कर्तबगारीने घरसंसार सांभाळतात. हे जाणून त्यांच्यातील हे नेतृत्वगुण अधिक विकसित व्हावे यासाठी संस्थेने चिपळूण, गुहागर तालुक्यात काम केले. स्त्रियांनी संघटित होऊन प्रथम दारूबंदीचे आंदोलन छेडले. २०-२२ वर्षांच्या वाटचालीत श्रमिक सहयोगने रत्नागिरी जिल्ह्यातील कष्टकरी श्रमिक घटकांचे संघटन बांधण्यासाठी विविध स्तरावर काम केले. सर्वसामान्य उपेक्षित वर्गातील सुप्त ऊर्जांना प्रज्वलित करण्याचे हर तऱ्हेने प्रयत्न केले.

वंचित घटकांतील मुलांच्या शिक्षणाच्या पद्धतीविषयक मांडणीचे काम हे श्रमिक सहयोगच्या कार्यातील आणखी एक वैशिष्ट्य आहे. हे कार्य गेली तेरा वर्षे चिकाटीने चालले आहे. भारतामध्ये भटके-विमुक्त, आदिवासी, दलित व अन्य कष्टकरीवर्गातील एक मोठा हिस्सा औपचारिक शिक्षणापासून



सातत्याने वंचित राहिला आहे. या लाखो शालाबाह्य मुलांना प्रचलित शिक्षणव्यवस्थेत सामील करण्याचे प्रयत्न विविध योजनांमार्फत झाले. पण त्यांना यश आले नाहीत. त्यांचे मुख्य कारण म्हणजे या प्रयत्नात केवळ शालेय सोयींचा विचार करण्यात आला. शिक्षणपद्धतीचा फेरविचार झाला नाही. खरे तर हातावर रोजचा उदरनिर्वाह चालविणाऱ्या या वंचित घटकातील मुलांमध्ये अनेक अंगभूत क्षमता आहेत. या क्षमतांच्या, सामर्थ्यांच्या भांडवलावर या मुलांसाठीच्या मुलांच्या शिक्षणपद्धती बेतल्यासच हे शिक्षण नीट घडू शकते. देशभरातील प्रयोगशील शैक्षणिक उपक्रमांचा अभ्यास करून श्रमिक सहयोगने सह्याद्रीच्या डोंगररांगावर विखुरलेपणाने राहणाऱ्या गवळी, धनगर, तसेच रोजगारासाठी भटकत राहणाऱ्या कातकरी, आदिवासी या दोन वंचित समाजांतील मुलांच्या शिक्षणाचे कार्य हाती घेतले.

सुरुवातीला वाड्यावाड्यांवर अनौपचारिक शिक्षणाचे वर्ग चालविले आणि त्यानंतर म्हणजे सन २००३ साली चिपळूण तालुक्यातील कोळकेवाडी या सह्याद्री पर्वताच्या निसर्गरम्य खोऱ्यात एक प्रयोगशील निवासी शाळा सुरू करण्यात आली. प्राथमिक स्तरावरील लेखन, वाचन, मापन, निरीक्षण या शैक्षणिक क्षमतांच्या बांधणीसाठी उपलब्ध साधनांचा उपयोग तर करण्यात आलाच; पण मुख्य म्हणजे या समाजातील अनुभव सामर्थ्याचा आधार घेण्यात आला. प्रचलित शिक्षणपद्धतीत मुलांकडील अनुभव सामर्थ्याला दुय्यम मानले जाते. शिक्षक हाच ज्ञानसंपन्न आहे असे मानले जाते. या पद्धतीला छेद देत भाषा, गणित, इतिहास, परिसर अध्ययन, विज्ञान या सर्वच विषय शिक्षणात नव्या नव्या पद्धतींचा शोध घेण्यावर भर दिला गेला. स्वत:च्या इतिहासाकडून जगाच्या इतिहासाकडे जावे, स्वत:च्या बोलीभाषेत अभिव्यक्त होत होत इतर भाषांकडे जावे असे केल्याने शिक्षणाविषयीचा, जगाविषयीचा परकेपणा नाहीसा होतो, मुले स्वसामर्थ्यावर शिकू लागतात, असे अनुभव येत गेले. या अनुभवांची देवाण-घेवाण व्यापक स्तरावर व्हावी म्हणून वर्तमानपत्र, नियतकालिकांकडून लेखन करण्यात आले. सध्या कोळकेवाडी येथील प्रयोगभूमी या निवासी शाळेत ५० मुले प्राथमिक व माध्यमिक स्तरावरचे शिक्षण घेत आहेत. हे शिक्षण ॲकॅडमिक (पुस्तकी) न राहता सर्वांगीण असावे म्हणून पारंपरिक कौशल्यावर आधारलेले व्यवसाय शिक्षण आणि कलांचे शिक्षण यांची सुरेख गुंफण करण्यात आली आहे. वंचितांच्या शिक्षणपद्धतीबाबतची ही मांडणी शिक्षणव्यवस्थेला मागदर्शक ठरावी अशी आहे.

आज हा गट केवळ अनुभवसंपन्न न राहता वैचारिकदृष्ट्या परिपक्व झाला आहे. सेवाभावी कार्याच्या चौकटीत अडकून न राहता समाजपरिवर्तनाच्या गतीला योग्य दिशा मिळावी यासाठी कष्टकरी लोकांना संघटित आणि ताकदवर बनवावे असा ध्यास मनात ठेवून श्रमिक सहयोगचे कार्य चालले आहे. अशा प्रकारच्या कार्याला राजकीय धार येत नाही ही एकूणच सामाजिक कार्याची मर्यादा आजवर राहिली आहे. हे मान्य केले तरी कार्याचे मोल कमी होत नाही. श्रमिक सहयोगची ही वाटचाल एक गट म्हणून चालू आहे या कार्यात अनेकांचा सहभाग आहे. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ श्री. दत्ता सावळे यांचा गेली सोळा वर्षे सातत्याने असा सहवास या गटाला मिळाला आहे.

श्री. राजन इंदुलकर यांनी या गटाच्या संघटकाची भूमिका जबाबदारीने पार पाडली. म्हणूनच त्याची योग्य ती दखल घेऊन महाराष्ट्र फाउण्डेशनने त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून पुरस्कार जाहीर केला आहे. या पुरस्कारामुळे गेली २३ वर्षे अतिशय तळमळीने आणि विचाराने कार्य करणाऱ्या या गटाचे मनोबल अधिकच वाढणार आहे, याची मला खात्री वाटते. त्यांच्या भावी वाटचालीला हार्दिक शुभेच्छा!

मित्रवर प्रकाश विश्वासराव,

आपणाविषयीचा स्नेह व्यक्त करण्यासाठी केवळ चार शब्द आम्ही उच्चारत आहोत. स्नेह हा फक्त शब्दांतून व्यक्त होत नसतो याचा प्रत्यय आपण नेहमीच देत आलेला आहात याची जाणीव आम्हाला आहे. रंगमंचाच्या मध्यावर असण्याइतके उदंड कर्तृत्व असूनही प्रसिद्धीच्या झोतापासून आपण स्वत:ला कायमच दूर ठेवत आला आहात. त्यामुळेच आज हे चार शब्द उच्चारण्याची निकड आम्हाला वाटलेली आहे. हे चार शब्ददेखील आपणास रुचणार नाहीत याचीदेखील आम्हाला जाणीव आहे. आपण करीत असलेल्या कार्यावरच सारे लक्ष केंद्रित करणारी आणि त्यापासून मिळणाऱ्या प्रसिद्धीविषयी उदासीन असणारी पिढी हळूहळू नाहीशी होत चाललेली असताना आपणासारखे उदाहरण आमच्या आसपास वावरते आहे याचा आम्हाला रास्त गर्व आहे. आपण नेहमी पडद्यामागे वावरत असता तथापि कुशल नेतृत्वाचे गुण आपणात आहेत. आपल्या नेतृत्वाचा इतरांना आभासदेखील होऊ नये अशी वागणूक ठेवून अत्यंत महत्त्वाची कामे आपण सुविहितपणे सिद्ध केलेली आहेत. लोकवाङ्मय गृह या प्रकाशनसंस्थेला आज जे मानाचे स्थान प्राप्त झालेले आहे त्यामागे आपले निरलस कर्तृत्व आणि शांत नेतृत्व आहे.

आपल्या व्यक्तित्वामध्ये कलावंत आणि व्यवस्थापक यांचा सुरेख समन्वय साधलेला आहे. आपल्या कामांतून कलावंताची नवनिर्मितिक्षमता आणि व्यवस्थापकाची कार्यसिद्धिक्षमता या दोहोंचा प्रत्यय एकाच वेळी येत असतो. आपण कोणत्याही कामाकडे एक आरेखन, डिझाइन म्हणून पाहत असता असे वाटते. त्यामुळेच सम आणि व्यस्त अशा दोन्ही प्रवृत्तींच्या व्यक्तींची आपण चांगली जुळणी करू शकता. त्यांच्यामधल्या कार्यकुशलतेला विधायक अभिव्यक्तीचे विविध मार्ग उपलब्ध करून देत असता. हे जग म्हणजे संकल्पना आणि रूपसिद्धी यांचा अनुभव देणारी कृती आहे असा आपला दृष्टिकोण असावा की काय असे वाटते.

गेल्या काही वर्षांत आपण पूर्ण केलेल्या काही मोठ्या प्रकल्पांची या ठिकाणी सहजच आठवण होते. डॉ. पंजाबराव ऊर्फ भाऊसाहेब देशमुख यांचे अमरावती येथील स्मारक संग्रहालय हे आपणामधल्या नवनिर्माणक्षम प्रतिभेचे आणि व्यवस्थापनकुशलतेचे सुंदर प्रतीक आहे. मुंबई विद्यापीठाच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवप्रसंगी आपल्या संकल्पनेतून रूपसिद्धी लाभलेला मुंबई विद्यापीठ : शहराचे भूषण हा डोळ्यांचे पारणे फेडणारा ग्रंथ म्हणजे आपल्या निर्मितिक्षम आयुष्यातला एक महत्त्वाचा टप्पा आहे. महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारालादेखील न शिवलेल्या आपणाकडून त्या गौरवशाली ज्ञानसंस्थेला केले गेलेले हे विलक्षण सुंदर असे अभिवादन आहे. आपल्या कार्यसंपन्न आयुष्यातला कळसाचा टप्पा म्हणजे लोकवाङ्मय गृहातर्फे साकार झालेला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या छायाचित्रात्मक चरित्रग्रंथाचा प्रकल्प. आपल्या युगातल्या या महान विभूतीचे त्यांच्या महानतेला शोभेल असे ग्रंथरूप सिद्ध करणे हे अत्यंत अवघड असे आव्हान आपण सहजतेने पेलले आहे. भारतातीलच नव्हे तर जगातील थोर पुरुषांमध्ये समाविष्ट झालेल्या या युगनायकाचे चरित्र महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या, जगाच्या कानाकोपऱ्यांत पोहचावे या हेतूने आपण मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीन भाषांतून हा ग्रंथ सादर केला आहे. भारतीय प्रकाशनव्यवसायाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद घ्यावी अशी ही घटना आहे. आम्हा सर्वांना अभिमान वाटावा अशीच ही घटना आहे.

आपल्या सर्जनशीलतेला सीमा नाही. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विश्वाला भूषणावह ठरतील अशी कामे आपणाकडून यापुढेही घडत राहतील असा आम्हाला विश्वास आहे.

यापुढच्या आपल्या नवनिर्माणक्षम आयुष्यासाठी आमच्या मन:पूर्वक शुभेच्छा आहेत.


मृणाल गोरे

**मृणाल गोरे**
विश्वस्त

**सुनील देशमुख**
महाराष्ट्र फाउण्डेशन



मधू आडेलकर
अध्यक्ष
केशव गोरे स्मारक ट्रस्टचे विश्वस्त



डॉ. विलास वाघ



श्री. विलास भोंगाडे



ॲड. सुरेखा दळवी

# महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य पुरस्कार योजना २००७ निवड / सल्लागार समिती (भारत)



प्रा. रवी देवगडकर



श्रीमती प्रतिमा जोशी



श्रीमती रजिया पटेल



विजय दिवाण



श्रीमती ज्योती केळकर



भूषण ठाकूर
निमंत्रक



सुनील देशमुख



**सुनीता धुमाळे**
अमेरिकेमध्ये 'दक्षिण आशियाई महिलांचे प्रश्न' हे प्रमुख कार्यक्षेत्र. तेथील मराठी स्त्रियांमध्ये 'आत्मभान' जागविण्याचे कार्य. हॉस्पाईसारख्या संस्थेच्या सल्लागार. २००४ पासूनच्या 'महाराष्ट्र फाउण्डेशन'च्या अध्यक्षा.

# महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य पुरस्कार योजना

# २००७

# निवड समिती (अमेरिका)



**शोभा चित्रे**
'गोठलेल्या वाटा', 'पानगळीच्या आठवणी' आणि 'गौरी, गौरी कुठे आलीस...?' या पुस्तकांच्या लेखिका. अनेक नियतकालिकांतून सातत्याने ललित-लेखन. अनेक सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यात सहभाग.



**डॉ. अरुंधती विनोद**
स्त्रीरोगतज्ज्ञ, टेनाफ्लाय, न्यूजर्सी
अनेक सेवाभावी संस्थांशी संबंधित

# महाराष्ट्र फाउण्डेशन

चैतन्याची फुलवा झाडे, द्या जगण्याला अर्थ नवा
अडले पडले उचला, ज्यांना आधाराचा हात हवा
— दिलीप वि. चित्रे

'महाराष्ट्र फाउण्डेशन' ही अमेरिकेतील मराठी माणसांची संस्था आहे. १९७८ साली या संस्थेची स्थापना झाली. समाजसेवेची भावना ही या संस्थेच्या स्थापनेमागील प्रेरणा आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या समस्यांचे निवारण करून त्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न ही संस्था गेली एकोणतीस वर्षे करीत आहे.

आदिवासींमध्ये शिक्षणप्रसार, अपंगांचे पुनर्वसन, गावातील आरोग्यसेवेची सुधारणा, शेतीतील उत्पादनवाढीचे प्रयोग यांसारखे समाजोपयोगी उपक्रम करणाऱ्या ध्येयवादी संस्थांना आर्थिक व श्रमदानाचे साहाय्य 'महाराष्ट्र फाउण्डेशन' या संस्थेद्वारे होत असते.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने भारतातील सातशे पन्नासहून अधिक गरजू मुलांना आर्थिक साहाय्य केले आहे; सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्रातील बारा गावे दत्तक घेतली आहेत; जनकल्याण रक्तपेढीमार्फत महाड येथे 'एड्स चिकित्सा प्रयोगशाळा' स्थापन केली आहे. 'पूना ब्लाइंड मेन्स असोसिएशन'साठी एक रुग्णवाहिका घेऊन दिली आहे. महाराष्ट्रातील भूकंपग्रस्तांसाठी पाच लक्ष डॉलर्सचे, तर गुजरातमधील भूकंपग्रस्तांसाठी सव्वा लक्ष डॉलर्सचे साहाय्य केले आहे.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने स्त्रियांचे सबलीकरण, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आदी क्षेत्रांत काम करणाऱ्या साठ स्वयंसेवी संस्थांना ६ लक्ष ८० हजार डॉलर्सच्या देणग्या दिल्या. याव्यतिरिक्त डिसेंबर २००४ मधील त्सुनामीची आपत्ती आणि जुलै २००५ मधला महाराष्ट्रातला पूर या दु:खद घटनांतील संकटग्रस्तांसाठी 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने तातडीने ७३ हजार डॉलर्सची रक्कम उभी केली.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने 'भारत-वैद्य' (अनवाणी डॉक्टर) व 'मैत्रीण' हे दोन नवे प्रकल्पही गेल्या वर्षी हाती घेतले, तर 'समाज परिवर्तनासाठी माहिती तंत्रज्ञान' हा 'फाउण्डेशन'चा प्रकल्प आता दुसऱ्या टप्प्यात प्रवेश करत आहे. एक गाव - एक संगणक हा या प्रकल्पाचा पहिला टप्पा होता व त्याद्वारे आजपर्यंत ५९ खेड्यांना त्याचा लाभ मिळवून देण्यात आला आहे.

अशा रीतीने आजवर भारतातील चारशेहून अधिक संस्थांना ८७ लक्ष डॉलर्सहून अधिक रकमांच्या देणग्या दिल्या गेल्या आहेत. येत्या वर्षासाठी 'महाराष्ट्र फाउण्डेशन' पुढील प्रकल्प हाती घेत आहे : (१) मानवी अपव्यापाराचे नियंत्रण : भारतात या तऱ्हेच्या अपव्यापारातून दरवर्षी हजारो स्त्रिया वेश्याव्यवसायात आणल्या जात आहेत. त्यांतील ४०% प्रमाण १८ वर्षांखालील मुलींचे आहे. हा अपव्यापार थांबवण्यासाठी विविध उपायांचा अवलंब करणे व या व्यवसायातून बाहेर येणाऱ्या मुली/स्त्रियांचे पुनर्वसन करणे या हेतूने हा प्रकल्प योजला आहे. (२) बालिका-विवाह नियंत्रण : लातूरच्या 'ग्रामीण विकास लोकसंस्थे'च्या सहकार्याने १३ ते १६ वयोगटातील मुलींचा विवाह लावण्यास प्रतिबंध करणारा प्रकल्पही यावर्षी सुरू केला जात आहे. (३) निराधार महिला पुनर्वसन/ज्येष्ठ नागरिकांना काळजीवाहू सहकारी : या दुहेरी प्रकल्पातून निराधार परंतु सक्षम महिलांना एकाकी ज्येष्ठ नागरिकांसोबत राहून त्यांना साथ देणे व त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे यासाठी प्रशिक्षण देण्यात येईल. पर्यायाने दोन्ही घटकांना त्याचा लाभ होईल.

विशेष अभिमानाची बाब म्हणजे या सर्व कामाची दखल घेऊन 'संयुक्त राष्ट्रसंघा'ने 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ला Special Consultative Status हा विशेष दर्जा दिला आहे. यामुळे 'फाउण्डेशन'ला संयुक्त राष्ट्रसंघाने आयोजित केलेल्या स्वयंसेवी संघटनांच्या परिषदांना सल्लागार म्हणून उपस्थित राहता येणार आहे.

Invest in future
of those
with no future...
So they can reinvest

हे 'महाराष्ट्र फाउण्डेशन'चे घोषवाक्य आहे.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'ला अभिप्रेत असणाऱ्या या समाज-परिवर्तनाचा वसा घेतलेल्या अनेक व्यक्ती व संस्था महाराष्ट्रात सतत कार्यरत आहेत. अशा संस्था व व्यक्ती यांच्या कार्याबद्दल वाटत असलेली कृतज्ञता अल्पांशाने का होईना, व्यक्त व्हावी या हेतूने श्री. सुनील देशमुख यांच्या पुढाकाराने १९९६ साली सुरू केलेली समाजकार्य पुरस्कार योजना या वर्षी बाराव्या वर्षात प्रवेश करत आहे.

समाजाच्या सांस्कृतिक विकासात व समाजाच्या घडणीत साहित्य व साहित्यिक यांचा मोठा वाटा असतो. मराठी साहित्यिक व साहित्य यांचे हे ऋण अल्पांशाने फेडावे, या भावनेने 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने १९९४ साली सुरू केलेली 'मराठी साहित्य पुरस्कार योजना' या वर्षी चौदाव्या वर्षात पदार्पण करत आहे.

❑




स्थित्यंतर हा कोणत्याही जिवंत समाजाचा गुणधर्म आहे. मुंबईसारख्या महानगरात तर या बदलांची गती विलक्षण असणे स्वाभाविक असते. परंतु या बदलांवर स्वार होत स्वतःची वैशिष्ट्यपूर्ण ओळख जपणाऱ्या व्यक्ती वा संस्था ही त्या महानगराचीही ओळख बनतात. मुंबईच्या गोरेगाव या उपनगरातील 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट' ही अशीच एक संस्था. पन्नासाव्या वर्षांत पदार्पण करताना, गोरेगावच्या सामाजिक-वैचारिक जीवनावर ठसा उमटवण्यात तिला आलेले यश वादातीत आहे.

केशव उर्फ बंडू गोरे या समाजवादी कार्यकर्त्यांच्या अकाली निधनानंतर त्यांची प्रेरणा जागी ठेवण्यासाठी १९५८ साली त्यांच्या निकटच्या सहकाऱ्यांनी हा ट्रस्ट स्थापन केला. बंडू गोरे मूळचे पुण्याचे. स्वातंत्र्य आंदोलनात 'चले जाव चळवळी'च्या काळात भूमिगत असताना ते गोरेगावातील ज्येष्ठ समाजवादी कार्यकर्ते आबा करमरकर यांच्याकडे वास्तव्यासाठी होते. तुरुंगातून सुटल्यावर पुढे १९४८ साली ते करमरकर यांच्या टोपीवाला बंगल्यावर राहू लागले आणि गोरेगाव हेच त्यांचे कार्यक्षेत्र झाले. त्यावेळी गोरेगाव ही ग्रामपंचायत होती. प. बा. उर्फ बाबूराव

**सतीश कामत**

# गोरेगावकरांचा 'ट्रस्ट'!

सामंत हे तिचे सरपंच होते. बंडू गोरे, सामंत प्रभृतींनी समविचारी तरुण कार्यकर्त्यांचा गट बांधला होता. त्या सर्वांवर समाजवादी विचारांचा प्रभाव होता. विशेषतः डॉ. राममनोहर लोहिया, जयप्रकाश नारायण यांचे त्यांना आकर्षण होते.

त्यावेळी महाराष्ट्रात सक्रिय असलेले जे चार-दोनच गट होते, त्यात बंडू गोरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी बांधलेल्या या गटाचा समावेश होता. टोपीवाला बंगल्यात दर बुधवारी ६०-७० कार्यकर्ते जमायचे. येथे चर्चा तर चालायच्याच, पण कृतिकार्यक्रमही आखले जायचे. गावापासून देश-विदेशापर्यंतच्या घडामोडींची सखोल माहिती येथे करून घेतली जायची.


डॉ. लोहिया, जेपी यासारख्यांनी दोन-तीन वेळा या चर्चांत सहभागी होऊन मार्गदर्शन केल्याची आठवण आजही त्यावेळचे कार्यकर्ते सांगतात.

त्यावेळी गोरेगावात कोणत्याच पक्षाचे फारसे राजकीय काम नव्हते. ती पोकळी समाजवादी गटाने भरून काढली. पुढे मुंबई महापालिकेत गोरेगावचा समावेश झाल्यावर नगरसेवक पदासाठी बंडू गोरे यांच्या पत्नी मृणाल गोरे यांना उभे करायचा निर्णय या गटाने घेतला. मृणालताईंना राजकीय कामात सक्रिय करण्यामागे बंडू गोरे यांचा मोठा वाटा होता. तळागाळापासून कामाला सुरुवात करायची म्हणून या गटाने ग्रामपंचायत व महापालिकेच्या स्तरावरील कामाला प्राधान्य दिले होते. गोरेगावात आपल्या राजकीय व सामाजिक कामाचा ठसा उमटवण्यात समाजवादी गटाला यश येऊ लागले असतानाच बंडू गोरे यांचे निधन झाले. त्यांची स्मृती अधिक अर्थपूर्ण रीतीने जपण्यासाठी त्यांचे निकटचे मित्र आबा करमरकर, बाबूराव सामंत प्रभृतींनी केशव गोरे स्मारक ट्रस्ट स्थापन करण्याचा निर्णय घेतला आणि १९५८ साली कुटुंबनियोजन केंद्राच्या रूपाने ट्रस्टच्या कामाला सुरुवात झाली.

त्यावेळी गोरेगावची लोकवस्ती ६०-७० हजारांपर्यंत होती. पण गावात आरोग्यसेवेचा अभाव होता. अगदी खाजगी आरोग्यसेवेचाही. त्यावेळी ट्रस्टकडे स्वतःची जागा नव्हती. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या आरोग्यकेंद्रातच ट्रस्टच्या कुटुंबनियोजन केंद्राचे काम सुरू करण्यात आले. मृणालताईंच्या दोघी बहिणी डॉक्टर होत्या. त्यांच्या मदतीने हे केंद्र चालविले जाई. त्या काळात कुटुंबनियोजन केंद्र चालवण्याची कल्पना आगळीवेगळीच होती. कदाचित मुंबईतील हे पहिलेच केंद्र असावे, असे ट्रस्टचे कार्यकर्ते अभिमानाने सांगतात.

ट्रस्टला स्वतःची जागा मिळाली, ती त्यानंतर तीन-चार वर्षांनी. 'अंबाबाई मंदिर ट्रस्ट'च्या मालकीच्या जागेतून छोटा भूखंड ट्रस्टला माफक भाडेतत्त्वावर मिळाला. वास्तविक ट्रस्टच्या काही हितचिंतकांकडे स्वतःच एखादी जागा विकत घेऊन त्यावर ट्रस्टचे काम सुरू करण्याइतकी आर्थिक क्षमता आणि बांधीलकी जरूर होती, पण लोकसहभागातूनच काम उभे करायचे असा संकल्प असल्यामुळे, गावातून निधी गोळा करण्यात आला आणि मिळालेल्या जागेवर दोन खोल्या बांधून त्यात आरोग्यकेंद्र हलविण्यात आले.

सुरुवातीला केवळ तज्ज्ञ डॉक्टरांकडून सेवा उपलब्ध करून दिली जात होती. समाजवादी चळवळीला वाहून घेण्यासाठी मृणालताईंनी वैद्यकीय शिक्षण अर्धवट सोडले होते. त्यांना त्यावेळी शिकवणाऱ्या अनेक नामवंत डॉक्टरांनी या केंद्रासाठी स्वतःची सेवा विनामूल्य दिली. मृणालताई व अन्य कार्यकर्ते






अनेक वर्षे केसपेपर्स तयार करण्यासारखी कामे करीत. पैशांचा मोठा आधार नसला, तरी काम उभे राहू शकते, हे दाखवून देण्यात त्यांना यश आले. केवळ केसपेपर काढण्यासाठी द्याव्या लागणाऱ्या अत्यल्प दरात नामवंत डॉक्टर्सचे मार्गदर्शन उपलब्ध असल्यामुळे, केंद्राची विश्वासार्हता आणि लोकांमधील मान्यता वाढू लागली. गरिबांनाच नव्हे, तर महापालिका वा सरकारी इस्पितळांतील आरोग्यसेवेपासून दूर राहणाऱ्या मध्यमवर्गीयांनाही या आरोग्यकेंद्राचा मोठाच आधार वाटू लागला. ट्रस्टचे नाव झाले आणि अधिक बांधकाम करायचे ठरविले, तेव्हा लोकांनी भरभरून पैसे दिले.

आज या वैद्यकीय सेवेचा चांगलाच विस्तार झाला आहे. पूर्णवेळ दंतविभाग हे या सेवेचे वैशिष्ट्य आहे. ॲलोपॅथीच्या सर्व शाखा आणि होमिओपॅथी यांचे उपचार येथे उपलब्ध आहेत. आरोग्यसेवेसारख्या सामान्यांसाठीच्या सामाजिक सुरक्षायोजनांवरील सरकारी खर्चाच्या प्रमाणात कपात होत असताना आणि खाजगी आरोग्यसेवा आवाक्याबाहेर जात असताना, या वैद्यकीय सेवेमुळे गरीब व मध्यमवर्गाच्या दैनंदिन आयुष्यात ट्रस्टने आपुलकीचे स्थान मिळवले आहे.

प्रबोधन हे ट्रस्टच्या स्थापनेमागील एक महत्त्वाचे उद्दिष्ट होते. किंबहुना समाजाच्या काळानुरूप जडणघडणीला पोषक ठरेल अशा वैचारिक चळवळीला गती देण्याचे ट्रस्ट हे एक माध्यम ठरावे, अशीच ट्रस्टींची अपेक्षा होती आणि आहे. साहजिकच त्या दृष्टीने अनेक उपक्रम राबवले जात आहेत.

केशव गोरे स्मृतिव्याख्यानाचा उपक्रम सन १९६६पासून दरवर्षी २ फेब्रुवारीला अव्याहतपणे चालू आहे. अपवाद फक्त १९७६ सालचा. त्यावेळी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी लादलेल्या आणीबाणीच्या विरोधात लढणाऱ्या गोरेगावातील अनेक समाजवादी कार्यकर्त्यांना सरकारने तुरुंगात डांबले होते. त्यात केशव गोरे स्मारक ट्रस्टच्या विश्वस्तांचा व कार्यकर्त्यांचाही समावेश होता. त्या वर्षी या व्याख्यानाला सरकारनेच परवानगी नाकारली होती. सन १९६६पासून चालू असलेली ही व्याख्यानमाला हा एक प्रकारचा ज्ञानयज्ञच असून, ग. प्र. प्रधान, एस. एम. जोशी, मधु लिमये, लक्ष्मणशास्त्री जोशी, डॉ. पु. ग. सहस्रबुध्दे, न्या. विद्यारण्य तुळजापूरकर, न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, न्या. पी. बी. सावंत, डॉ. सत्यरंजन साठे, अनंतराव भालेराव, विजय तेंडुलकर, डॉ. य.दि. फडके, डॉ. आ. ह. साळुंखे अशा विविध क्षेत्रांतील अनेक ज्येष्ठ अभ्यासकांनी त्यात विचार मांडले आहेत. याखेरीज सावित्रीबाई फुले व्याख्यानमाला व अन्य चर्चासत्रांच्या माध्यमातून त्या त्या वेळी समाजात चर्चायोग्य असलेल्या घटनांचा सर्वांगाने वेध घेण्याचा प्रयत्न केला जात असतो.

अमेरिकेतील सुनील देशमुख यांच्या प्रमुख देणगीतून महाराष्ट्र फाउंडेशनतर्फे गेली काही वर्षे सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना पुरस्कार दिले जातात. विचाराने सेक्युलर आणि परिवर्तनवादी या निकषांना उतरणाऱ्या

संस्था व कार्यकर्त्यांचा त्यासाठी विचार केला जातो. शिवाय साहित्यक्षेत्रासाठी स्वतंत्र पुरस्कार दिले जातात. ट्रस्टच्या उद्दिष्टांना फाउंडेशनचे पुरस्काराचे निकष हे पूरक असल्यामुळे, पुरस्कारासाठी निवडीची जबाबदारी ट्रस्टने स्वीकारली. महाराष्ट्राच्या दुर्गम भागात तळमळीने काम करणाऱ्या, पण प्रसारमाध्यमांतील महानगरकेंद्री पत्रकारितेकडून उपेक्षित राहिल्यामुळे लोकांनाही माहीत नसलेल्या अनेक कार्यकर्त्यांना पुरस्कार देऊन त्यांच्या कामाविषयी समाजाच्यावतीने कृतज्ञतेची पावती देण्यात ट्रस्ट महत्त्वाची भूमिका निभावत आहे.

प्रबोधनाशीच निगडित कामाचा भाग म्हणून कायमस्वरूपी ग्रंथालय चालवण्याबरोबरच, संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि सोविएत युनियनमधील गोर्बाचेवप्रणीत परिवर्तन, यांच्या दस्तावेजीकरणाचा उल्लेख करता येईल. ट्रस्टचे दिवंगत कार्यकर्ते मुकुंद जोगळेकर आणि माधव साठे यांनी परिश्रमपूर्वक केलेल्या या कात्रणांच्या संग्रहाचे प्रदर्शन ट्रस्टने भरवले होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या अभ्यासकांसाठी एवढे संदर्भमूल्य असलेले दस्तावेज एकत्रितपणे क्वचितच अन्यत्र उपलब्ध असतील, असा ट्रस्टच्या विश्वस्तांचा दावा आहे. ग्रंथालयात संदर्भ ग्रंथ, घरी नेण्यासाठी ललित तसेच वैचारिक पुस्तके आणि वृत्तपत्रे उपलब्ध असतात. ग्रंथालयाला सरकारी अनुदान मिळते.

समाजातील सर्व घटकांशी जोडून घेण्याची दृष्टी ट्रस्टच्या कामांत दिसते. सामान्य आर्थिक स्तरांतील विद्यार्थ्यांना शांतपणे अभ्यास करण्यासाठी महानगरांत असलेल्या जागेच्या अभावाची दखल घेत, अभ्यासिकेची चालू केलेली योजना हे असेच एक काम. अभ्यासिका सकाळी आठ ते रात्री बारापर्यंत खुली असते. इंग्रजीतून संभाषणाचा सराव, कम्प्युटरची ओळख, करिअर मार्गदर्शन, त्यासाठीच्या संधीचा लाभ घेण्याच्या स्पर्धेत उतरता यावे यासाठी परवडणाऱ्या दरात प्रशिक्षण देणारे कोर्सेस, ही आजच्या विद्यार्थ्यांची गरज ओळखून काही प्रमाणात ती भागवण्याचा प्रयत्न ट्रस्ट करतो.

ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्रांसाठी अनेक ठिकाणी घालावे लागणारे खेटे आणि तेथील भ्रष्टाचारामुळे होणारा मनस्ताप टाळण्यासाठी २००४ पासून, ओळखपत्र देण्याचे काम ट्रस्टतर्फे केले जाते. एकाच ठिकाणी ओळखपत्रासाठी आवश्यक ती सर्व प्रकिया होत असल्यामुळे, ज्येष्ठ नागरिकांची मोठीच सोय झाली आहे. आजवर चार हजारांवर नागरिकांनी याचा फायदा घेतला आहे. स्त्रियांसाठी मदतीपासून संघर्षापर्यंत सर्व मार्गांनी कार्यरत असलेल्या 'स्वाधार' या संस्थेचे काम स्वतंत्रपणे ट्रस्टच्याच इमारतीतून चालते.

वस्तीपातळीवरील कामाचेही प्रयोग ट्रस्टने गेल्या चार-पाच वर्षांत सुरू केले आहेत. एका फ्रेंच स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने राबविला जाणारा 'कुटुंब विकास कार्यक्रम' हा त्यापैकी एक. सुमारे ४०० कुटुंबांना त्याचा लाभ होत आहे. बालसंगोपन, कुपोषण रोखणे यासाठी जाणीव जागृतीचे, सरकारी योजनांची माहिती देऊन त्याचे लाभ घेण्यास मदत करण्याचे काम वस्तीत जाऊन केले जाते.

असाच दुसरा कार्यक्रम राबविला जातो, तो गोरेगावच्या महापालिका शाळेतील मुलांची गळती रोखण्याचा. ट्रस्टच्या







कल्पनेतून आणि 'बॉम्बे कम्युनिटी ट्रस्ट'च्या मदतीने साकार झालेल्या या योजनेत पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांवर भर दिला जातो. ही मुले शाळेत का जात नाहीत, याची कारणे त्यांच्या व त्यांच्या पालकांच्या संपर्कात राहून शोधून काढणे, त्यावर उत्तरे शोधण्यास मदत करणे, त्यांच्या अभ्यासात वेगवेगळ्या कारणांमुळे येणारे अडथळे दूर करणे, अशी कामे घरोघरी जाऊन केली जातात. मुलांच्या शाळा गळतीचे प्रमाण कमी करण्यात या कार्यक्रमाला यश आले आहे. ट्रस्टच्या दोन वर्षांपूर्वी सुरू झालेल्या 'प्रा. सुहास गोळे भाषा शिक्षण केंद्रा'चाही भर या शाळांतील इंग्रजी शिक्षणाचा स्तर उंचावणे हाच आहे. मराठी माध्यमात पहिलीपासून इंग्रजी सक्तीचे केल्यानंतर, प्राथमिक शाळांतील शिक्षकांना इंग्रजीचे प्रशिक्षण या केंद्रातर्फे दिले जाते.

पन्नाशीतील पदार्पणाच्या निमित्ताने दोन नवे उपक्रम ट्रस्ट हाती घेऊ पाहत आहे. एक कार्यकर्ता प्रशिक्षणाचा आणि दुसरा पत्रकारांच्या प्रशिक्षणाचा. अलीकडच्या काळात व्यावसायिक समाज कार्यकर्त्यांची संख्या वाढते आहे. अनेक बिगरसरकारी संस्था (एनजीओ) कार्यरत आहेत. मात्र त्यातील बहुसंख्य कार्यकर्त्यांत व्यावसायिकता असली, तरी समग्र दृष्टीचा अभाव असल्याचे जाणवू लागले आहे. कोणत्या वैचारिक बैठकीतून हे काम करावे, याचे मार्गदर्शन या प्रशिक्षणातून बाणविण्याचा ट्रस्टचा इरादा आहे. भूमिका घेणारे कार्यकर्ते तयार करणे, हे त्यामागील उद्दिष्ट असणार आहे. पत्रकारितेत नव्याने येणाऱ्यांच्या बाबतीतही माहितीचा, विविध सामाजिक-राजकीय-आर्थिक घडामोडीमागील कार्यकारणभाव जाणून घेण्याविषयीच्या कुतूहलाचा अभाव जाणवतो. त्यामुळेच प्रशिक्षण अभ्यासक्रमाची योजना आखली जात आहे.

सर्वस्पर्शी अशा कामांमुळे असेल, ट्रस्टला आर्थिक चणचण फारशी जाणवली नाही. राजकारणामुळे महापालिकेचे अनुदान बंद झाले, तरी संस्थेने मिळवलेल्या 'गुडविल'मुळे गरज लागली तेव्हा लोकांनी तर पैसे दिलेच, शिवाय मृणालताईंना साठाव्या वाढदिवसानिमित्त मिळालेली २७.५ लाखांची थैलीही त्यांनी ट्रस्टलाच दिली. कायद्याने बंधनकारक नसतानाही ट्रस्टच्या हिशेबतपासणीचा तपशील दरवर्षी हितचिंतकांना देऊन, ट्रस्ट आर्थिक पारदर्शकतेचे तत्त्व पाळते व मदत करणाऱ्या हितचिंतकांविषयीचे उत्तरदायित्वही मान्य करते.

ट्रस्टींची स्वतःची अशी व्यापक व ठाम राजकीय विचारधारा असूनही, ट्रस्टच्या गेल्या अर्धशतकातील कामाचे स्वरूप मात्र पक्षीय राजकारणापासून अलिप्त असेच राहिले आहे. ट्रस्टीपैकी काहींच्या राजकीय पक्षांची लोकमान्यता काळानुसार कमी-जास्त झाली, पण ट्रस्टच्या विविध कामांचे क्षेत्र विस्तारतच राहिले आणि समाजाच्या सर्व स्तरांतील नागरिकांत या कामांची विश्वासार्हता आणि त्यांचा आपलेपणाचा सहभागही वाढत गेला. त्यामुळेच कार्यविस्ताराच्या नवनव्या योजना आखून त्या यशस्वीपणे राबविण्याचा विश्वास आणि उमेद पन्नासाव्या वर्षांत पदार्पण करताना ट्रस्टींना वाटते आहे. त्यांना त्यात यश येवो अशीच गोरेगावकरांची सदिच्छा राहील.



# सुनील देशमुख

सुनील देशमुख हे मूळचे सांगलीचे. १९६४ साली एस.एस.सी. परीक्षेत बोर्डात चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्यावर शिक्षणासाठी ते मुंबईत आले. १९७० साली मुंबई विद्यापीठाच्या केमिकल टेक्नॉलॉजी या विभागातून बी.केम. ही पदवी त्यांनी प्राप्त केली. पुढील शिक्षणासाठी ते अमेरिकेत गेले.

अमेरिकेमध्ये एम.एस. (केमिकल इंजिनिअरिंग), एम.बी.ए. या पदव्यांबरोबरच जे.डी. ही कायद्याची पदवीही त्यांनी मिळविली. अमेरिकेत वकिली करण्याचा परवानाही त्यांनी प्राप्त केला.

नंतर अमेरिकेतच कमॉडिटी ट्रेडर म्हणून वॉलस्ट्रीटवर त्यांनी अनेक वर्षे यशस्वी व्यवसाय केला.

आज गिरीश, निशा व सुशील या तीन मुलांसह ते व त्यांची पत्नी प्रतिभा (पूर्वाश्रमीच्या प्रतिभा टिळक) अमेरिकेत स्थायिक झाले आहेत.

व्यवसायात नेत्रदीपक यश मिळवणाऱ्या श्री. सुनील देशमुख यांना साहित्य व समाजसेवा यांविषयी विशेष आस्था आहे. व्यवसायातून स्वेच्छेने निवृत्त झाल्यापासून आठवड्यातील काही काळ ते सामाजिक कामासाठी आवर्जून देत असतात.

मराठी भाषा, समाज व संस्कृती यांबद्दल त्यांना प्रेम व कळकळ आहे. हे ऋण फेडण्याचा अल्पसा प्रयत्न म्हणून 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ला एक कोटी रुपयांची देणगी देऊन १९९४ पासून 'महाराष्ट्र फाउण्डेशन मराठी साहित्य पुरस्कार योजना' त्यांनी सुरू केली. 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट' आयोजित 'महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य पुरस्कार योजने'मागेही सुनील देशमुख यांचीच प्रेरणा आहे.

Sunil Deshmukh
Tele/Fax. : 305-918-0755
email : sunild@aol.com

# 'महाराष्ट्र फाउण्डेशन'कडून अनुदान मिळविण्याकरता प्रक्रिया

महाराष्ट्रातील सामाजिक काम करणाऱ्या व ज्यांचे आर्थिक व्यवहार पादर्शक आहेत अशा संस्थांकडून अभिनव प्रकल्पांचे 'महाराष्ट्र फाउण्डेशन' स्वागतच करते. **अशा संस्था एफ.सी.आर. ॲक्टखाली** (Foreign Contribution Act) **केंद्र सरकारच्या गृहखात्याकडे नोंदणी केलेल्या असणे, प्राप्तीकर कायद्याच्या ८०-जी कलमाप्रमाणे त्यांच्यापाशी दाखला असणे आवश्यक आहे.** एफ.सी.आर. नोंदणीशिवाय प्रस्तावाचा विचार होऊ शकणार नाही.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'कडे अनेक संस्थांकडून अनुदानासाठी नवीन प्रकल्प सतत येत असतात. हे अर्ज स्वीकारताना पुढील निकष लावले जातात :

❖ संस्था समाजातील खालच्या थराकरता कार्य करणाऱ्या, स्थिरावलेल्या व काही प्रकल्प यशस्वीपणे राबवलेल्या असावयास हव्यात.

❖ संकल्पित प्रकल्पाचा वा योजनेचा उद्देश गरीब व दुर्बल (vulnerable) अशा समाजघटकांचे जीवनमान गुणात्मकदृष्ट्या सुधारणारा असायला हवा.

❖ प्रकल्पाचे लाभ दीर्घ काळ टिकणारे व दारिद्र्य दूर करणारे असायला हवेत.

❖ शिक्षण, आरोग्य, आर्थिक सक्षमीकरण, पर्यावरण व स्त्रियांचे सबलीकरण ही महाराष्ट्र फाउण्डेशनच्या कार्याची प्रमुख क्षेत्रे आहेत.

**महाराष्ट्र फाउण्डेशनकडे साहाय्यासाठी येणाऱ्या प्रस्तावाचे स्वरूप थोडक्यात (४ पृष्ठापर्यंत) असे असावे :**

❖ प्रकल्पाची पार्श्वभूमी : स्थानिक परिस्थितीचे विश्लेषण व प्रकल्पाची गरज.

❖ प्रकल्प : प्रकल्प कशाकरता (थोडक्यात), संकल्पित कामाचे स्वरूप; त्या कामाचे फलित.

❖ प्रकल्पाकरता संस्थेकडे असलेले विशेष तज्ञ मार्गदर्शक व संस्थेचा त्या क्षेत्रातील अनुभव.

❖ खर्चाचे अंदाजपत्रक : प्रकल्पाच्या पूर्तीकरता लागणारे मनुष्यबळ, साहित्य व सामान, कार्यालय, प्रवास व इतर खर्चाचे अंदाज. (एक पृष्ठ).

❖ प्रकल्प पूर्ण होण्याचा अपेक्षित काळ.

❖ प्रकल्पाची कार्यवाही व देखरेख करणाऱ्या प्रमुख व्यक्तींची नावे.

❖ संस्थेला मदत करणाऱ्या इतर देशी व विदेशी संस्थांची नावे.

(या पत्रासोबत इतर कागदपत्रे जोडू नयेत.)

महाराष्ट्र फाउण्डेशनकडे नवीन प्रकल्पांच्या सूचना सतत येत असतात; परंतु आलेल्या सर्व प्रकल्पांचा विचार वर्षातून एकदाच केला जातो. प्रकल्पाविषयी अधिक माहिती आवश्यक वाटल्यास ती त्यावेळी मागविण्यात येते.

जर महाराष्ट्र फाउण्डेशनकडे आलेला प्रकल्प स्वीकारला गेला, तर संस्थेला तसे कळवून संस्थेशी करार केला जातो. करारावर सह्या झाल्यावर मंजूर केलेल्या रकमेपैकी पहिला हप्ता संस्थेकडे पाठविला जातो. प्रकल्पाच्या प्रगतीचा अहवाल व खर्चाचा तपशील कळविल्यावर मंजूर अनुदानाचे पुढील हप्ते दिले जातात व प्रकल्प पूर्ण झाल्याचा अहवाल पाठविल्यानंतर अनुदानाचा शेवटचा हप्ता पाठविला जातो.

**अनुदानासाठी महाराष्ट्र फाउण्डेशनकडे मोठ्या प्रमाणावर सूचना येत असल्यामुळे वरील निकष लावून त्यातील काही प्रकल्पांचीच निवड करणे महाराष्ट्र फाउण्डेशनला शक्य होते.**

महाराष्ट्र फाउण्डेशनशी करावयाचा पत्रव्यवहार e-mail द्वारा करणे हे सोयीचे आहे. हा पत्रव्यवहार महाराष्ट्र फाउण्डेशनच्या अध्यक्षांच्या नावे (sunitadhumale@yahoo.com) करावा.

संस्थेकडे e-mail ची सोय उपलब्ध नसेल तर अशा संस्थेने आपली वरील प्रकारची माहिती महाराष्ट्र फाउण्डेशनच्या पुढील पत्त्यावर पाठवावी :

Maharashtra Foundation C/o. Ramesh Sarva, CPA PC,
Post Box No. 750-250, 109-17, 72nd Road, No. 6-R, Forest Hills,
Newyork 11375, USA., 718-268-6906-269-6906

# म । नो । ग । ते

# हॅलो मेडिकल फाउण्डेशन

## डॉ. शशिकांत अहंकारी

हॅलो मेडिकल फाउंडेशनला मिळालेला महाराष्ट्र फाऊंडेशनचा हा पुरस्कार स्वीकारताना मला अत्यंत आनंद होत आहे. हा पुरस्कार घरचा आहे. माझ्या दृष्टीने या पुरस्काराला खूप महत्त्व आहे. राष्ट्र सेवा दल, युवक क्रांती दल यातील सहभागातून माझी जडण घडण झाली. यदुनाथजी, पन्नालाल भाऊ, अनंतराव भालेराव, मृणालताई, बापू काळदाते, दंडवतेनाना, गोविंदभाई यांच्या अभ्यासवर्गातून वैचारिक बैठक निर्माण झाली आणि समतेचा झेंडा कायम खांद्यावर घेऊन आयुष्यभर चालत राहायचे आपोआप ठरले गेले. या पाठीमागे बाबा आमटे हे प्रेरणास्थान होते.

आजचा हा पुरस्कार मी पाच हजार हॅलो कुटुंबीयांच्यावतीने स्वीकारत आहे. हॅलो चळवळीतून तयार झालेले कार्यकर्ते, हॅलो मेडिकल फाउण्डेशन विश्वस्त, हॅलोच्या प्रकल्पातील कार्यकर्ते, सध्या तुळजापूर, लोहारा, उमरगा, तालुक्यातून ७० गावात काम करणाऱ्या ७५ भारतवैद्य कार्यकर्त्या, संस्थेच्या ४२५ बचत गटातल्या सभासद महिला, भारतवैद्य साह्य समितीचे सभासद या सर्वांच्या टीमचा कॅप्टन म्हणून मी हा पुरस्कार स्वीकारत आहे. या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले माझे कुटुंबीय, शिक्षक, मित्र मंडळी यांच्यामुळे हा आनंद द्विगुणीत होतोय. मी सामाजिक क्षेत्रात जे काही योगदान दिले आहे ते माझी पत्नी डॉ. शुभांगी हिच्या सक्रिय सहभागामुळे आणि पाठिंब्यामुळेच. या कार्यक्रमात मी जाहीरपणे तिच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करतो.

१९८० साली औरंगाबादला हॅलोची चळवळ सुरू झाली. उद्देश होता, सामाजिक जाणिवेने समृद्ध असणारा डॉक्टर तयार झाला पाहिजे. त्या काळात 'डॉक्टर समाजाला जगवतात का नागवतात' या डॉ. अनिल अवचटांच्या लेखावर चर्चा सुरू होती. १९७८ साली अल्माअटा येथे जागतिक आरोग्य संघटनेने 'सर्वांसाठी आरोग्य २०००' ही घोषणा केली. आपल्या तेव्हाच्या पंतप्रधान कै. इंदिरा गांधी यांनी त्या मसुद्यावर सही केली होती. प्राथमिक आरोग्य केंद्र हा ग्रामीण आरोग्याचा कणा आहे. तेथील वैद्यकीय अधिकारी समाजाभिमुख असला तरच सर्वांसाठी आरोग्य २०००च्या दिशेने जाता येईल असा आमचा विश्वास होता. त्या काळात मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याच्या चळवळीतून वैद्यकीय विद्यार्थ्यांत अनेक गट तट पडले होते. या पार्श्वभूमीवर वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या संवेदनांना फुंकर घालण्यासाठी मी १४० प्रश्नांची प्रश्नावली औरंगाबादच्या वैद्यकीय महाविद्यालयात नोटीस बोर्डावर लावली.

प्रश्न बरेच होते. त्या काळात ते प्रस्तुत होते. त्यातील एकच प्रश्न मी आपणासमोर मांडतो. ''तुम्ही ज्यावेळेस आईच्या गर्भाशयामध्ये वाढत होता तेव्हा तुमच्या आईची गरोदरपणाची नोंद नर्सताईकडे झाली होती का? तुमच्या आईने टी.टी.चा डोस घेतला होता का? तुमच्या वेळचे आईचे बाळंतपण कोठे झाले? तुमची स्वत:ची नाळ दगडाने ठेचली गेली का कोयत्याने कापली? हे कधी आईला विचारले का? आणि तरीही तुम्ही जगलात हा योगायोग नाही का?

तर असाच योगायोग इतरांच्या आयुष्यात येऊ द्यायचा नाही; तर आपण काय करायचे? हे ठरवा अशा प्रकारच्या अनेक प्रश्नांवर विद्यार्थी अस्वस्थ झाले. या अस्वस्थ वैद्यकीय विद्यार्थ्यांची संघटना म्हणजे हॅलोची चळवळ. या प्रश्नांचा शोध लोकांमध्ये जाऊन घ्यायचा या उद्देशाने सुट्टीच्या दिवशी गेली सत्तावीस वर्षे औरंगाबादच्या वैद्यकीय महाविद्यालयाचे विद्यार्थी जवळपासच्या खेड्यामध्ये जातात. आरोग्य सेवा देतात, आरोग्य शिक्षण देतात. यातून त्यांचे खरे शिक्षण होते. असे २५० ते ३०० डॉक्टर चळवळीतून तयार झाले. त्यातील काही जणांनी एकत्र येऊन १९९२ साली हॅलो मेडिकल फाउण्डेशन संस्था सुरू केली.

सास्तूर किल्लारीच्या १९९३च्या प्रलयकारी भूकंपानंतर आम्ही अणदूर परिसरात भारत वैद्य प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून पर्यायी आरोग्य सेवेचे प्रयोग सुरू केले. आठवी ते बारावीपर्यंत शिकलेली त्याच गावची रहिवाशी—गावाने बचत गट, महिला मंडळांमधून निवडलेली महिला कार्यकर्ती विशिष्ट पद्धतीच्या प्रशिक्षणानंतर तिच्या गावचे ९० टक्के आरोग्याचे प्रश्न सोडवू शकते. असा आमचा विश्वास आहे. गेल्या चौदा वर्षांत या भारत वैद्यक कार्यकर्त्यांनी दीड लाखांवर रुग्ण तपासले आहेत. त्या गावातील सर्व शासकीय आरोग्य कार्यक्रमात सहभागी असतात.

चीनच्या बेअर फुट डॉक्टरांच्या संकल्पनेपासून ते मेक्सिकोपर्यंतच्या अनेकविध सत्तावीस विकसनशील राष्ट्रांमधून

गावातील आरोग्य कार्यकर्त्यांमार्फतच ग्रामीण आरोग्यसेवेला उत्तरे शोधण्यात आली आहे. महात्मा गांधींनी त्यांच्या Home and Village Doctor या पुस्तकात अशा पद्धतीच्या आरोग्य कार्यकर्त्यांची गरज व्यक्त केली आहे. कै. राज नारायण यांनी आरोग्य मंत्री असताना जन स्वास्थरक्षकाची योजना सुरू केली. प्रचंड राजकीय इच्छाशक्ती असूनसुद्धा नोकरशाही व वैद्यकीय क्षेत्रातील अनिच्छेने हा प्रयोग अयशस्वी झाला. भारतातील डॉ. आरोळे पती-पत्नीचा यशस्वी कार्यक्रम आमच्या पुढे आदर्श होता. या सर्व कार्यक्रमाचा सर्वांगीण विचार करून त्यात मोठ्या प्रमाणात बदल घडवून 'भारत वैद्यक उपक्रमा'ची आम्ही डिसेंबर ९३मध्ये आखणी केली. तत्त्व असे ठरले—ग्रामीण जनतेचे प्रश्न सोडवायचे म्हणजे Substandard उपचार करायचा नाही, की लक्षणावर उपचार करायचा नाही, रोगनिदान करूनच उपचार करायचा. त्या पद्धतीने प्रशिक्षण द्यायचे. डॉ. शाम अष्टेकर, डॉ. अनंत फडके, डॉ. वरेरकर, हॅलोचे सर्व विश्वस्त डॉक्टर्स असे आम्ही एकत्र बसलो. विचार मंथन झाले आणि शामच्या 'भारत वैद्य' पुस्तकाचा संदर्भपुस्तिका म्हणून उपयोग करायचे ठरले आणि संस्थेचा 'भारत वैद्य उपक्रम' सुरू झाला. घोषणा होती "एस.टी.च्या खर्चात उपचार गावात." गेली अनेक वर्षे आम्ही सर्वजण या कार्यक्रमाची राज्य व केंद्र सरकारकडे वकीली करत राहिलो. आज पंतप्रधानांनी जाहीर केलेल्या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानामधली 'आशा' कार्यकर्ती ही भारत वैद्यकचे मॉडेलच आहे. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाने 'आशा' आरोग्य मित्रचा प्रमाणपत्र कोर्स सुरू केला आहे. यावर्षी ५०० कार्यकर्त्या त्यांची परीक्षा देणार आहेत. हॅलो मेडिकल फाउण्डेशनच्या विविध कार्यक्रमाची आखणी आणि वैचारिक बैठक ठरवण्यासाठी अनेक अनुभवातल्या प्रसंगांचा उपयोग झाला. अशा काही घटना घडल्या. त्यांनी मला आरपार बदलले. कदाचित त्याच माझ्या कार्यक्रमाच्या प्रेरणा बनल्या.

अशीच एक घटना १९९४ मधली अणदूरच्या वत्सलानगरमध्ये राहणारी सखूबाई भोसले पारधी जातीची. एका पहाटे तिला बैलगाडीतून तिच्या नवऱ्याने आमच्या 'जानकी' रुग्णालयात आणले. डॉ. शुभांगीने तिला तपासले तर गर्भाशयाची तिची पिशवीच बाहेर आली होती. सखुबाई खोपटाच्या घरात राहते. रात्री ११ वाजता तिला बाळंतपणाच्या कळा सुरू झाल्या. तिच्या नवऱ्याने शेजारच्या खोपटातल्या पारधी बाईला बाळंतपणासाठी बोलावलं. दोन-तीन तासानंतर चिमणीच्या दिव्याच्या उजेडात मूल जन्मलं. रॉकेल संपल्याने दिवा विझला. चुलीत सनकाड्या घातल्या. वार पडायची होती. आणखीन एक पारधी बाई मदतीला धावली. अंधारातच सखुबाईच्या पोटावर हात फिरवत अजून एक मूल आत आहे असे निदान तिने केले. सखुबाईला कळा घालण्याचा आग्रह सुरू झाला. शेवटी ती कळाच घेत नाही म्हणत सखुबाईच्या पोटावर दोनही टाचाचा जोर देत त्या बाई उभ्या राहिल्या आणि तिच्या गर्भाशयाची पिशवीच बाहेर आली. हे घडलं राष्ट्रीय महामार्ग क्र. ९वर असलेल्या अणदूर या गावात, इथे प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. आमचा दवाखाना आहे. या सखुबाईने त्या दिवसापासून आमच्या दोघांची कायमची झोप उडवून टाकली. या घटनेतून अनारोग्याचा दारिद्र्य, अशिक्षितपणा, रॉकेलचा भ्रष्टाचार, घरापर्यंत न पोहचू शकलेली आरोग्य सेवा यांचा निकटचा संबंध पुढे आला.

अणदूर जवळच्याच फुलवाडी गावातल्या एक आजी दवाखान्यात आल्या. त्यांची तक्रार होती की मायांगात प्रचंड वेदना आहेत. शुभांगीने त्यांना मायांगातून तपासले पाहिजे हे समजावून सांगितले. खूप प्रयत्नानंतर त्या तयार झाल्या. तपासणीसाठी टेबलवर झोपवले. शुभांगीला योनीच्या तोंडावर फुलगोबी सारखी गाठ दिसली. आणि हा योनीचा दुर्मिळ कर्करोग असावा असे वाटले. तिने ती गाठ डेटॉलने अलगद साफ करायचा प्रयत्न करताच तो आख्खा गोळा खाली बादलीमध्येच पडला आणि योनीच्या ठिकाणी लहानसा व्रण होता. तो गोळा होता माशांच्या आळ्यांचा (maggots). हजारो आळ्या एकत्र आल्या होत्या. या पारूमावशीने गेले दहा दिवस हा त्रास सहन केलेला, जेव्हा वेदना मरणप्राय आणि सहनच झाल्या नाहीत तेव्हा त्या दवाखान्याकडे आल्या. मॅगटसचा गोळा बाजूला होताच त्यांना बरे वाटले. मायांगातून डॉक्टर तपासणी करतील आणि मायांग तर कोणाला दाखवायचे नाही अशी ७५ वर्षे वयाच्या पारूमावशीची मानसिकता. दारिद्र्य, अज्ञान, लिंगभाव असमानता, अंधश्रद्धा, चुकीच्या रूढी परंपरेचा पगडा, अशिक्षितपणा, उपलब्ध नसलेल्या आरोग्य सेवांच्या चक्रात अडकलेल्या ग्रामीण भारताचा नमुना म्हणजे पारूमावशी. ग्रामीण आरोग्यांच्या प्रश्नांचे स्वरूप वेगळे आणि अवघड आहे हे आम्ही नेहमी अनुभवतो. जेव्हा एखाद्या वृद्ध व्यक्तीला दवाखान्यात आणले जाते तेव्हा नातेवाईक म्हणतात, डॉक्टरसाहेब, एक-दोन सलायन लावा तेवढाच प्रयत्न करा. शंभर-दोनशेच्यावर बिल करू नका बरं का. त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला की, ते म्हणायला लागतात, "झाडाचं पान पिकलं की गळून पडणारच." तशीच अवस्था नवजात अर्भकाच्या उपचाराची. एखाद्या वेळेस जन्मजात व्यंगत्व असेल, पंधरा-वीस हजाराच्या पुढचा खर्च असेल

तर पालकांची भूमिका असते. ''कोवळी काकडी मिळू गळून पडलं. पुन्हा दुसरं जन्मणार आहे बंधू'', अशा अनेक उदाहरणांवरून वारंवार आम्हाला जाणवत गेलं की, ग्रामीण भागात मृत्यू हा उपचारापेक्षा स्वस्त झालाय. ही अतिशयोक्ती नाहीच. तर असा कोणता मुलगा आपल्या समाजात आहे त्याला त्याचे वडील नको असतात की, असा कोण बाप आहे की त्याला पोटचं मूल नको असतं या प्रश्नासाठी काम करताना आम्ही आरोग्यविमा योजना सुरू केली. युनायटेड इंडिया इंशुरन्स कंपनी सोबत वर्षाला केवळ २०० रुपयांचा हप्ता करून कुटुंबातील पती-पत्नी दोन मुलं यांना पाच हजार रु. पर्यंतचा खर्च विमा कंपनी देते.

आरोग्याच्या प्रश्नांचा विचार असा वेगळा करूनही चालत नाही. म्हणून आम्ही सुरुवातीपासून सर्वांगीण आरोग्य सेवेचा विचार मांडला. आरोग्यातील एका समस्येपुरता कार्यक्रम त्यामुळे आम्ही कधी आखलाच नाही.

Comprehensive Health Care चे आमचे अणदूरला मॉडेल आहे. आरोग्य क्षेत्रात काम करताना महिला आणि मुलांचा जास्त संबंध येतो. स्त्रियांवरील आरोग्यासाठी व्यासपीठ हवे आणि दारिद्र्याच्या प्रश्नाला हात घालता येईल म्हणून बचत गटाच्या व्यासपीठाचा विचार पुढे आला : 'बचत संघाकडून आरोग्याकडे' ही आमची घोषणा झाली. धनाच्या व्यवहाराबरोबर मनाचा व्यवहार सुरू झाला. नवनवीन कल्पनांचे पेव फुटायला लागले. बचत गटाच्या महिलांनी, त्यांच्या मुलांनी पोळ्याच्या दिवशी बैलाच्या पाठीवर आरोग्याच्या म्हणी लिहायला सुरुवात केली. गावातील व्यसनाचा व त्यातून स्त्रियांवरील अत्याचाराच्या घटना बचत गटातून पुढे आल्या. गर्भलिंगनिदानाचा प्रश्न गांभीर्याने पुढे आला आणि आम्ही स्त्रियावरील हिंसाचाराविरोधात गावपातळीवर, संस्थापातळीवर सावली केंद्राच्या मार्फत आणि जानकी रुग्णालयात येणाऱ्या केसेसच्या माध्यमातून काम सुरू केले. प्रशिक्षण, समुपदेशन व हस्तक्षेप अशी त्रिसूत्री ठरली. सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. सुरेश भाऊ कंदले ही जबाबदारी सक्षमपणे पेलतात. महिला सबलीकरणाची प्रक्रिया या व्यासपीठावरून सुरू झाली. महिलांचा ग्रामपंचायतीचा सहभाग वाढला. आज ३८ महिला ग्रामपंचायत सदस्या आहेत.

बचत गटाच्या आग्रहातून किशोरी प्रशिक्षण सुरू आहे. 'यशोदाची गोष्ट' पुस्तक तयार झाले. मुलींना सायकली शिकवल्या. याचबरोबर आम्ही 'विज्ञान केंद्र' सुरू केले. त्यातून गरीब व गरजू ग्रामीण विद्यार्थ्यांना विज्ञानाचे दार उघडले. इथे मुले स्वत: प्रयोग करतात आणि शिकतात.

हॅलो मेडिकल फाऊंडेशनच्या प्रकल्पाची अशी एक साखळीच आहे. आम्ही नेहमीच असे म्हणतो व मानतो की, हे काम फाटलेल्या आभाळाला एक टाका घालण्याएवढे आहे. गोधडीचे एक ठिगळ आहे.

वेगाने बदलत असलेल्या राजकीय आर्थिक परिस्थितीत आम्ही, ग्रामीण जनता, गाव कोठे आहोत याचा शोध चालू असतो. जागतिकीकरणातून, मुक्त अर्थव्यवस्थेतून, बाजारपेठेतून शहरामध्ये आलेली मॉलची संस्कृती, हा मुंबई-पुण्यातला झगमगाट पाहिला की, आम्ही फक्त दिपून जातो. उंच गगनभेदी इमारतीकडे पाहताना डोक्यावरची फाटकी टोपी गळून पडल्याचे तेवढे लक्षात येते. यातून समाजात विषमतेची दरी प्रचंड रुंदावत आहे. या व्यवस्थेत आमचे नेमके काय स्थान आहे? की आम्हाला तुम्ही Disoosable Class मध्ये घालून टाकलेय. यापुढे ज्याला त्याला ज्याच्या त्याच्या कुवतीप्रमाणे न्याय मिळेल असे तुम्ही म्हणता. कुवत कोणी मोजायची, कोणी ठरवायची, ज्यांनी सातत्याने श्रमाचे शोषणच केले आहे त्यांच्याकडून आमच्या अपेक्षा नाहीत. पण बुद्धिवंत मध्यमवर्गीयांकडून आमच्या अपेक्षा आहेत. त्यांनी संवेदनशीलतेने अनेकविध ग्रामीण शहरी गरीबांच्या प्रश्नांकडे, समस्येकडे डोळे उघडे ठेऊन पाहावे. अशा कठीण परिस्थितीत हे आता असेच घडत राहणार, काही बदल होणारच नाहीत. अशा नकारार्थी भूमिकेतून मध्यमवर्ग बाहेर आला पाहिजे. आपण सर्व जग बदलू शकता. भ्रष्टाचार थांबवू शकता, नैसर्गिक साधन संपत्तीवरचा आमचा हक्क प्रस्थापित करू शकता. सेझच्या वादळातून आमची सुटका करू शकता. आमच्या पोराबाळांना शिक्षणासाठी शाळा सुधारू शकता. बालमृत्यू, कुपोषण, माता मृत्यू, स्त्रियांचे आरोग्य यात आत्मविश्वासाने आमच्याबरोबर चळवळीत सामील होऊ शकता. असा मला विश्वास वाटतो.

या प्रसंगी मी आपणास विनंती करतोय. आपण आपलं आरोग्याचं भान हरवलंय ते परत शोधा. आपल्यातल्या सामाजिक जाणिवा प्रज्वलित करा. तुम्ही तुमच्या वर न बघता खाली आमच्याकडे बघा. मग तुमच्या लक्षात येईल ती सर्व सूज आहे. शहरातील ही जनता ग्रामीण आरोग्याचे प्रश्न सोडवण्यासाठी पुढे आली तर तो खरा हॅलो मेडिकल फाउंडेशनचा पुरस्कार असेल. मी आशावादी आहे.

धन्यवाद!

# स्त्री मुक्ती संघटना

## ज्योती म्हापसेकर

संयुक्त राष्ट्रसंघाने १९७५ साली 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' जाहीर केले आणि लगेचच दशवार्षिक कार्यक्रम जाहीर केला. संयुक्त राष्ट्रसंघाच्या या पवित्र्याने देशोदेशीच्या स्त्रियांमध्ये एक नवीन चैतन्य निर्माण झाले. त्यातून स्त्री मुक्ती संघटनेचा जन्म झाला. सकृत् दर्शनी वैयक्तिक पातळीवर स्त्री-पुरुषांमधील विषमतेचे फारसे वारे न लागलेल्या, मध्यमवर्गीय तरुण मुलींना आजूबाजूचे वास्तव वेगळ्या नजरेने पाहायला या वर्षाने शिकवले. मतदानाचा हक्क आहे, शिक्षणाचा हक्क आहे, अर्थार्जनाचा हक्क आहे आणि तरीही आपण दुसऱ्या पातळीवरचे दुय्यम जीवन जगत असतो याची जाणीव करून दिली. आपण दुहेरी कामाचा बोजा उचलतो पण घरातल्या निर्णयप्रक्रियेत आपल्याला कोणी विचारत नाही, वारस म्हणून आपली नोंद नाही, साधे जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य नाही, मुले किती असावीत हे ठरविण्याचे स्वातंत्र्य नाही, छळवणूक पाचवीला पुजलेली आहे. मध्यमवर्गीय सुशिक्षित स्त्रीची मानसिक कुचंबणा तर वर्णनापलीकडची आहे. या सर्व गोष्टींचे आकलन वेगवेगळ्या पैलूंनी घडायला आंतरराष्ट्रीय महिला वर्ष उपयोगी पडले. त्याचबरोबर समाजातील वरच्या आर्थिक स्तरात जन्म घेणाऱ्या स्त्रियांना त्यांच्या वर्गीय स्थानामुळे काही ना काही स्वातंत्र्य मिळत असले तरी जाती, वर्णव्यवस्था, धर्म आणि आर्थिक स्तर अशा विविध कारणांनी समाजातील वंचित घटकांना ती मर्यादित स्वातंत्र्येसुद्धा उपभोगता येत नाहीत. हक्क तर दूरच राहिले. याची जाणीवसुद्धा या आंतरराष्ट्रीय महिला वर्षाने आम्हाला करून दिली. हे सर्व आमूलाग्र बदलले पाहिजे असे तीव्रतेने वाटू लागले. पण बदलायचे तर अभ्यासही हवा. संघटनाही हवी. एकजूटही हवी आणि एक नितळ दृष्टिकोनही घडवायला हवा. कृती कार्यक्रमही हवा. लोकांना जाऊन भिडायला हवे. आपल्या वर्गमर्यादा ओलांडून समाजातील वंचित घटकांपर्यंत पोहोचायला हवे. अशा नानाविध गोष्टींमुळे आम्ही अस्वस्थ चित्त होतो. त्यातूनच आम्ही चाचपडत चाचपडत चालायला सुरुवात केली. बहुसंख्य जनता साक्षर नाही. त्यांच्यापर्यंत आमच्या मनातील खळबळ पोहोचवायची तर माध्यमही तसेच प्रभावी हवे. म्हणून आम्ही स्त्री मुक्ती चळवळींचा विचार मांडण्यासाठी कलापथकाचे माध्यम निवडले. नवीन गाणी लिहिली. दृश्यमाध्यम म्हणून पोस्टर प्रदर्शने भरविली, स्त्रियांच्या दुय्यम स्थानाचा ऐतिहासिक मागोवा घेणारी आणि त्याच्या बरोबरीने स्त्री स्वातंत्र्याचा अर्थ सांगणारी, मार्ग दाखविणाऱ्या कृतींचा ऊहापोह करणारी. हे सर्व घेऊन स्त्रियांचे कलापथक करून जवळ जवळ दहा वर्षे आम्ही महाराष्ट्राच्या खेडोपाडी फिरलो. ग्रामीण श्रमिक स्त्रिया व पुरुष, शेतमजुरांपासून औद्योगिक कामगारांपर्यंत, ग्रामीण सुशिक्षित स्त्री वर्गापासून शहरी पांढरपेशा व्यवसायातील स्त्रियांपर्यंत, देवदासी आणि आदिवासी, दलित स्त्रिया, मध्यमवर्गीय गृहिणी आणि महाविद्यालयीन तरुण-तरुणी अशा सर्व घटकांना आम्ही भिडलो. त्या क्रमात आमचे भावविश्व आणि वैचारिक विश्वही समृद्ध होत गेले. स्त्री मुक्ती चळवळीचा विचार समाजातील सर्व वंचित घटकांच्या मुक्तीचा विचार आहे तो लोकांपुढे अत्यंत प्रभावीपणे व्यापक पातळीवर आणि कोणतीही भेसळ न होता मांडला गेला पाहिजे याचा ध्यास आम्ही घेतला होता. त्या ध्यासातूनच १९८३ साली 'मुलगी झाली हो' या नाट्याचा जन्म झाला. नर्म विनोद, उपहास, वस्तुस्थिती आणि ती बदलण्यासाठी करावयाच्या प्रयत्नांची दिशा याचा सुरेख संगम 'मुलगी झाली हो'मध्ये आहे. हे नाटक घेऊनही आम्ही महाराष्ट्रातच नव्हे तर भारतामधील अन्य राज्यांमधूनही फिरलो. त्यातून शिकलो. नाटक पाहणाऱ्या प्रेक्षक स्त्री-पुरुषांनी आम्हाला रडत हसत खूप काही शिकवले आणि सातत्याने काम करत राहण्याची प्रेरणा दिली. हे मुक्तनाट्य म्हणजे एक प्रकारे स्त्री मुक्तीचा जाहिरनामा ठरले.

स्त्रियांचे प्रश्न देश, धर्म, भाषा, प्रांत, वंश, वर्ण, जात आणि वर्ग यांना ओलांडून सर्व वंचित घटकांना एकत्र आणण्याचे साधन आहे असा विचार तर आम्ही सुरुवातीपासूनच करत होतो. स्त्रियांचे स्त्री म्हणून मनाला भिडणारे प्रश्न सोडविण्यासाठी स्त्रियांची एकजूट आणि संघटना हवी हेही आम्ही ओळखले होते. १९८५ साली पहिली स्त्री मुक्ती यात्रा संघटित करत असताना आम्ही या विचारापर्यंत येऊन पोहोचलो होतो की स्त्री मुक्तीच्या या लढ्यात स्त्रियांबरोबर पुरुषही असायला हवेत. केवळ ऐतिहासिक वारसा म्हणून राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, महर्षी कर्वे, आगरकर इत्यादींची नावे घेऊन भागणार नाही. त्यांचा वारसा आणि वसा घेऊन पुढे जाऊ इच्छिणाऱ्या स्त्री-पुरुष कार्यकर्त्यांचे जाळे सर्वत्र विणले पाहिजे. स्त्री मुक्ती चळवळीत पुरुषांचा सहभाग हवा. मार्गदर्शक म्हणून नव्हे तर वाटसरू म्हणून. आणि असे पुरुष कार्यकर्तेही आमच्या बरोबरीने काम करू लागले. तरुण मध्यमवर्गीय मुलीसुद्धा या चळवळीकडे आकर्षित होऊ लागल्या. कारण स्त्री मुक्ती चळवळीला जसे सामूहिक मुक्तीचे राजकारण, अर्थकारण आणि समाजकारण

आहे तसेच व्यक्तिस्वातंत्र्याचेही अंग आहे याचे भान त्यांना आले. आमची धडपड मात्र या दोन्हीची सांगड घालण्याचीच राहिली.

स्त्री मुक्ती चळवळ म्हणजे स्त्रियांनी स्त्रियांसाठी चालविलेली चळवळ नव्हे, तर ती मानव मुक्तीची चळवळ आहे. म्हणून स्त्रियांचे प्रश्न हे केवळ स्त्रियांनीच हाताळण्याचे प्रश्न नाहीत. त्याचप्रमाणे जगात एकही विषय असा नाही ज्याचा संबंध फक्त पुरुषांशीच आहे आणि स्त्रियांशी नाही हे ही आम्ही सांगू लागलो. कारण मूळच्या नैसर्गिक कार्यविभागणीत लिंगाधिष्ठित श्रमविभागणीतून स्त्री-पुरुष विषमता कशी पोसली जाते याचाही ऊहापोह स्त्री मुक्ती चळवळीने केला. हा सर्व इतिहास उलगडायचा आणि लोकांसमोर मांडायचा तर त्यासाठी प्रसारमाध्यमही हवे. तेसुद्धा चाकोरीबाहेरचा प्रवास करणारे. म्हणून आम्ही पुस्तके लिहिली. प्रकाशित केली. 'प्रेरक ललकारी' हे मुखपत्रही सुरू केले. त्या माध्यमातून स्त्री प्रश्नांचा आम्ही कसा वेध घेत आलो आहोत त्याचे सविस्तर वर्णन करण्याची ही जागा नव्हे. पण अशा पद्धतीने आपल्या वाटचालीची नोंद करणे आम्हाला अत्यंत आवश्यक वाटले. त्याचबरोबर स्त्रीविषयक प्रश्न कितीही क्षुल्लक असो की महत्त्वाचा असो त्याचा वेध आपण घेतलाच पाहिजे अशीही आमची भूमिका राहिली आहे. त्यासंबंधीची वैचारिक मांडणी करणे आम्ही जितके आवश्यक मानतो तितकीच त्यांच्या सोडवणुकीचे मार्ग शोधणे आणि कृती करणेही आम्ही आवश्यक मानतो. त्यामुळे विचार आणि कृती, पडताळणी आणि पाठपुरावा यावर आमचा कटाक्ष राहिला आहे. इथे सर्व प्रश्नांची जंत्री करणे शक्य नाही. पण कौटुंबिक हिंसाचार व अत्याचार, हुंडा, बालविवाहासारख्या अनिष्ट सामाजिक रूढी, राजकीय सत्तेमध्ये सहभाग, विकासाच्या समान भागीदार, मालमत्तेमध्ये वारसाहक्क अशा काही गोष्टींचा उल्लेख इथे करायलाच हवा. प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी प्रश्नांचा सर्वांगीण अभ्यास, कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण, कार्यक्रमाची आखणी आणि प्रसार ही चौसूत्री स्त्री मुक्ती संघटनेने प्रत्येक उपक्रमाबाबत राबवली. त्यातूनच समस्या निवारण केंद्रे, पाळणाघरे आणि स्त्री अत्याचार विरुद्ध मोहिमा, पोस्टर्स आणि दृक्‌श्राव्य माध्यमे यांचा उपयोग करून राबविली. याच जाणीवेतून कचरा वेचक महिलांचे जीवनमान कसे सुधारेल याचा अभ्यास करता करता पर्यावरण, शहर स्वच्छता आणि कचरा वेचक महिलांचे प्रश्न यांची सांगड घालण्याचा प्रयत्नही गेल्या आठ वर्षांपासून चालू आहे. या सर्व विषयांवर काम करत असताना सर्वात प्रथम आम्ही समाजातील प्रौढ स्त्री-पुरुषांबरोबर काम करण्यास प्राधान्य दिले होते. पण आता भारतातीलच एकूण आयुर्मानाची गणिते पाहिल्यावर तरुण पिढीकडे आणि तारुण्यात प्रवेश करणाऱ्या बालकांच्या पिढीकडे विशेष लक्ष पुरविण्याची गरज आहे असे आम्ही मानतो. कुमारवयीन मुला-मुलींसाठी जीवन शिक्षण उपक्रम (जिज्ञासा), वस्तीमधील छोट्या असुरक्षित मुला-मुलींसाठी तेजस्विनी आणि महाविद्यालयीन मुला-मुलींसाठी विवाहपूर्व समुपदेशन या उपक्रमांतून अक्षरशः हजारो मुला-मुलींपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न गेल्या दहा वर्षांत स्त्री मुक्ती संघटनेने केला आहे. या सर्व उपक्रमांसाठी विविध क्षेत्रातील आणि आर्थिक स्तरातील सोळा ते ऐंशी वयोगटातील कार्यकर्त्यांचा मिळणारा सहभाग आणि पाठबळ ही या वाटचालीतील स्त्री मुक्ती संघटनेची सर्वात महत्त्वाची पुंजी आहे. हे उपक्रम समाजामध्ये कायमस्वरूपी चालविले गेले पाहिजेत तरच नवीन समाजाची जडणघडण मानवीय संस्कृतीला साजेशा पद्धतीने होऊ शकेल असे आम्हाला वाटते. त्यामुळे अशा प्रकारचे कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी आणि ते विकसित करण्यासाठी ते जितके व्यापक करता येतील तितके करण्याचा आमचा प्रयत्न आहे. पण व्यापक करणे आणि सर्वसमावेशक करणे याचा अर्थ असा नव्हे की त्यात हीन मिसळले तर चालू शकेल.

त्यामुळे अशा उपक्रमांमधून जातीभेद, वर्णभेद, धर्मभेद इत्यादींना थारा मिळणार नाही याबद्दल आम्ही दक्ष राहण्याचा प्रयत्न करत असतो. त्यासाठी भारतीय संविधान, लोकशाही, जागतिक शांतता, सार्वत्रिक विकास आणि हिंसाचारमुक्त जीवन या गोष्टी आम्ही मूलभूत मानतो.

या कामामध्ये आम्हीच एकमेव आहोत असा आमचा दावा कधीच नव्हता आणि आजही नाही. किंबहुना ही वाटचाल स्पर्धात्मक नसून सहवाटचाल आहे. जीवनाच्या या जथ्यामध्ये आपण सर्व एकत्रच प्रवास करणार आहोत अशीच आमची धारणा आहे.

अशा ह्या प्रदीर्घ वाटचालीत तुम्ही सर्व आमच्या बरोबर आहात ही भावनाच उत्साहवर्धक आहे आणि प्रेरणा देणारी आहे. अजून खूप वाटचाल करायची आहे. त्याला महाराष्ट्र फाउण्डेशने दिलेल्या पुरस्काराची शिदोरी नक्कीच उपयोगी पडेल. त्याबद्दल आभार मानणे महाराष्ट्र फाउण्डेशनमधील मित्रपरिवाराला आवडणारही नाही, पण ऋणनिर्देश जरूर करायला हवा. कारण आमच्या वाटेवरचे वाटसरू गुणात्मक पद्धतीने वाढावेत अशी आमची इच्छा आहे आणि तेही इतक्या झपाट्याने की वाट केव्हाच संपून जावी आणि दिसावी ती फक्त आपल्या नवसमाजनिर्मितीच्या मुक्कामावर पोहोचलेली मानवी संस्कृती.

e१६८

